॥ग्रंथाली॥

विज्ञानधारा आणि आरोग्ययात्रा

# शब्द रुची ४८

जानेवारी २०२४ । मूल्य १० रु. । पृष्ठे ५२

- विज्ञानधारा आणि आरोग्ययात्रा सांगतासमारंभ
- डॉ. रवींद्र शोभणे यांचा नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जाहीर सत्कार
- अरुण साधू स्मृती अनुदान प्रदान समारंभ
- 'ती'ची कविता – मधुराणी गोखले, रवींद्र करमरकर
















ग्रंथालीचा ४९ वा वाचकदिन



श्री नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री
MAGNETIC MAHARASHTRA
#MadeForBusiness
श्री एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री
थेट परकीय गुंतवणूक तसेच एकूण गुंतवणुकीत
महाराष्ट्र देशात पुन्हा पहिल्या क्रमांकावर
देशात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक प्राप्त -
रू. १,१८,४२२ कोटी
२०२२-२३ (एप्रिल- मार्च)
रू. ३६,६३४ कोटी
२०२३-२४ (एप्रिल- जून)
रू. २८,८६८ कोटी
२०२३-२४ (जुलै- सप्टेंबर)
रू. १,६४,८६७ कोटींची
एकूण गुंतवणूक (जुलै २०२२ पासून)
५१७ उद्योगांना एकूण
१८३७ हेक्टर जमिनीचे वाटप
(जुलै २०२२ पासून)
महाराष्ट्र
देशाचे औद्योगिक पावरहाऊस
रू. १८३,९२४ कोटींची
थेट परकीय गुंतवणूक
स्त्रोत: आरबीआय, उद्योग संर्वधन व अंतर्गत व्यापार विभाग (डीपीआयआयटी), भारत सरकार
केअर एज स्टेट रँकिंग २०२३ नुसार राज्यांच्या क्रमवारीत देशात पहिल्या क्रमांकावर
जागतिक आर्थिक परिषद २०२३ मध्ये
रू. १,३७, ६६६ कोटींचे
१९ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी
जागतिक आर्थिक परिषद २०२३ मध्ये स्वाक्षरी झालेल्या सामंजस्य करारांची
७६.२ टक्के
अंमलबजावणी पूर्ण
१.३ लाखांहून अधिक
रोजगार निर्मिती
(जुलै २०२२ पासून)
श्री उदय सामंत
मा. मंत्री, उद्योग
श्री देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री
श्री अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री
सामाजिक, आर्थिक समावेशक आणि वित्तीय श्रेणीत राज्यास सर्वाधिक गुण
(स्त्रोत- केअर एज रँकिंग २०२३)
Connect with us : www.midcindia.org | gmmarketing@midcindia.org | MIDC, Udyog Sarathi, Andheri (E), Mumbai-93

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची ४८

**जानेवारी २०२४, वर्ष दहावे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

कार्यालयीन संपर्क
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
**shabdruchee@gmail.com**
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**समीर कदम**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

BHIM UPI SCAN & PAY

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**राजीव जोशी** / ५
टाटा लिट फेस्ट-२०२३

**संजीवनी खेर** / १०
चित्रा मृद्‌गल

**डॉ. सौ अंजली पटवर्धन कुलकर्णी** / १४
विहिरीची गोष्ट!

**राजीव श्रीखंडे** / १७
अलेक्झाडंर दयुमा

**शरद काळे** / २१
कॉप २८ परिषदेचे फलित

**किरण येले** / ३०
तुटलेपणाच्या कविता : कवी सचिन शिंदे

**वृत्तांत** / ३२

**ग्रंथपरिचय – डॉ. निर्मोही फडके** / ४६

**ग्रंथपाने – चांगदेव काळे** / ४७

'शब्द रुची' अंकाबाबत डिसेंबरमध्ये नव्याने विचार होणार आहे. अंकासाठी वर्गणी भरल्यास डिसेंबर २०२४पर्यंतचे अंक पोस्ट केले जातील. ज्यांची वर्गणी डिसेंबर २०२४च्या पुढची भरली असेल, त्यांना ती संपण्याच्या महिन्यांइतके वर्गणी जमा होण्याच्या तारखेपूर्वीचे अंक मिळतील. आता वर्गणी फक्त डिसेंबर २०२४ पर्यंतचीच स्वीकारली जाईल.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
विश्वस्त, संपादक

# संपादकीय...

ग्रंथालीचा गेला दीड महिना विविध उपक्रमांनी भरलेला होता. या वर्षी प्रथमच बाल-कुमार दिवाळी अंक संच योजना आखून मुलांनीच सादर केलेली दिवाळीसंध्या साजरी झाली. गेल्या तीन वर्षांप्रमाणे याही वर्षी मोठ्यांच्या दिवाळी अंकांची संच योजना होतीच. त्याला जोडून पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या गाण्यांवर आधारित 'हृदयस्वर' हा कार्यक्रम साजरा झाला. दोन्ही कार्यक्रमांत ग्रामीण वाचनालये व संस्था यांना ४० दिवाळी अंक आणि ३६ पुस्तकं यांचा संच भेट देण्यात आला. त्यासाठी अनेकांनी प्रायोजकत्व स्वीकारून उत्स्फूर्त सहकार्य केले.

त्यानंतर घडली विज्ञान आणि आरोग्ययात्रा. चिपळूण-रत्नागिरी येथे २४ नोव्हेंबर येथे आरंभ होऊन तिची यशस्वी सांगता २४ डिसेंबर रोजी वाशी येथे प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय, साहित्यमंदिर आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने झाली. यात्रेचे नेतृत्व शरद काळे, डॉ. सतीश नाईक, डॉ. राजेंद्र आगरकर, डॉ. यश वेलणकर, डॉ. हेमंत जोशी यांनी केले. त्यांना साथ होती डॉ. सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते, डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. नीना सावंत यांची. त्यांनी आपला पूर्ण महिना यासाठी राखून ठेवला, हे मोलाचे आहे. दिवसा शाळा-महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना आरोग्य आणि विज्ञानविषयक मार्गदर्शन आणि सायंकाळी मुलाखत, परिसंवाद आणि व्याख्यान असे स्वरूप असलेल्या यात्रेचे फलित हे, की त्यातून विद्यार्थ्यांत विज्ञानजिज्ञासा आणि आरोग्यभान जागृत करून समाजभानही पेरले गेले. विद्यार्थी हे पुढील पिढीचे प्रतिनिधी असल्याने त्यांच्यापर्यंत जावे, हे आखणी करतानाच ठरवले गेले. त्याला विद्यार्थी आणि संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक यांचा पाठिंबा उत्साहवर्धक होता. या सर्वच डॉक्टर, शास्त्रज्ञ, विज्ञानअभ्यासक यांच्या विद्यार्थ्यांत मिसळून बोलण्याचा परिणाम इतका चांगला झाला, की आरंभी बुजलेले वाटलेले विद्यार्थी खुलत जाऊन प्रश्न विचारू लागले. इतकेच नाही तर कार्यक्रमानंतर गराडा घालून पुन्हा येण्याची गळ घालत होते. संस्थांचेही असा उपक्रम पुन्हा सर्वच विद्यार्थ्यांसाठी करूया असे म्हणणे होते.

शरद काळे मुलांना प्रश्न विचारत, तुमच्यापैकी किती जणांना शेतकरी, शिक्षक किंवा शास्त्रज्ञ व्हावेसे वाटते. तिन्ही क्षेत्रांत स्वारस्य दाखवणाऱ्या मुलांची एकत्रित टक्केवारी मात्र १५ टक्क्यांच्या आत असे, हे विचार करायला लावणारे आहे. भोवताली असलेले पर्यावरण आपल्यावर किती प्रभाव टाकून आहे हे यातून दिसले. तरी समाजात पुन्हा जाऊन प्रबोधन करून समाजऋण फेडत राहण्याचा या साऱ्यांचा मानस स्पृहणीय आहे.

यात्रेमध्ये ठिकठिकाणी व्यक्ती-संस्था करत असलेले कार्य समजले, आरोग्ययात्रेमधून लोकांचे प्रश्न समजले, समाजात निरलस सेवा देणाऱ्या डॉक्टरांशी परिचय झाला, त्याचबरोबर अजूनही पोचत नसलेल्या वैद्यकीय सेवांबाबत माहिती मिळाली.

दरवर्षीप्रमाणे २५ डिसेंबर हा नवीन पुस्तकांच्या प्रकाशनाचा, लेखक-वाचक भेटीचा दिवस. यावर्षी तो दोन सत्रांत झाला. सकाळच्या सत्रात अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचा नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. शोभणे यांच्या 'शहामृग' या पुस्तकाचे प्रकाशनही त्यांच्या हस्ते झाले. सायंकाळी आरंभी 'अरुण साधू स्मृती अनुदान' प्रदानाचा समारंभ झाला. निराधार स्त्रियांसाठी कार्य करणाऱ्या 'माऊली' या संस्थेला अनुदान देण्यात आले. संस्थापक डॉ. राजेंद्र धामणे यांनी ते स्वीकारले. त्यांच्या पत्नी डॉ. सुचेता यांच्यासह त्यांनी उभारलेले काम मन हेलवणारे आहे. त्यानंतर नवीन दहा पुस्तकांची प्रकाशने झाली व सांगता मधुराणी गोखले आणि रवींद्र करमरकर यांच्या 'ती'च्या कवितांच्या सादरीकरणाने झाली.

शिक्षणकाळ हा घडणीचा काळ असतो. या काळात मुले अधिकतर काळ शिक्षकांच्या सान्निध्यात; पर्यायाने शालेय वातावरणात असतात. हे शिक्षण कसे असावे, सध्या ते कसे आहे, त्यावर बदलत्या काळाचा काय इष्ट-अनिष्ट परिणाम होतोय, शिक्षणधोरण आखताना काय लक्षात घेतले पाहिजे.... असा एकूणच 'शिक्षणविचार' मांडणारे एक नवीन सदर डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी या अंकापासून लिहिणार आहेत. नेहमीची सदरे आहेतच.

**– अरुण जोशी**



**राजीव जोशी**

# टाटा लिट फेस्ट-२०२३

मुंबईतील एनसीपीए हे गेली अनेक वर्षे रंगमंचीय कला, साहित्य-संस्कृतीचे जागतिक केंद्र म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या नाटक, नृत्य व संगीतविषयक कार्यक्रम, वर्कशॉप, सेमिनारमधून रसिकजनांना भरभरून आनंद मिळतोच आहे. खेरीज असंख्य जुनेजाणते कलाकार, उगवते कलाकार ह्याच माध्यमातून आपली कला विकसित-विस्तारित असल्याचे लक्षात येते. एनसीपीए या राष्ट्रीय केंद्रातर्फे गेली चौदा वर्षे साहित्याच्या अभिनव उत्सवाचे म्हणजेच 'टाटा लिटरेचर फेस्टिव्हल'चे आयोजन केले जाते. कवी-लेखक-समीक्षक, वाचक आणि प्रकाशक अशा अनेक घटकांना हे अगदी आपले हक्काचे संमेलन वाटते हीच ह्याची खासियत आहे. आपण मराठी अभिजन साहित्य व नाट्यसंमेलनाचा अनुभव घेणारी मंडळी, तरीही हे फेस्ट वेगळे भासते. असे अनोखे वेगळेपण कशाकशात आहे? असे इथे वेगळे काय घडते? नेमके कोणते कार्यक्रम होतात? एका जागतिक दर्जाचे साहित्य संमेलन नुकतेच मुंबईत संपन्न झाले. स्थानिक भाषा, आपल्या देशातील विभिन्न भाषांचा प्रवाह एकत्र आणण्याचे कार्य या फेस्टद्वारे नित्यनेमाने होत असते. तीन दिवसीय फेस्टिव्हलचा व त्यामागील प्रेरणास्थान व आयोजक या सर्वांचा एकत्रितपणे घेतलेला आढावा.

**पार्श्वभूमी**

एकोणीसशे सत्तरच्या दशकात लोकशाहीच्या चौथ्या स्तंभात अनेक तारे तळपत होते. स्वयंभू व प्रागतिक विचारवंत आपल्या लेखणी व वाणीने समाजाला स्वातंत्र्याचा अर्थ समजावत होते. त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे पत्रकार-लेखक, कॉलमिस्ट अनिल धारकर. पेशाने इंजिनीयर असलेले धारकर फिल्म क्रिटिक होते, पत्रकार-संपादक म्हणून त्यांनी मिड डे, संडे मिड डे, संडे ऑब्झरवर, इंडिपेंडट अशा अनेक नामांकित वर्तमानपत्रांत काम केले. अनेक ठिकाणी कॉलम लिहिले, यशस्वी टीव्ही अँकर म्हणून लोकप्रियता मिळवली. त्यांच्या मनात आंतरराष्ट्रीय लिट-फेस्ट करावे अशी संकल्पना रुजली. परदेशात अशा प्रकारच्या लेखक-वाचकांच्या सहभागाच्या पुस्तक-जत्रा, प्रदर्शने होतात. मग मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शहरांत असे काही साहित्यिक हॅपनिंग का होत नाही, म्हणून त्यांनी प्रयत्न सुरू केले. ग्रेसन डिकुन्हा, शैलु श्रीनिवासन, पद्मिनी मिरचंदानी या मान्यवरांनी धारकर ह्यांना साथ दिली. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असली तरी तिला समृद्ध असा सांस्कृतिक-साहित्यिक वारसा व परंपरा आहे. मराठी, गुजराती, उर्दू व इंग्रजी अशा चार महत्त्वाच्या भाषांचे इथल्या नागरिकांमध्ये साहित्य-संस्कृती क्षेत्रात अनन्यसाधारण महत्त्व होते. धारकर ह्यांनी हे जाणले. त्याकाळी फक्त जयपूरमध्ये असे लिट फेस्ट व्हायचे. मुंबईत तसे व्हावे या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू झाले. देशातील साहित्यिक वर्तुळात अनिल धारकर ह्यांचे चांगले वजन होते. विदेशातील मान्यवर लेखकांनी इथे यावे, इथल्या लेखकांशी संवाद करावा, वाचकांशी हितगुज करावे म्हणून त्यांनी संपर्क साधणे सुरू केले. टाटासारखा बडा उद्योगसमूह या संकल्पनेच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. कारण केवळ उद्योग-व्यवसाय नव्हे तर काही मूल्ये-संस्कृती ह्यांचे जतन व वर्धन करणे हे त्यांच्या ध्येय-धोरणाशी सुसंगत असेच होते.



मूलतः ही आंतरराष्ट्रीय पुस्तक जत्रेची संकल्पना सर्वांनाच आवडणारी होती. मात्र तयारी सुरू केली तेव्हा काही अडचणी उभ्या



**हरीश भट**

टाटा लिट फेस्टिव्हलशी जोडले गेलेले एक महत्त्वाचे नाव म्हणजे हरीश भट. ते उत्तम कथा-कादंबरीकार, कवी, स्तंभलेखक व मार्केटर म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे कलात्मक व कॉर्पोरेट यांचा अनोखा संगमच म्हणायला हवा. त्यांनी टाटांचे ब्रँड कस्टोडीयन म्हणून काम पाहिले आहे. तीन दशकांहून अधिक काळ टाटांच्या अनेक सहयोगी कंपन्यांत उच्चपदांवर जबाबदारीची कामे करता-करता त्यांनी आपल्यातील सृजनशीलता जपून ठेवली. त्यातूनच त्यांच्या लेखणीतून उत्तम पुस्तकांची निर्मिती झाली. पहिलेच पुस्तक टाटांचा इतिहास सांगणारे- 'टाटा स्टोरीज आणि ऑफिस सिक्रेट्स', दुसरे, 'अॅक्युरिअस मार्केटर'. त्यानंतर त्यांनी 'अॅन एक्स्ट्रिम लव्ह ऑफ कॉफी' अशा अनवट शीर्षकाची कादंबरी लिहिली. आजवर त्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली आहेत, २०२३ च्या टाटा लिट-फेस्टमध्ये त्यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशनही करण्यात आले. एकीकडे कॉर्पोरेट कारकीर्द, दुसरीकडे लेखणीची मुशाफिरी असा समांतर प्रवास चालू असताना त्यांच्यातील कुशल संयोजक-सूत्रधार साहित्यविश्वाला अभिमान वाटावा या अशा साहित्यिक मेळाव्याचे आयोजन करण्यातही मग्न असतो. त्यांचा साहित्यवर्तुळातील घनिष्ट संपर्क व सृजनात्मक कामात कमालीची आस्था असल्याने टाटा लिट-फेस्टची आखणी व एकूण उभारणी दर्जेदार होताना दिसते आहे. यंदाच्या लिट-फेस्टचे कुशल व नेटके आयोजन करण्यात आणि नामवंत साहित्यिकांना सामावून घेण्यात हरीश भट ह्यांचा सिंहाचा वाटा होता.

राहिल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठमोठे लेखक हे बिझी. ते कसे इथे येणार? इतक्या मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ, फेस्टिव्हलची उभारणी करणे काही सोपे नव्हते. प्रायोजकांचे दातृत्व हे पायाभूत होते, पण संकल्पनाच इतकी भन्नाट होती की दातृत्वभावना असलेले अनेक जण पुढे आले. त्यातून २००९ मध्ये उभे राहिले पहिलेवहिले टाटा लिट फेस्ट, ज्याला देशी-विदेशी वाचक-लेखकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. उत्साही तरुणांनी या मोठ्या लिट फेस्टच्या यशाची मुहूर्तमेढ रोखली. आर्थिक पाठबळ, सांस्कृतिक सहभाग आणि लेखक-वाचकांची सामील होण्याची आतुरता म्हणूनच पुढे या लिट फेस्टने मागे वळून पाहिलेच नाही. एकेका वर्षी नवे उपक्रम, मान्यवर तशा नवीन लेखकांना निमंत्रित करून चर्चासत्रे, भाषणे, अनुभवकथन व सादरीकरण केल्याने प्रेक्षकांची-दर्दींची गर्दी वाढतीच राहिली. अनेक कॉर्पोरेट प्रायोजक स्वत:हून पुढे आले. हे लिट फेस्ट आता मुंबईचे न राहता देशाचे झाले. त्याला जागतिक स्तरावर नाव प्राप्त झाले. पहिल्या वर्षी ज्येष्ठ लेखिका महाश्वेतादेवी ह्यांना मानाचा असा लाइफ टाइम अचीव्हमेंट पुरस्कार देण्यात आला. ते पैसे त्यांनी झोपडपट्टीतील मुलांच्या विकासासाठी दान केले.

**२०१९ मध्ये 'लिट फेस्टचे दहावे वर्ष' साजरे**

अनिल धारकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रोवलेले हे बीज आता दहाव्या वर्षांत पदार्पण करणार म्हटल्यावर तरुण लेखक-वाचक, ज्येष्ठ-श्रेष्ठ लेखक मंडळी पुढे आली. प्रायोजकांची फळीच्या फळी उभी राहिली. निधी मिळतोय म्हटल्यावर लिट फेस्टने आपले पंख पसरले. एनसीपीएप्रमाणे उपनगरातील वांद्रे येथे व पृथ्वी थिएटरमध्ये काही कार्यक्रमांचे आयोजन केले. या लिट फेस्टच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत सद्गुरू जग्गी, शशी थरूर, जय पांडा, गिरीश कर्नाड, व्ही.एस. नायपॉल व उस्ताद अमजदअली खान अशा बुजुर्गांचा सन्मान केला गेला. नेहमीच्या चर्चा, वाद-विवाद इत्यादी कार्यक्रमांच्या बरोबरीने कधी आर.जे. मलिष्का व सायरस ब्रोचा अशा पॉप्युलर कॉमेडीयनना आणून फेस्टिव्हलच्या मर्यादा लवचीक केल्या. अनेक पुरस्कार-सन्मान वाढवले. भारतीय भाषाभगिनींचा सहभाग हादेखील एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरला. सृजनशील लेखक, तितकेच आस्वादक वाचक आणि अर्थशक्ती घेऊन आलेले प्रायोजक अशा तीन भक्कम घटकांमुळेच टाटा लिट फेस्ट इतकी वर्षे दिमाखात साजरा होतो आहे आणि यंदा म्हणजे चौदाव्या वर्षीही त्याबद्दल तीव्र अनुभूती आली, असे उद्‌गार गेली चौदा वर्षे श्रद्धेने हजेरी लावणाऱ्या श्रोत्यांचे आहेत. असे दाद देणारे वाचक हीच या पुस्तकमहोत्सवाच्या लोकप्रियतेची एक जबरदस्त परंपरा म्हणता येईल. कारण लोकसहभागामुळेच वाचनसंस्कृती जोपासली जाते. स्वतंत्र वातावरणात लेखक-कलावंत मनमुक्तपणाने आपली प्रतिभा फुलवू शकतात, आपल्या विचारांचे प्रकटीकरण निर्भयपणे करू शकतात.

**चौदाव्या टाटा लिट फेस्टमध्ये जमला लेखक-वाचक व सृजनांचा मेळा**

जागतिक कीर्तीचे साहित्यिक सलमान रश्दी ह्यांची 'ऑनलाइन' मुलाखत रंगली- EMPIRES OF IMGINTION. आपल्या परखड विचारांनी आणि वादग्रस्त लेखणीसाठी प्रसिद्ध असलेल्या सलमान रश्दी ह्यांची मुलाखत घेण्यात आली. दुबईस्थित कवयित्री व नृत्यनिपुण तिशानी दोशी

ह्यांनी त्यांच्याशी बातचीत करून इतिहासाबाबत नवनवे कंगोरे शोधण्याचा प्रयत्न केला. 'सत्य मांडणे हे समस्यामूलक झालेले आहे, कारण सारे जग खोट्या गोष्टींनी भरलेले आहे. सत्य मांडले जात आहे की नाही हे वाचकांना हवे असते. काल्पनिक कादंबरी हे एक सत्य मांडण्याचे साधन आहे. ऐतिहासिक फिक्शन या प्रकारात वाचनीय आहे का हे पाहिले जाते.' अशा शब्दांत त्यांनी आपले विचार मांडले.

**टाटा लिटरेचर लाइव्ह**

लिट फेस्ट २०२३ म्हणजे २० देशांतील १३० पेक्षा अधिक लेखकांचा २५ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत ऑनलाइन आणि प्रत्यक्ष सहभागातून साजरा झालेला साहित्यिक सोहळा. इतिहास, आरोग्य-आहार, गणिताचे आपल्या जीवनातील महत्त्व आणि अलीकडच्या काळातील मानवी बुद्धी-सृजनशीलता विरुद्ध ए.आय. (Artificial Intelligence) या सद्यकालीन संघर्षातून पुढे काय घडणार अशा विषयांवर अनेकविध सेशनची आखणी, प्रत्यक्ष सादरीकरण, लोकप्रिय ग्रेट डिबेटचे विचारमंथन, सांगीतिक कार्यक्रम, नृत्य-नजराणा, बुद्धीला आव्हान देणारी क्विझ-प्रश्नमंजुषा, साहित्य-वाचन उपक्रम, काव्य-वाचन आणि तरुणाईच्या आवडीचे कार्यक्रम यात घडले.

तेरा नव्या कोऱ्या पुस्तकांच्या प्रकाशनाचा अभूतपूर्व सोहळा रंगला. यात कन्नड भाषेतील अभिजात साहित्याचा गौरवपूर्ण आढावा घेऊन आदरणीय मिलन कुंद्रा ह्यांना अभिवादन करून त्यांचे संस्मरण केले गेले.

आपल्या शब्दसंपदेने समृद्ध करणाऱ्या वैश्विक लेखकांना एकत्र आणणारे हे फेस्टिव्हल म्हणजे थोरा-मोठ्यांना समोरासमोर ऐकण्याची, पाहण्याची व भेटण्याची एक पर्वणीच. सुप्रसिद्ध इतिहास संशोधक जी.एन. डेव्ही, पीटर फ्राकोपान, साम मिलर, अंथोनी साटीन हे जागतिक स्तरावरील नामवंत उपस्थित राहिले आणि प्रेक्षकांना त्यांना अनुभवण्याची संधी मिळाली. आपल्या मुंबई महानगरातील मान्यवर लेखक-लेखिका म्हणजे जेरी पिंटो, शोभा डे व शांता गोखले ह्यांनी आपल्या नवीन पुस्तकांच्या संदर्भात आपली मनोगते मांडली.


टाटा लिट फेस्टचे प्रणेते अनिल धारकर ह्यांच्या सन्मानार्थ उद्घाटनसत्र आयोजित केले. विषय होता- इन फ्रेझ ऑफ द फ्रेज. ब्रिटिश अमेरिकन लेखक व टीव्ही होस्ट म्हणून सुप्रसिद्ध मेहेदी हसन ह्यांच्याशी शशी थरूर ह्यांनी बातचीत करून या हायब्रिड पद्धतीच्या लिट फेस्टचे उद्घाटन केले.

'ए.आय. तंत्रज्ञानाचा आपल्या जीवनावर होणारा प्रभाव' या विषयावर परवेज दिवान ह्यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. यावेळी मार्कस दौ सौतोय व शशी थरूर ह्यांनी आपले मौलिक विचार मांडले.

खासदार व इंग्रजीतील फर्डे वक्ते-लेखक शशी थरूर म्हणाले, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा सार्वत्रिक वापर आता वाढत चाललेला आहे. ग्राहक-सेवा, रिटेल व अन्य सेवाक्षेत्रांत त्यांची उपयोगिता जाणवते आहे. मात्र कलाक्षेत्रांत, सृजनशील कामांत एआयचा वापर म्हणजे मानवी बुद्धीवर आक्रमण, अशीच सर्वांच्या मनात भावना व भीती निर्माण झालेली आहे. ज्यांना ह्युमन थिसॉरस असे आदराने संबोधले जाते ते शशी थरूर पुढे म्हणाले, आज ए.आय.बद्दल चर्चा सुरू आहे, भीती व्यक्त केली जात आहे, पण मला वाटत नाही की ए.आय. पुस्तके लिहू शकेल. कारण कल्पना करणे हा उपजत मानवी गुणधर्म आहे, निसर्गदत्त प्रवृत्ती आहे. भविष्याच्या दृष्टीने आजच्या मुलांना आपण उद्यासाठी -त्यांच्या भवितव्यासाठी प्रशिक्षित केले पाहिजे. उद्याची नवनवीन आव्हाने पेलण्याचे बळ त्यांच्यात कसे निर्माण होईल हे पाहिले पाहिजे. त्यांना कोणता विचार करायचा हे अजिबात शिकवू नका. मात्र कसा विचार करायचा हे जरूर शिकवा. सृजनशीलता व साहित्यिक ऊर्मी या तांत्रिकतेपुढे झुकतील असे मला मुळीच वाटत नाही. कदाचित सर्जनशीलता व तंत्रज्ञान हे एकत्र राहतील. बदलत्या काळानुसार असे बदल घडत राहतील.

**मान्यवर लेखकांच्या नवीन पुस्तकांच्या प्रकाशनाचा सोहळा**

मराठी साहित्याच्या-नाटकांच्या अभ्यासक, लेखिका, अनुवादक व नाटककार शांता गोखले ह्यांचे जेरी पिंटो व त्यांनी एकत्रित लिहिलेले पुस्तक- 'बिहोल्ड-द वर्ड इज गॉड' म्हणजे संत तुकाराम ह्यांच्या अभंगावर लिहिलेले पुस्तक. दोघांच्या सृजनशीलतेच्या संकरातून लिहिले गेलेले पुस्तक म्हणजे तुकारामांच्या अभंगांचे इंग्रजीत केलेले आस्वादक असे





दस्तऐवजीकरण. हे प्रकाशन फक्त शब्द-गद्य स्वरूपातील नव्हते तर दोघांच्या विचारप्रवर्तक गप्पा आणि तेजश्री व रतनकुमार इंगावले ह्यांनी तुकारामांच्या निवडक अभंगांचे केलेले गायन ह्यातून वेगळीच अनुभूती मिळाली. या पुस्तकाच्या माध्यमातून तुकारामांचे साहित्य इंग्रजी वाचकांपर्यंत सहजगत्या पोहोचू शकते.

प्रल्हाद कक्कर म्हणजे जाहिरातक्षेत्रातील एक बडे प्रस्थ. त्यांनी लिहिलेल्या या आत्मचरित्राचे 'AD MAN - MAD MAN' शानदार प्रकाशन करण्यात आले. त्यांच्या पुस्तकाचे या संमेलनात प्रकाशन होणे हे औचित्यपूर्ण होते. या प्रसंगी अभिनेत्री रविना टंडन व अनुजा चौहान या मान्यवरांनी त्यांच्याशी बातचीत करून त्यांच्या अनुभवाचा ठेवा प्रेक्षकांसमोर ठेवला.

'टाटा स्टील'चे माजी व्यवस्थापकीय संचालक, पद्मभूषण जे.जे. इराणी ह्यांचे 'डॉक्टर स्टील' असे आगळेवेगळे शीर्षक असलेल्या आत्मचरित्राचेही प्रकाशन या फेस्टमध्ये करण्यात आले. इराणी ह्यांच्या आत्मकथनातून टाटा स्टीलचा इतिहास उलगडला जाईलच; शिवाय इराणी ह्यांच्या कार्यकर्तृत्वाचा प्रेरणादायी प्रवास तरुणपिढीला व अन्य उद्योजक, संचालकांना वाचण्यास मिळू शकेल.

मणिशंकर अय्यर हे भारतीय राजकारणातील एक महत्त्वपूर्ण नाव. वादळी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या MEMORIES OF MAVERICK या आत्मचरित्राचे प्रकाशन यंदाच्या लिट फेस्टमध्ये होणे हाही एक चांगला प्रकाशनयोग म्हणता येईल. त्यांच्या जीवनातील घटनांबाबत लोकांमध्ये औत्सुक्य असल्याचे उपस्थित जनसमुदायावरून जाणवले. प्रकाशन झाल्यानंतर अनुराधा सेनगुप्ता ह्यांनी अय्यर ह्यांच्याशी संवाद साधला आणि धाडसी जीवनातील काही अनुभवांबद्दल जाणून घेतले.




NOTHER SORT OF FREEDOM चे लेखक गुरुचरण दास ह्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा आढावा घेत त्यांच्या लेखनाचे मर्म जाणून घेतले रुचिरा चौधरी ह्यांनी.

मानव कौल ह्यांच्या A BIRD ON MY WINDOWSIL पुस्तकाचे शानदार प्रकाशन झाले. त्यानंतर मानव कौल ह्यांचा नाटककार ते कादंबरीकार आणि पुढे कवी म्हणून होत गेलेल्या कलात्मक संक्रमणबाबत चर्चा करण्यात आली. त्यासाठी खुशबू माटू ह्यांनी बातचीत केली.

फेस्टचे आणखी एक वैशिष्ट्य होते थेट लेखकांशी संवाद. दलित लेखक मनोरंजन ब्यापारी या तीन भागांतील संघर्षकथा लिहिणाऱ्या दलित लेखकाची हिंदी भाषेत मुलाखत झाली.

बाबासाहेब अनबाऊंड - तरुण कवी आणि संगीतकार जोडी सुमित सिमोस व अशोक गोपाल ज्यांनी 'अफेअर्स ऑफ कास्ट' हे पुस्तक लिहिले. या लेखकद्वयीशी 'व्हाय आय एम नॉट अ हिंदू वूमन'च्या लेखिका वंदना सोनाळकर यांनी बातचीत केली.

'टर्न द टाइड कार्यक्रम - ब्रिटिश-अमेरिकन पत्रकार मेहेदी हसन अल अझीरा ह्यांच्याशी ज्येष्ठ पत्रकार-संपादक राजदीप सरदेसाई ह्यांनी मनमोकळी बातचीत केली. त्यावेळी 'प्रसार आणि प्रचार' या मुद्यावर अधिक सविस्तर चर्चा रंगली.

**उगवत्या लेखक-लेखिकांचा उदंड उत्साह**

तेजस्विनी आपटे-राहम, लफअत नवाज, इसाबेला हम्मद, स्मृती रवींद्र अशा तरुण लेखक-लेखिकांचा सहभाग असल्याने कला-साहित्याचा अभ्यास करणारी कॉलेजियनची फलटण आपापले ग्रुप घेऊन श्रोते बनत होती, तर कधी थेट संभाषण करताना दिसत होती. एरवी मनोरंजनाच्या क्षेत्रांतील तारांकित मंडळी म्हणजे बॉलीवूडची रविना टंडन, मानव कौल, हृषी के. व अनुवब पाल हे लोकप्रिय कलावंत हिरिरीने सामील झाले होते व आपल्या चाहत्या मनमोकळी बातचीत करत होते. सेल्फी व सेल्फिशच्या जमान्यात हे दृश्य हरखून टाकणारे होते. आजची पिढी मोबाइलग्रस्त झाली आहे असे इथल्या माहोलवरून अजिबात जाणवत नव्हते. म्हणजे शब्द, साहित्य आणि साहित्यिकांच्या साहित्यमेळाव्यात उपस्थित सारे आपले रुटीन जग विसरले होते.

एनसीपीएच्या प्रांगणातील रंगमंचीय सादरीकरण, प्रेक्षकांशी संवाद आणि उत्स्फूर्त दाद -

पार्कातील पोएट्री - पार्कातील कविता ऐकण्यासाठी अनेक श्रोत्यांनी उत्स्फूर्त गर्दी केली आणि कवितांना, मुक्तछंदातील सादरीकरण करणाऱ्यांना मन:पूर्वक दाद दिली.

बुक SWAP - पुस्तकांची अदलाबदल - तुमच्या

घरातील वाचून झालेली पुस्तके अर्थातच चांगल्या वाचनीय स्थितीतील पुस्तके इथल्या स्टॉलवर आणून द्यायची व त्यांच्या बदल्यात इथे आणून दिलेली पुस्तके न्यायची. या स्टॉलला खूप छान प्रतिसाद मिळाला.

साहित्याची स्टॅण्ड अप कॉमेडी- एरवी जशी स्टॅण्ड अप कॉमेडी असते त्यापेक्षा सर्वस्वी भिन्न म्हणजे साहित्य-कलाकृतीच्या अंगाने फुललेली कॉमेडी प्रेक्षकांना अनुभवण्याची संधी या लिट फेस्टमध्ये मिळाली. अनुवब पाल ह्यांनी उपस्थितांना मनमुराद हसवले.

४ थिएटर परफॉर्मन्स - संगीत, नृत्य, गायन आणि नाट्य ह्यांचे रंगमंचीय सादरीकरण. MOVEMENT THETRE चा भाग म्हणून 'LIVES OF CLAY' नृत्यांगना विद्या थिरूनारायन ह्यांच्या संकल्पनेवर लेखक-वायू नायडू, दिग्दर्शक-टिम सुपले ह्यांनी आगळेवेगळे नृत्य-नाट्य सादर केले. ते बंदिस्त रंगमंचावर न करता खुल्या प्रांगणात मुक्त अवकाशात सादर झाले. प्रजापती म्हणजे एक कुंभारीण व शंकराची पार्वती या दोघींच्या जीवनातील समांतर प्रसंगांचा उल्लेख करून कथा गुंफली होती. एकीकडे आपल्याला भरतनाट्यममधून भावदर्शन दिसत होते, दुसरीकडे विविध प्रकारची कुंभारकामे करणारी नायिका आपल्याला मडकी करताना दिसते, अगदी चिकणमाती, वाळू वापरून अनेकविध आकारांचे कुंभारकाम नजरेसमोर दिसत होते. शिवाय पार्वतीच्या व्यक्तिगत आयुष्यातील संघर्ष देहबोली व मुद्राभिनयातून प्रकट होत होते. पुराणकथा व आधुनिकतेचा स्पर्श आणि स्त्रीबाबतचे प्रखर सत्य असा संयोग असलेले हे एकपात्री नृत्य-नाट्य म्हणजे एक अनोखी भेट वाटली. एनसीपीएच्या खुल्या अंगणात चौथरा-चौकटीचे नेपथ्य उभारले होते. सभोवताली असलेला देशी-विदेशी प्रेक्षक या विलोभनीय प्रकाराने गुंतला, गुंगला आणि रंगून गेला होता. एखाद्या आंतरराष्ट्रीय महोत्सवातच आपण आहोत की काय, असे वाटून गेले.



PLAY ON WORDS - जगविख्यात लेखक पी.जी. वुडहाउस ह्यांच्या सांगीतिक कथेचे सादरीकरण करण्यात आले. कन्नड भाषेतील महाकाव्यातील काही काव्य-कथांचे नाट्यपूर्ण सादरीकरण एनसीपीएच्या एक्सपरिमेंटल थिएटरमध्ये करण्यात आले. त्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

तसेच, कन्नड साहित्य व नाटकांचे खास दालन होते. यात समृद्ध साहित्यासाठी ख्यातनाम असलेल्या कन्नड भाषेतील उत्तमोत्तम पुस्तकांचे, नाट्य-संहितांचे खास प्रदर्शन भरवण्यात आले होते. दरवर्षी एका भारतीय भाषेचा सन्मान या प्रकारे केला जातो.

**सन्मान-सत्कार सोहळा**

यंदाचा उत्कृष्ट कवीचा मान दिला गेला मामंग दाई, अरुणाचलप्रदेश ह्यांना आणि त्याचवेळी त्यांच्याशी बातचीत केली अंजुम हसन ह्यांनी.

तमिळ भाषेतील ज्येष्ठ लेखिका सी.एस. लक्ष्मीअंबाई ह्यांना २०२३ सालचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले. अरुनावा सिन्हा ह्यांनी त्यांच्या साहित्य-कर्तृत्वाचा आढावा घेणारी मुलाखत घेतली. ती खूप रंगली.

असा हा जागतिक स्तरावर प्रतिष्ठेचा मानला गेलेला साहित्य-संस्कृतीचा लिट फेस्ट-२०२३ अनेक कारणांनी गाजला. नामवंतांच्या साक्षेपी विचारांचे मंथन झाले. साधक-बाधक चर्चेतून वाचक-श्रोत्यांना समृद्ध करणारा विचार-विवेकाचा अमूल्य असा खजिना मिळाला. नाट्य व रंगमंचीय कलांमध्ये रस घेणाऱ्या प्रेक्षकांना अमूर्तापासून विविध ढंग असलेले परफॉरमन्स बघायला मिळाले. ज्यांना काही शिकायचे आहे त्यांच्यासाठी ऑनलाइन व थेट सहभागी होण्याची वर्कशॉप/कार्यशाळा अनुभवायला मिळाल्या. शिवाय आयुष्यासाठी उपयोगी पडेल अशा आठवणी, विचारांचे धन आणि पुस्तकांचा नजराणा असंख्य आठवणींसह भेट मिळाला. टाटा लिट फेस्ट-२०२३ म्हणजे एक दूरदृष्टी असलेल्या आदर्श साहित्य संमेलनाचा वस्तुपाठ. साहित्य-कलाक्षेत्रातील दिग्गज व नवोदितांना एकाच व्यासपीठावर आणून श्रोत्यांना नव्या-जुन्यांच्या संगमाचा आनंद देणारे अनोखे संमेलन. साऱ्या जगातला भारतीय साहित्याची, इथल्या लेखकांची-कवींची आणि त्यांच्यावर उत्साहाने प्रेम करणाऱ्या हजारो श्रोत्यांची-वाचकवर्गाची ओळख करून देणारे टाटा लिट फेस्ट म्हणजे एक प्रकारचा समाजमनाचा आरसाच आहे.

**- राजीव जोशी**
लेखक-रंगभूमी अभ्यासक
rmjoshi52@yahoo.co.in



संजीवनी खेर

# चित्रा मृद्‌गल

हिंदीतील नामवंत लेखिका म्हणून चित्रा मुदगल यांचे नाव घेतले जाते. त्या आजच्या जगाचे चित्रण करतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा आपल्या जवळपासच्या, समकालीन वाटतात.ज्यांनी मुंबईचा गिरणी कामगारांचा संघर्ष पाहिला, जाणला, विविध कंपन्यांतील कामगारांचे हक्कांसाठी दिलेले लढे पाहिले असतील त्या लोकांच्या नजरेसमोर तो सारा नुकताच भूतकाळ झालेला काळ उभा राहील असे वर्णन त्यांच्या लेखनातून उभे राहते. त्यांचे केवळ लेखन नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातही हे कामगारांचे दु:ख समजून प्रत्यक्ष लढ्यात उतरणे, ही लेखकाची सामाजिक जबाबदारी मानणे महत्त्वाचे आणि वेगळे आहे. म्हणून त्यांच्यावर एपिसोड करावासा वाटला. ही लेखिका आजच्या विषयावर लिहिते. समाजातील, कुटुंबातील दुटप्पीपणा जो घडत असतो पण आपल्याला बोचत नाही तो ती ठळक करते, त्याची जाणीव करून देते.

चित्रांचा जन्म एका धनाढ्य जमीनदार परिवारात १० डिसेंबर १९४३ साली चेन्नई इथे झाला. त्यांच्या पारंपरिक गावात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. उनाओ ह्या गावात काही काळ त्यांनी घालवला. मुंबई आणि छोटे गाव असे शाळेसाठी वडिलांच्या बदल्यांनुसार होत राहिले. चित्राचे वडील नेव्हीत होते. सारे घराणेच तसे सामंती वागणारे आणि अत्यंत प्रतिष्ठित होते. आजोबा ठाकूर बजरंग सिंग हे व्हिक्टोरिया क्रॉसप्राप्त डॉक्टर होते. त्यांचा रुबाब, दरारा नि प्रतिष्ठा होती. एक काका फिल्म इंडस्ट्रीत तर दुसरे पोलिसखात्यात होते. सर्वांना आपल्या सामाजिक, राजकीय प्रतिष्ठेचा अहं होता. तो नुसता गर्व नव्हे तर इतरांना क:पदार्थ लेखायचा होता. घरच्या स्त्रिया नि मुलाबाळांवरही शिस्त, नियम यांचा जबरदस्त काच होता. आपली प्रतिष्ठा त्यांना सर्वात महत्त्वाची वाटत होती. ह्या साऱ्या वातावरणाचा चित्रावर खोल परिणाम झाला. खास करून आईसही वडील जसे हिडीसफिडीस करून बोलत ते फार खटकत असे. वास्तविक आईही मोठ्या तालुकेदारांची




चित्रा मृद्‌गल

मुलगी होती, पण माहेरच्या घरात मुलींना शिक्षणाचा रिवाज नसल्याने तिचे शिक्षण फक्त अक्षर ओळखीपर्यंतच मर्यादित होते. आजोबा, वडील शिस्तीच्या बाबत कडक होते. तरी घरी आजीमुळे थोडे गांधीजींच्या चरखा चालवण्याचे आणि धार्मिक ग्रंथांच्या पठणांचे संस्कार होते. त्यामुळे घराला थोडे हळवे नि मायेचे पांघरूण असे. वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत चित्रा आजोळीच राहिल्या.

ठाकूरांच्या घरात मुलांना घोडेस्वारी आणि शिकारीचे रीतसर शिक्षण दिले जात असे. शिकारीविषयी छोट्या चित्राच्या मनात तिरस्कार होता. घोडेस्वारीत एकदा तिच्या गुडघ्याला जखम झाली तर ती कळवळली. त्याहून अधिक वडिलांचे टोमणेयुक्त शब्द तिला अधिक जखमी करून गेले,

'अडाणी आईची ही अडाणी लेक!!' तेव्हापासून त्यांच्या मनात वडिलांच्या विरोधात राग खदखदत राहिला. इतका की शाळेच्या हस्तलिखितातील कवितेतून तो बाहेर पडला शिक्षकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी असे व्यक्त न होण्याची समज दिली. परंतु वडील आईचा जो पाणउतारा करत त्याची त्यांच्या मनात चीड बसली होती. आई अत्यंत सहनशील, कामसू, सुगरण होती. ती कधीही पतीविरुद्ध ब्र काढत नसे. घरसंसार, मुलेबाळे हे तिचे सर्वस्व होते.




चित्राचे शिक्षण मुंबईत पार्ला आणि घाटकोपरच्या सोमय्या कॉलेजमध्ये त्यांनी अनेक कलांत भाग घेतला. भरतनाट्यम शिकल्या. चित्रकला त्यांना बाळपणांपासूनच आवडत होती म्हणून जेजेतून डिप्लोमा केला. पुढे एसएनडीटीतून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण केले. खरे तर कविता हे तिचे पहिले प्रेम होते. मुंबईत तिने श्रमिक महिलांसाठी जागरण आणि स्वाधार तसेच कामगार संघटनांत हिरिरीने काम केले.

त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या निर्णयातही घरची प्रतिष्ठा आड आली. टाइम्सच्या सारिका मासिकाचे संपादक अवध नारायण मुद्‌गल यासारख्या विद्वान, साहित्यिक, संपादकांच्या प्रेमात चित्रा पडल्या. दोघांनी विवाहाचा निर्णय घेतला. चित्रांच्या घरच्यांचा ह्या आंतरजातीय लग्नाला विरोध होता. अवध नारायण ब्राह्मण आणि ही ठाकूर! वास्तविक तिला वाटले की पती आपल्याहून उच्च जातीचा असल्याने घरचे मानतील, पण छे! वडिलांनी अनेक प्रकारे हे लग्न थांबवण्याचा प्रयत्न केला. दोघांत फूट पाडायचा प्रयत्न केला. 'माझ्या ड्रायव्हरइतक्या, ४०० रुपये कमावणारा जावई!' असे बोलले.

आई म्हणाली, 'हे ठाकूर इतके निर्दयी आहेत की मुलीने त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल असे काही केले तर तिला सहजपणे विहिरीत ढकलतील आणि पाय घसरून पडून मेली; असे सांगतील.' घरच्यांचा विरोध पाहून दोघांनी अत्यंत साधेपणाने, मित्रमंडळींच्या उपस्थितीत आर्य समाजपद्धतीने विवाह केला. नि अलिशान वाड्यांत राहिलेली चित्रा आनंदाने एका चाळीत संसार करू लागल्या. पहिल्या भेटीपासूनच अवध नारायण यांच्या स्पष्ट बोलण्याचा तिने अनुभव घेतला होता. त्यांनी त्यांची एक कथा सारिकासाठी आणून संपादक अवध नरायण यांना दिली होती. ती वाचून संपादकांनी सांगितले, 'तुम्हाला कथेबद्दल अ की ब माहीत नाही. अगोदर देशीविदेशी साहित्यकारांचे लेखन वाचून घ्या आणि मग कथा लिहायला सुरुवात करा.'

चित्रांचा पतीमुळे अनेक महान हिंदी साहित्यिकांशी परिचय झाला. त्यांनी अनेक सामाजिक कामात योगदान दिले. त्यांच्या कथेत काल्पनिक स्त्री दुःख, छळ वा कोंडी नाही, तर ह्या काळात, ह्या शहरातील जीवनाच्या झगडयांत जो अन्याय होताना दिसत होता त्याचे चित्रण आहे. मग महानगरातील घरं, नोकऱ्या, धनवानांचे निमशहरी भागातून कामाच्या शोधात आलेल्यांना कामं देऊन शोषण करणे. इथली गुंडगिरी, स्त्रियांचे लैंगिक शोषण, राजकीय नेत्यांची भांडवलदारांशी हातमिळवणी आणि त्यातून समोर येणारे भीषण वास्तव त्यांच्या लेखनातून आपल्याला वाचायला मिळते. त्या फक्त सामाजिक स्थितीवरच लिहितात असे नाही, तर आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या, अगदी घराघरात घडणाऱ्या अयोग्य बाबींवरही लिहितात. तेव्हा तर ते वाचकालाही आरसा दाखवणारे लेखन असते. त्यांच्या 'गिलीगडू' ह्या कथासंग्रहात वयस्क आईवडिलांची सुनेच्या राज्यात जी केविलवाणी अवस्था होते त्याचे वास्तवदर्शी चित्रण आहे. 'आवा' ही त्यांची समकालीन मजूर आणि मालक यांच्या संघर्षावरील कादंबरी आहे. त्यात भरडल्या जाणाऱ्या समाजातील इतर घटकांचेही जीवन त्यात येते. ह्या कादंबरीसाठी त्यांना अनेक पारितोषिके मिळाली. 'आवा' म्हणजे कुंभाराची भट्टी, जिच्यात मातीची भांडी भाजली जाऊन त्यांना कलेचे रूप येते. हे त्यांनी प्रतीक म्हणून वापरले आहे. ह्या कादंबरीबद्दल मी सविस्तर नोंद करीनच; पण त्या अगोदर मी त्यांना मिळालेल्या साहित्यिक सन्मानांविषयी लिहिते. त्यांच्या समाज आणि स्त्रीकेंद्री लेखनाने त्यांना साहित्य अकादमी, व्यास सन्मान, आंतरराष्ट्रीय इंदु शर्मा सन्मान, वीर देव सन्मान, उ.प्र. हिंदी यांच्याकडून साहित्यभूषण सन्मान, फणीश्वर रेणू पुरस्कार, बिर्ला सन्मान असे अनेक प्रतिष्ठेचे सन्मान मिळाले आहेत. तसेच त्यांनी विपुल प्रमाणात केलेले लहान मुलांसाठीचे लेखनही नावाजले गेले आहे. पुरस्कार मिळाले आहेत. त्यांची चित्रेही लोकांच्या पसंतीला उतरली आहेत.

घरच्यांच्या विरोधाला त्यांनी न जुमानता केलेले लग्न आर्थिक ओढाताणीचे जरूर होते, पतीपत्नी दोघांनीही जाहिरातींसाठी लिहिणे, अनुवाद करणे असे उद्योग करून पैसे कमावले होते. तेव्हा अर्थात अवध नारायण यांची नोकरी सुरू होती. चित्राही शाळेत शिकवत होत्या. परंतु तेव्हाचे पगार

पाहता दोन मुलांसह संसार चालवणे ओढग्रस्तीचे जरूर होते, मात्र तेही त्यांना अत्यंत समाधानाचे नि सुखाचे होते. माहेरहून पैशांची मदत घेणे त्यांनी नाकारले होते. मुलगी लेखन, जाहिरात आणि मॉडेलिंग क्षेत्रात होती पण एका अपघातात ती आणि तिच्या पतीचा दु:खद अंत झाला. मुलगा राजीव हाही लेखन क्षेत्रात आहे. त्यांच्या लेखनातील अनेक घटना आपल्याभोवती झालेल्या आपल्यालाही जाणवतील.

घरातल्या वातावरणाचे खूप बारकाईने चित्रण केले आहे. तेव्हाचा सामंती परिवार, त्यातील नात्यांची उतरंड आपल्या नजरेसमोर उभी राहते. एकीकडे दारात आलेल्या महारणीला काकी म्हणायला लावणे, दुसरीकडे तिला स्पर्श केला म्हणून मार खाणे ह्या वागण्यातले दुटप्पीपण तिला लहानपणीही खटकत असे.

पुढे मुलीने जाहिरातक्षेत्रात काम करायला सुरुवात केल्यावर तेथील जगाची कल्पना येऊन चित्रा मुद्गल यांनी एक कथा लिहिली आहे 'एक जमीन अपनी'. ह्या पुस्तकाला फणिश्वरनाथ रेणूंच्या नावाचा पुरस्कार मिळाला आहे. जाहिरातक्षेत्रातील तणावाचे, सतत स्पर्धेचे, दुसऱ्याला मागे टाकून पुढे जाण्याचे जीवघेणे राजकारण चालू असते. वास्तविक तिथे अधिकारी स्तरावर काम करणाऱ्या व्यक्तींनादेखील शोषणाचे बळी व्हावे लागते. ज्या व्यक्ती ते करायचे नाकारतात त्यांना त्यांची किंमत द्यावी लागते. जगण्यातली विद्रुपता, विसंगती त्यांच्या कथेतून समोर येते. त्या स्त्रीच्या फक्त अगतिकतेचे चित्रण करत नाहीत तर तिचा यशस्वी लढादेखील अधोरेखित करतात.

या कादंबरीतील नायिका अंकिता ह्या उच्चशिक्षित, हुशार, कल्पक तरुणीला कॉपी रायटर म्हणून एका प्रसिद्ध ॲड कंपनीत नेमतात. वास्तविक तिच्या कामावर सारे खुश असतात. पण एका विशिष्ट मालदार कंपनीच्या अधिकाऱ्याचे अश्लील वागणे ती सहन करत नाही. 'कामाशी काम ठेवा' असे सुनावते. अर्थातच हे ॲड एजन्सीला परवडण्यासारखे नसते. क्लायंटने ते गृहीतच धरलेले असते. कंपनीचा मालक अंकिताची तडकाफडकी हकालपट्टी करतो. आणि उगीचच चांगला अकाऊंट गमावल्याचा शिक्का तिच्या माथी बसतो पण, ती तत्त्वनिष्ठ असल्याने ती त्याची पर्वा करत नाही. असे नोकरी सोडणे वा काढले जाणे सर्वांना परवडण्यासारखे नसते. त्यातून अंकिताचे वैवाहिक जीवनही सुखी नसते. नवरा असमंजस असून फक्त अधिकार गाजवत असतो. स्वत: मनमानी जीवन जगतो नि सारी बंधने तिच्यावरच येतात. ती गर्भ राहिल्यावर बोल्ड निर्णय घेऊन गर्भपात करून घेते. तिला ह्या बाळाला जगात आणून स्वत: कैदेत पडायचे आणि त्या जिवाला संकटात टाकायचे नसते. अंकिता घर नि नोकरी दोन्ही आघाड्यांवर संघर्ष करून यशस्वी होते. कंपनीत अंकिताच्या जागी नवीन चुणचुणीत हुशार नीता कॉपी रायटर म्हणून येते. सुरुवातीला सारे ठीक चाललेले असते, पण तिचा मवाळ स्वभाव पाहून क्लायंट हळूहळू आपले उद्दिष्ट स्पष्ट करू लागतात. तिलाही हा कामाचाच भाग आहे असे वाटू लागते. आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी ती त्यांच्या आहारी जाऊ लागते. मात्र काही काळातच तिला त्यातील फोलपणा जाणवू लागतो. त्यातून बाहेर पडायचा तिला मार्ग सापडत नाही. ह्या साऱ्या प्रकरणाने हताश होऊन ती आत्महत्या करते. एका टॅलेंटेड तरुणीचा असा करुण अंत होतो. हे आजच्या हावरट होत चाललेल्या समाजातील वास्तव लेखिकेने प्रभावीपणे मांडले आहे.

'गिलीगडू' ही आजच्या स्वार्थी होत चाललेल्या कुटुंबजनांचे वागणे टिपणारे कथानक आहे. एकीकडे एकत्र कुटुंबाचे गोडवे गायले जातात. त्यात वयस्क लोकांना आधार असतो, सोबत असते असे म्हटले जाते. एकापरीने ते बरोबरही आहे, पण त्या सोबतीची खूप मानहानिकारक किंमत वृद्ध लोकांना द्यावी लागते. काही दिवस मुलांच्या घरी राहणे वा मुलांनी म्हाताऱ्या आईवडिलांच्या बरोबर राहणे हा तरुण सून, मुलाकडून मान मिळण्याचा काळ असतो. परंतु जसजसे हे स्पष्ट होते की ही लोक आता कायमचेच इथे राहणार आहेत; मुलांच्या वागण्यात लक्षणीय बदल होत जातात. साधे घरातल्या वयस्काला समजा रेडिओचा आवाज पसंत असेल तर सुनबाईंकडून हे ऐकावे लागते की डॉगीला त्याचा त्रास होतोय वा त्याला ते हवेय, तुम्ही तसे वागायला हवे. तोही आपल्या घराचा सदस्य आहे.

गिलीगडू ह्या कादंबरीत लेखिकेने आजच्या वेगवान जगातील वयस्क लोकांच्या समस्या मांडल्या आहेत. दोन मित्रांच्या जीवनातल्या घटना आणि त्यातील एकाचा धक्कादायक निर्णय! जसवंतसिंह आणि विष्णू नारायणसिंग ही दोघेही उच्चपदावरून सेवानिवृत्त झालेले असतात. जसवंत आपल्या मुलांसह, तर विष्णू नारायण मुलाच्या कुटुंबीयांसह राहतोय. त्यांच्या या मित्राचा परिवार मोठा आहे. तीन विवाहित मुली, नातवंडे यांच्यासह तो राहतोय. त्याला घरात काडीचीही किंमत नाहीय/ त्याला काय हवेनको त्याने कुठे निजायचे हेदेखील सूनबाईच ठरवतात. नातवंडं आपापल्या शाळा-कॉलेजात मग्न. दोन शब्द बोलायलाही कुणाला वेळ नाही.

जसवंत बायकोच्या जाण्यानंतर कानपूरहून दिल्लीला आले. पण एकाकीच राहिले. मुलाने तर सांगितले की आता घरसंपत्तीचा तुम्हाला उपयोग काय? ते सारे विकून मुलांमध्ये पैसे वाटून टाका. मुलीलाही आईच्या दागिने आणि साड्यांमध्ये रस असतो. तिच्या मते बाबांच्या मुलाकडे राहण्याने त्यांचे कौटुंबिक जीवन कटकटीचे झालेय आणि नवराबायकोत भांडणे होत आहेत. बाबांनी सरळ पैसे वाटून वृद्धाश्रमात जावे. तिथे त्यांना सर्व सुखसोयी असतील तसेच समवयस्क मित्र मिळतील.

सून तर आरोप करते की सासरे स्त्रिया-मुलींकडे वाकड्या नजरेने पाहतात, त्यांनी मग रेडलाईट एरियातच जावे. हा प्रहार त्यांच्या जिव्हारी लागतो.

दुसरा मित्र विष्णू नारायण मुलांमध्ये, आपल्या परिवारात सुखी आहे असे सांगत असतो. प्रत्यक्षात मुले पैशांसाठी त्याच्यामागे तगादा लावत असतात. 'तू उगीचच दु:खी आहेस. आनंदात राहा.' असे तो जसवंतला समजावत असतो. मध्यंतरी त्यांची भेट नाही म्हणून जसवंत विष्णूकडे जातो तेव्हा कळते की तो मरण पावला आहे. शेजारचे एका अपत्यहीन जोडपे सांगते की घरच्यांनी त्यांचे जिणे हराम केले होते. एका कर्नलचा हा केलेला स्वत:चा अंत जसवंतसिंगला अस्वस्थ करतो. त्यातच त्याला कळते की त्याचा मुलगा आता अमेरिकेला चाललाय नि त्याने आपली व्यवस्था हरिद्वारच्या आश्रमात केली आहे. तेव्हा वैतागून तो कानपूरला जायचे ठरवतो. तिथे त्याचा जिच्यावर जीव जडलेला असतो ती विधवा सुनगुणिया त्यांची देखभाल करायला तयार असते. त्यांच्या मनात तिच्याशी विवाह करायचे घाटत असते, पण तिला काय वाटते हेही महत्त्वाचे असते. तिची मुले असतात. पण ते तिकडे जायचे ठरवतात. कादंबरी इथेच संपते.

लेखिकेने दिलेला उपाय हा खरे अंतिम उपाय आहे का? कोण जाणे. एकाकीपणावर असेलही. पुरुष माणसांना आपणच घराचे कर्ते आहोत, आपल्यामुळे हे सारे चालते हा 'अहम' विसरणे अवघड जाते. हाही मुद्दा आहेच. दोन्ही बाजूंनी तडजोड करणे गरजेचे आहे तरच म्हातारपण सोपे सुखाचे जाऊ शकते. ही सांगणे सोपे आहे. अमलात आणणे अवघड. परंतु त्यावरच घराची शांतता अवलंबून आहे. हे सत्य गिलीगडू ठळक करते. या नावाचा अर्थ चिमण्या असा आहे जे घरातल्या नातींना उद्देशून आहे. हिंदीतील ही कादंबरी 'लॉस्ट डेज' ह्या नावाने प्रियंका सरकारने इंग्रजीत अनुवादित केली आहे.

तसेच पोटासाठी मुंबई महानगरीला आलेल्या गरीब मजुरांच्या जीवनाचे दर्शन 'पोस्ट ऑफिस २०३ नालासोपारा' ह्या लोकलच्या अखेरच्या स्टेशनवरील जीवन चित्रित केले आहे. सामान्यत: ज्यांच्या जीवनाबद्दल आपल्याला जाणूनही घ्यावेसे वाटत नाही अशांचे जीवन लेखिका आपल्यासमोर मांडते. तिच्या बहुतेक कादंबऱ्यांत मुंबई आपल्यासमोर जिवंत होऊन आपल्या बहुढंगी रूपात उभी राहते. आज आपल्याला कामगार चळवळी थंडावल्यागत दिसतात. पण ह्या कादंबरीचा काळ हा दत्ता सामंत ह्यांच्या काळातील सामाजिक, आर्थिक स्थितीचा आहे.

अंगावर काटा येईल असे मुंबईतील वास्तव लेखिकेने चितारलेले आहे.

चित्रा मुद्गलची बृहदकादंबरी आहे 'आवा'. जिचा अनुवाद याच नावाने वसुधा सहस्रबुद्धे यांनी केलाय, जो पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केला आहे.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com





डॉ. सौ अंजली पटवर्धन कुलकर्णी

# विहिरीची गोष्ट!

डहाणूजवळ वसलेल्या, महाराष्ट्र-गुजरात राज्यांच्या सीमारेषेवर असलेल्या बोर्डी या टुमदार गावात आमच्या संस्थेची पहिली शाळा १९२० साली स्थापन झाली. पुढे त्यात हळूहळू केजी ते पीजी आणि संशोधन अशी टप्प्याटप्प्याने भर पडत गेली. आज संस्थेचा विस्तार हा महाराष्ट्रात नाशिक, मुंबई आणि पालघर अशा तीन विभागांत झालेला आहे आणि गेल्या एकशे चार वर्षात एकशेचाळीसच्या वर शैक्षणिक युनिट कार्यरत आहेत. बोर्डीपासून कोसबाड अगदी आठ-दहा किलोमीटर अंतरावर आहे की जिथे पद्मभूषण ताराबाई मोडक, पद्मश्री अनुताई वाघ कार्यरत होत्या आणि त्यांनी आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम घेतले. अनुताई आणि आमच्या संस्थेचे समान ध्येय आहे- समाजातील वंचितांचे शिक्षणातून उत्थान! बोर्डी गावाची लोकसंख्या साडेसात हजाराच्या आसपास आणि आमच्या शिक्षणसंकुलात रोज सात हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. हाही एक चमत्कारच!

तर अशा या आमच्या बोर्डी शिक्षण संकुलात घडलेला काही वर्षांपूर्वीचा एक प्रसंग. आमच्या शाळा-महाविद्यालया-समोर विस्तीर्ण अरब महासागर पसरलेला असला तरी त्याचे पाणी दैनंदिन गरजांसाठी उपयोगात आणणे शक्य नाही.त्यासाठी संकुलात असलेल्या गोड्या पाण्याच्या चार विहिरी म्हणजे आमच्या लेखी सोन्याहून मौल्यवान.त्यामुळे त्यांची नियमित स्वच्छता राखणे,त्यांची देखभाल करणे याला खूपच महत्व दिले जाते. मध्यंतरी असे जाणवले की विध्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या विहिरींवर झाकणे घालणे आवश्यक आहे.मात्र झाकण घातले तरी पाणी उपसायला,गाळ काढायला,नियमित देखभाल करायला ते सोयीस्कर असणे ही गरजेचे आहे.

या कामात निष्णात असलेल्या गावातल्याच व्यक्तीच्या मदतीने पहिल्या विहिरीवर झाकण घालण्याचे काम सुरू झाले.त्यांची कल्पना अशी होती, की विहिरीच्या मधोमध सिमेंटचा एक खांब पक्का रोवून त्याच्या बाजूने छत्रीसारखी संपूर्ण विहिरीवर जाळी बसवायची. तिला एक छोटी झडप ठेवायची की जी उघडून विहिरीत खाली उतरता येणे शक्य होईल. पहिल्या विहिरीच्या कामासाठी त्यांनी दोन आदिवासी मदतनीस घेतले होते. त्यातला एक कामगार विहिरीत उतरून काम करत होता व त्याला लागणाऱ्या गोष्टी वर उभा असलेला कामगार पुरवत होता. विहिरीत उतरलेला मजूर विहिरीच्या बाहेर असलेल्या मजुराला देत असलेल्या सूचना, आदेश तो तंतोतंत पाळत होता. आम्हीही कुतूहलाने त्यांच्यातला समन्वय लक्षपूर्वक बघत होतो. तीनएक दिवसांत पहिल्या विहिरीचे झाकण पूर्ण झाले.

आम्हाला हवे तसे काम झाल्याने उरलेल्या विहिरींवरही असेच आच्छादन घालायचे ठरले. त्यानुसार दुसऱ्या विहिरीचे काम सुरू झाले. यावेळी मात्र एक बदल झाला होता. आधीच्या दोघा आदिवासी मुलांपैकी एक जण येऊ न शकल्याने एक नवीन मुलगा मदतनीस म्हणून आला होता. विहिरीत उतरलेल्या मुलाने सूचना द्यायला सुरुवात केली, पण वर उभ्या असलेल्या मुलाला काहीच जमेना, तो गडबडून गेला. विहिरीत आत असलेला मजूर त्याला सांगून-समजावून थकला. शेवटी अगदी कातावलेला, वैतागलेला, तो विहिरीबाहेर आला आणि म्हणाला, हा कसला कुचकामी पोऱ्या आणला आहे? याला या कामातले काहीही कळत नाही. ठोंब्यासारखा नुसता उभा आहे. खरे तर त्याला कोणत्याच कामातले काहीच कळणार नाही कारण त्याने 'खिचडी' खाल्ली आहे! आम्ही आजूबाजूला जमलेलो सगळे आधी त्याच्या चिडलेल्या अवताराकडे बघून हसायलाच लागलो. खिचडीचा त्याने केलेला उल्लेखही कळेना. क्षणभराने माझ्या लक्षात आले की हे खिचडी प्रकरण म्हणजे त्याला म्हणायचे आहे की 'हा मुलगा शाळेत गेलेला आहे व त्याने मध्यान्ह भोजनाच्या उपक्रमांतर्गत मिळणारी खिचडी खाल्लेली आहे. म्हणजेच शाळेत शिक्षण घेतल्याने या मुलाकडे उपजतच असलेल्या कलाकौशल्यांचा त्याला विसर

पडलेला आहे- असे त्या चिडलेल्या मुलास अभिप्रेत होते. या खिचडी खाण्याचा मथितार्थ ध्यानात आल्या क्षणी माझे हसू तर मावळलेच. मला जाणवले की त्या मुलाने आमच्या शिक्षण प्रसाराच्या सर्व दाव्यांना आव्हान दिले असून संस्थात्मक शिक्षणावर एक जळजळीत चपराक मारली आहे. आमच्या संस्थेने गेली शंभर वर्षे शिक्षणप्रसारातून समाजसुधारणा याचे जे असिधारा व्रत स्वीकारले आहे, शिक्षणानेच प्रगती शक्य असल्याचा विश्वास बाळगला आहे, गेल्या शंभरहून अधिक वर्षात ज्या थोर शिक्षकांनी या आदिवासीबहुल भागात शिक्षणप्रसारासाठी आयुष्य वेचले त्या सगळ्यांच्या योगदानाचे काय? या मुलाच्या मनामधे संस्थात्मक शिक्षणाबद्धल असलेला आकस, राग, संशय अविश्वास, हा तो एका शिक्षण-संस्थेच्या प्रांगणात उभा राहून, संस्थाचालकांच्या समोर व्यक्त करताना यत्किंचीतही संकोचला नाही. त्याच्या मनात असलेली शिक्षणाबद्दलची अनास्था व्यक्त करण्याचे धाडस त्याच्यात आहे. एका क्षणात, एका वाक्यात या आदिवासी मुलाने प्रातिनिधिक स्वरूपात आजवरच्या शिक्षणपद्धतीला बिनकामाची ठरवत निकालात काढली होती. शालेय शिक्षण म्हणजे मध्यान्ह भोजन आणि खिचडी असे समीकरणच झाले होते. हे धक्कादायक वाटले तरी खरे आहे. पोषणाहार मिळतो म्हणून पालक पाल्यांना शाळेत पाठवतात, ज्यामुळे पटावरची विद्यार्थिसंख्या टिकून राहते व हळूहळू वर्गात जे शिकवले जाते ते आत्मसात करण्यासाठी मुलांना उद्युक्त करता येते.

त्या मुलाच्या प्रतिक्रियेमुळे मात्र माझ्या मनात विचारांची अनेक आवर्तने उठली. शिक्षणव्यवस्था या विषयाबद्दल मुळापासून जाणून घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. वर्गामध्ये अभ्यासक्रम शिकवत असताना नेमके असे काय घडते की ज्यामुळे सहज शिक्षणातून, इतरांचे अनुकरण करत शिक्षण, कला कौशल्य आत्मसात करण्यामध्ये अडचण निर्माण होत असवी? मग उपजत असलेल्या कलागुणांची जाणीव, ओळख आणि जोपासना ही शालेय अथवा महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेत असतानाही करणे शक्य आहे का, आणि कसे, याचा शोध घेणे सुरू झाले.

शिक्षणाची प्रक्रिया ही सामान्यपणे 'शिकविले' जाणे आणि 'शिकणे' या दरम्यान मर्यादित राहिलेली आहे. तसे बघायला गेलो तर आपले 'शिक्षण' कायम सुरुच असते- कधी अनुभवातून, कधी एकमेकांशी केलेल्या संवादातून, इतरांच्या वर्तनाच्या निरीक्षणातून. या सर्वच बाबींचा परिणाम व्यक्तीच्या विचारांवर, ज्ञानावर, श्रद्धेवर आणि त्यायोगे वर्तनावर होताना दिसतो. शिकणे ही एक गतिमान आणि बहुआयामी प्रक्रिया आहे. मिळालेल्या ज्ञानावर योग्य संस्कार करणारी प्रक्रिया आहे.हे ज्ञान निरीक्षणातून, संभाषणातून, अनुभवातून आणि अभ्यासातून मिळालेले असते.

मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याने कळत-नकळत तो असे विचार आणि वर्तन अंगीकारतो की जे सर्वमान्य होईल आणि समाजाची स्वीकृती चटकन मिळेल. त्याने अनुभवले असेल की आपल्या बोलण्यात इंग्रजी शब्द वापरणाऱ्या अथवा इंग्रजी जाणणाऱ्या व्यक्तीला समाजात मान दिला जातोय, अशी व्यक्ती यशस्वी होताना दिसतेय तर तोही इंग्रजी शिकण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच ज्या वर्तनाला सामूहिक पसंती मिळते, तिचा सर्वसंमतीने योग्य आचार म्हणून स्वीकार केला जातो. मग अशा समान वर्तन असलेल्यांचा गट, समूह स्थापन होतो. या समाजात काही समान वैशिष्ट्ये आढळतात अशा वेगवेगळ्या गटांच्या समाजमान्य वैशिष्ट्यांचे अनुकरण करण्याला वाव मिळतो आणि त्यातून त्या त्या समूहाचे काही वर्तनासंबंधीचे निकष तयार होतात. या निकषांचा संस्थात्मक पातळीवर स्वीकार होऊन यातून एक वैशिष्ट्यपूर्ण समाजाची निर्मिती होते.

शाळा या संस्थेचे उदाहरण घेतले तर असे दिसते की शाळेची स्वतःची एक शिस्त व व्यवस्था असते व यातील सभासदांनी ती पाळायचीच असते. अन्यथा दंडात्मक कारवाई होऊ शकते. वक्तशीरपणा, स्वच्छ पोशाख, योग्य केशरचना, अशा काही बाबींवर शाळा प्रभाव टाकत असते. कोणतीही संस्था असो, ती तिच्या सभासदांच्या विचार आणि वर्तनावर प्रभाव टाकून, बदल घडवून शिकवण्याची प्रक्रिया सुरू ठेवते.

याचा अर्थ असा, की शिक्षणप्रक्रियेचा परीघ हा खूप व्यापक, अमर्याद आणि सामाजिक संवादावर आधारलेला आहे. मात्र शिक्षण म्हटले की सहसा शाळा-महाविद्यालये यातून मिळणारे शिक्षण एवढेच अभिप्रेत असते. त्यामुळे शिक्षणाचा व्यापक परीघ संकुचित होत असतो. शाळा हेच शिक्षणाचे केंद्र आहे असे म्हणतो तेव्हा संस्थात्मक शिक्षण आणि जीवनशिक्षण यांच्यातील नात्याला छेद दिला जातो. त्यामुळे संस्थात्मक शिक्षणाबद्दल बोलताना औपचारिक शिक्षण गृहीत धरून अनौपचारिक शिक्षणाचा केवळ प्रभाव आणि मूल्यच नाही तर अगदी त्याचे अस्तित्वच नाकारले जाते.

शाळा, महविद्यालय यातील शिक्षण हे घंटेच्या तालावर चालणारे असते. दिवसातली पहिली घंटा वाजली की शिक्षण सुरू, शेवटची घंटा वाजली की शिक्षण बंद असा काहीसा प्रकार! म्हणूच खेळाची, चित्रकलेची, नाटकाची, संगीताची आवड असणारा पण पुस्तकी अभ्यासाला नाखूष असणारा विध्यार्थी हा 'ढ' गटात ढकलला जातो तर पुस्तके वाचणारा, प्रश्न सोडवणारा, विद्यार्थी 'अ' तुकडीत जाऊन बसतो. चांगले, वाईट, उच्च, नीच, हुशार, कमी हुशार, यातील फरक कळण्याआधीच विद्यार्थ्यांची वर्गवारी होऊन जाते. त्यामुळे स्वतः विचार करायला न शिकलेला विद्यार्थी-कदाचित असा विचार करायला पुढेही कधीच न शिकणारा विद्यार्थी-त्याच्यावर मारलेला हा शिक्का निमूटपणे स्वीकारतो, व ती

वर्गवारी मान्य करतो.

वर्गातले सर्वच व्यवहार हे शिक्षककेंद्री असल्याने अभ्यासक्रमावर शिक्षकांचे वर्चस्व असते. शाळा-महाविद्यालयांपुरते बोलायचे तर विध्यार्थ्यांसमोर शिक्षक हेच आदर्श असतात. या वर्गांमध्ये शिक्षण हे एकतर्फी होत राहते, ते एकप्रकारे आदेशात्मक बनते व विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विचारप्रक्रियेची गळचेपी होते. स्वतंत्र विचार करण्याच्या क्षमतेचा वापर न झाल्याने ती सुप्तावस्थेत जाऊन कालांतराने लोप पावते. शिक्षकाने सतत घास भरवल्यामुळे (स्पून फीडिंग) संस्थात्मक शिक्षणाच्या प्रक्रियेतून घडणारा विद्यार्थी निर्णय घेण्याचा प्रसंग आल्यास दिशाहीन बनतो, कल्पकतेने समस्येचे निराकरण करण्यास असमर्थ ठरतो. मनात प्रश्न निर्माण होणे, कुतूहल वाटणे, चिकित्सक बुद्धीने ज्ञानाचे ग्रहण करणे या शिक्षणाला पोषक असणाऱ्या क्रिया घडत नसल्याने एकप्रकारे शिक्षणच घडत नाही की काय हा गंभीर प्रश्न आहे!

म्हणून शिक्षणाचा उपास आणि मध्यान्ह भोजन हे समीकरण अस्वस्थ करणारे आहे! हा उपास संपवायचा कसा याबद्दल पुढील लेखात...

**– डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

## ऊर्जापुराण

**शशिकांत धारणे**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**


शशिकांत धारणे यांनी 'ऊर्जापुराण' ह्या पुस्तकात ऊर्जेविषयीच्या सर्व बाबींचा दीडशे पानांत परामर्श घेतला आहे. विशेषतः, भारतातील ऊर्जेविषयीच्या वस्तुस्थितीवर योग्य चर्चा केलेली आहे, हे महत्त्वाचे. हे पुस्तक अतिशय वाचनीय आहे आणि ते तंत्रज्ञानातील सखोल जाण नसलेल्या लोकांनाही समजेल, अशा प्रकारे लिहिलेले आहे. पुस्तक वाचून झाल्यावर ऊर्जेचे महत्त्व, तिची निर्मिती, वापर, त्यांचे पर्यावरणावर आणि आपल्या जीवनावर होणारे परिणाम वाचकांच्या दीर्घकाल लक्षात राहतील. **– उदय गायतोंडे**

**॥ग्रंथाली॥**

## चिंतन

**भाग ४**

**शरद काळे**




**मूल्य ५०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**

चिंतनमधील सगळे लेख हे मर्यादित शब्दांमध्ये वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक लेखातील विषयाची साद्यंत माहिती यात असेलच असे नाही. तसा उद्देशही नाही. पण जर एखादा विषय वाचकाला आवडला तर त्यावर अधिक वाचन करण्यास त्याने प्रवृत्त व्हावे हीच अपेक्षा त्यात आहे. या भागात फक्त एक्कावन्न लेखांचा समावेश केला आहे.



राजीव श्रीखंडे

# अलेक्झाडंर दयुमा

## The Count of Monte Cristo by Alexandre Dumas

अलेक्झांडर दयुमा हा विश्वविख्यात फ्रेंच लेखक. अपार वाचकवर्ग लाभलेल्या फ्रेंच लेखकांमध्ये दयुमाचे स्थान फार वरच्या क्रमांकावर आहे. त्याचा जन्म १८०२ साली पॅरिसपासून काही अंतरावर असलेल्या एका छोट्या गावात झाला. त्याचे वडील नेपोलियनच्या लष्करात फार मोठ्या हुद्द्यावर कार्यरत होते. अशा खानदानी घराण्यात जन्म झाल्यामुळे दयुमा याला त्याचा चांगलाच फायदा मिळाला. लुई फिलिप म्हणजेच ड्युक ऑफ ऑर्लिन्स याच्याकडे तरुण दयुमाला लेखक म्हणून काम करायची संधी मिळाली. तिथे त्याने काही नियतकालिकांसाठी लेखन करण्यास सुरुवात केली. दयुमा हे खरे तर दयुमाच्या आजीचे माहेरचे आडनाव आणि तेच नाव त्याने लेखन करताना धारण केले. दयुमाची आजी ही हैरीयन वंशाची होती.

पुढे दयुमाने नाटक लिहिण्यास सुरुवात केली. त्याचे पहिले नाटक १८२९ साली रंगभूमीवर आले आणि त्याला प्रचंड यश मिळाले. त्याचे आणखी एक नाटक पुढच्याच वर्षी रंगभूमीवर आले आणि त्यालाही उत्तम यश मिळाले. त्यामुळेच दयुमाने पूर्ण वेळ लेखन करण्याचा निर्णय घेतला.

१८३० च्या फ्रेंच राज्यक्रांतीत दयुमाने सक्रिय भाग घेतला. या राज्यक्रांतीमुळे त्याचा पूर्वीचा आश्रयदाता लुई फिलिप हा राजा बनला. फ्रान्सला थोडे राजकीय स्थैर्य आले होते. हा काळ नियतकालिकांच्या आणि वृत्तपत्रांच्या सुगीचा काळ होता. पूर्वी कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध व्हायच्या. त्यामुळे त्यांचीही मागणी वाढली आणि म्हणून दयुमा कादंबरीलेखनाकडे वळला. दयुमाच्या बहुतेक कादंबऱ्या या ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या साहसकथा होत्या. दयुमाने बरेच साहाय्यक कामाला ठेवले होते जे त्याला ऐतिहासिक घटनांची माहिती देत आणि कधी कधी कथानकाच्या रूपरेषाही सुचवत. या सर्वांमध्ये ऑगस्ट मॅक्केट हा प्रसिद्ध होता.

दयुमाच्या कादंबऱ्या प्रचंड लोकप्रिय झाल्या. त्यांची लगोलग इंग्रजी आणि जगातल्या इतर भाषांत भाषांतरे प्रसिद्ध होऊ लागली. त्याला भरपूर पैसा मिळू लागला. त्याने खूप पैसा कमावला आणि त्याच्या श्रीमंती, स्वच्छंदी जीवनशैलीमुळे तो गमावलादेखील. हा पाठशिवणीचा खेळ दयुमाच्या आयुष्यभर चालू होता, पण या सगळ्यात त्याच्या लेखनात कधी खंड पडला नाही.

आपली राजकीय मते तो अतिशय आक्रमकपणे मांडायचा. त्यामुळे १८५० च्या सुमारास त्याचे राज्यकर्त्यांशी मतभेद झाले. त्यातच त्याच्या कर्जदात्यांचा त्याच्यामागे तगादा लागला होता. या दोन्ही कारणांमुळे दयुमाने फ्रान्स सोडले आणि बरीच वर्षे तो फ्रान्सच्या बाहेरच होता. त्या काळात त्याने भरपूर प्रवास केला. बेल्जियम, इटली, जर्मनी, रशिया ते अगदी इंग्लंडपर्यंत. त्याचा स्वभाव तसा स्वस्थ बसणाऱ्यांतला नव्हता. त्यामुळेच त्याने इटलीच्या एकीकरणाच्या लढाईत सक्रिय भाग घेतला. त्या वेळेला त्याची प्रसिद्ध इटालियन नेता गॅरिबाल्डीशी मैत्री झाली.

जवळजवळ १३ वर्षांनी म्हणजेच १८६४ साली दयुमा फ्रान्सला परतला. त्याचे लेखन चालूच होते. १८७० साली त्याचा हृदयविकाराने मृत्यू झाला.

अलेक्झांडर दयुमा हे जागतिक वाङ्मयातील एक अचाट आणि अफाट व्यक्तिमत्त्व. ६८ वर्षाच्या आयुष्यात दयुमाने प्रचंड लेखन केले. एका अभ्यासकाने असे सिद्ध केले आहे की त्याच्या लिखाणाची पृष्ठसंख्या जवळजवळ एक लाख एवढी भरते. दयुमाचे लेखनही चतुरस्र होते. कथा, कादंबऱ्या, राजकीय विश्लेषण, नाटके, ललित लेखन, प्रवासवर्णने, निबंध इत्यादी.

आज दयुमाचे पॅरिसच्या बाहेर असलेले घर त्याचेच म्युझियम म्हणून प्रसिद्ध आहे. पॅरिस मेट्रो स्टेशनला त्याचे नाव देण्यात आले आहे.

त्याचा चाहतावर्ग नेहमीच मोठ्या संख्येचा होता आणि आहे. वेगवेगळ्या स्तरांतील अनेक लोक त्याचे चाहते होते आणि आहेत. यात मोठमोठे लेखक, नाटककार, टीकाकार,

विचारवंत, तत्त्वज्ञानी, राजकीय पुढारी यांचा समावेश होतो.

प्रसिद्ध इंग्रजी लेखक आणि नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ याने असे म्हटले आहे की Dumas was a summit of Art. Nobody ever could or did or will improve upon Duma's romances and plays. किंवा जगप्रसिद्ध फ्रेंच लेखक व्हिक्टर हयुगोने असे म्हटले आहे की– Alexander Dumas is more than French, he is European, he is more than European, he is Universal.

इतक्या वर्षांनंतरही दयुमाच्या अनेक प्रसिद्ध कादंबऱ्या आवडीने वाचल्या जातात. त्याच्या नवनव्या आवृत्त्या निघतात. जागतिक वाङ्मयामध्ये जे काही थोडे अलौकिक लेखक होऊन गेले त्यात दयुमाला मानाचे स्थान मिळालेले आहे. The Three Musketeers, Twenty Years After, Ten Years Later (ज्यात The Man in the Iron Mask चा समावेश होतो), The Black Tulip, The Women's War, Geroges या दयुमाच्या काही जगप्रसिद्ध कादंबऱ्या आणि अर्थातच दयुमाची सर्वात लोकप्रिय आणि जगविख्यात असलेली कादंबरी म्हणजेच The Count of Monte Cristo.


आता या कादंबरीविषयी...

१८४४ ते १८४६ या दोन वर्षांत क्रमशः प्रसिद्ध झालेली ही दयुमाची जरा वेगळ्या प्रवृत्तीची कादंबरी आहे. तिलाही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे आणि या कादंबरीच्या कथानकाचा कालखंड १८१५ ते १८३९ असा आहे. कथानकाला ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे त्या वेळची फ्रान्सची राजकीय परिस्थिती थोडी समजून घेणे गरजेचे आहे. नेपोलियन सत्ता प्रथम संपुष्टात आली ती १८१४ साली. त्यानंतर त्याला St. Helena बेटावर एकांतवासात ठेवण्यात आले. तिकडून तो १८१५ साली निसटला. परत फ्रान्सला येऊन त्याने आपली सत्ता प्रस्थापित केली, पण ती टिकली Waterloo च्या लढाईपर्यंतच. कारण त्यात त्याचा पराभव झाला. हा कालखंड होता फक्त १०० दिवसांचा.

या कादंबरीची सुरुवात होते नेपोलियन ज्या दिवशी फ्रान्सकडे यायला निघतो त्या दिवशी. याच दिवशी फ्रान्समधील प्रसिद्ध मार्से बंदरात एक जहाज मोठ्या प्रवासावरून येते. जहाजाच्या मालकांना तेव्हा असे कळते की प्रवासातच जहाजाच्या कप्तानाचा मृत्यू झाला आहे आणि त्याचा मुख्य साहाय्यक अधिकारी एडमॉ दान्ते याने आपल्या हिमतीवर ते जहाज सुखरूप परत आणलेले आहे. त्यामुळे जहाजाचे मालक खुश होऊन दान्तेला कप्तानपदी बढती देतात, घसघशीत पगारवाढीसकट.

एडमॉ दान्ते हा मार्से शहरातच राहणारा उमदा तरुण असतो. आनंदी, प्रेमळ, मनमिळावू, सरळ, सालस, अत्यंत कर्तव्यदक्ष. त्याचे वृद्ध वडील आणि त्याची प्रेयसी मेर्सिदी असा त्याचा छोटा परिवार असतो. कप्तानपदी बढती मिळाल्यामुळे आता आपले आयुष्य स्थिरावले असा विचार करून दान्ते त्याच्या प्रेयसीला लग्नाबद्दल विचारतो आणि मग ती दोघे लग्नाचा दिवसही ठरतात. दान्तेचा हा उत्कर्ष दोन लोकांच्या डोळ्यांत खुपायला लागतो. एक असतो त्याच्या जहाजावरचा सहकारी आणि दुसरा मेर्सिदीचा एक लांबचा भाऊ, जो तिच्या प्रेमात असतो. ती दोघे मिळून एक कारस्थान करतात आणि दान्तेवर देशद्रोहाच्या आरोपाचे कुभांड रचतात. त्यात झालेले असते असे की जहाज परत घेऊन येताना वृद्ध कप्तानाच्या अखेरच्या इच्छेनुसार दान्ते थोडा वेळ St. Helena बेटावर






**अलेक्झांडर दयुमा**

थांबतो आणि त्याला तिकडे एक पत्र दिले जाते जे त्याला एका माणसाला पोचवायचे असते. याचा फायदा घेऊन ही दोघे एका मॅजिस्ट्रेटला पत्र लिहून दान्तेवर देशद्रोहाचा आरोप करतात.

लग्नाच्या दिवशीच दान्तेला अटक होते. ज्या न्यायाधीशासमोर त्याला नेण्यात येते, त्यालाही दान्तेच्या जबानीमुळे कळून चुकतं की तो पूर्णपणे निर्दोष आहे. परंतु आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी तो पुरावा गायब करतो आणि दान्तेला जन्मठेपेसाठी तुरुंगात धाडतो. हा तुरुंग असतो शॅट्यु डी एफ – मार्सेपासून काही अंतरावर समुद्रात असलेल्या एका अभेद्य बेटावर. या तुरुंगाची अशी ख्याती असते की त्यातून कोणीही कैदी कधीच जिवंत बाहेर आलेला नसतो.

आनंदाच्या अत्युच्च क्षणी दान्तेचे सगळं आयुष्य उद्ध्वस्त होते. तो काळकोठडीत खितपत पडलेला असतो. काही वर्षांनी एकेदिवशी अनपेक्षितरीत्या त्याची शेजारच्या

कोठडीतल्या एका वृद्ध कैद्याशी भेट आणि ओळख होते. त्या कैद्याचे नाव असते Abbe Faria. हा एक विद्वान माणूस असतो आणि अशाच एका कुठल्यातरी खोट्या आरोपाखाली त्याला जन्मठेपेची शिक्षा झालेली असते. पुढच्या काही वर्षांत त्यांच्यामध्ये जणू वडील-मुलाचे नाते तयार होते. Abbe Faria हा दान्तेला बऱ्याच गोष्टी शिकवतो. त्याच्यावर ही वेळ कोणामुळे आली आहे हेही तो दान्तेला पुराव्यासकट सिद्ध करून सांगतो. वृद्ध Abbe Faria ला एका गुप्त खजिन्याची माहिती असते. तीही तो दान्तेला पुरवतो आणि असेही सांगतो, की पुढे दैवयोगाने दान्ते तुरुंगाबाहेर पडलाच तर त्या खजिन्यावर त्याचीच मालकी होईल.

काही वर्षांनंतर दान्ते एकटाच नाट्यमयरित्या तुरुंगातून पळतो. मग तो Abbe Faria च्या खजिन्याचा शोध घेऊन त्यावर ताबा मिळवतो. ज्या बेटावर खजिना असतो त्या बेटाचं नाव असतं Monte Cristo. हे बेट तो कायदेशीररीत्या विकत घेतो. मग काही वर्ष तो आपल्या लोकांचा आणि शत्रूंचा कसून तपास करतो, त्यांची इत्थंभूत माहिती घेतो. जेव्हा त्याला कळतं की त्याचे सगळे शत्रू पॅरिसमध्ये आहेत, आयुष्यात अत्यंत यशस्वी झालेले आहेत तेव्हा तो The Count of Monte Cristo या नावानं पॅरिसमध्ये अवतरतो. त्याचा हेतू एकच असतो आणि तो म्हणजे ज्यांनी त्याचं आयुष्य उद्ध्वस्त केलं आहे त्यांच्यावर सूड उगवणं. मध्यंतरी तेवीस-चोवीस वर्षांचा काळ गेला असल्यामुळे दान्तेला कोणीच ओळखत नाही. आणि मग इतकी वर्षं डोक्यात आखलेल्या, पक्क्या केलेल्या सुडाच्या योजना तो अमलात आणण्यास सुरुवात करतो. दान्ते कसा सूड घेतो हे पुढे चित्रित केलेलं आहे.

The Count of Monte Cristo ही एक सूडकथा आहे. साहसकथेमध्ये असलेला सगळा मालमसाला म्हणजे उमदा नायक, सुंदर नायिका, तिरस्करणीय खलनायक, काळकोठडी, तुरुंग, नायकानं त्यात भोगलेल्या यमयातना, त्याची नाट्यमय सुटका, गुप्त खजिना आणि त्याचा शोध, चोर-दरोडेखोर इत्यादी सगळं या कादंबरीत असलं तरी तिचा मूळ पिंड हा सूडकथेचाच आहे. पण दयुमाचं मोठेपण असं, की ही कादंबरी फक्त सूडकथाच न रहाता त्याच्या पलीकडे जाऊन अन्याय, जुलूम, अपराध, सूड, दंड, दैव या मानवी संकल्पनांच्या बाबतीत काही मूलभूत प्रश्न उपस्थित करते.

ही कथा फिरते ती एडमॉ दान्तेभोवतीच. तो कोण होता आणि तो कोण होतो याची ही खरी कथा आहे. १९ व्या कोवळ्या वर्षी तुरुंगात गेलेला दान्ते आणि १५ वर्षांनी तुरुंगातून पळून गेलेला दान्ते यांच्यात जमीनअस्मानाचा फरक आहे. आणि पॅरिसमध्ये आलेल्या The Count of Monte Cristo मध्ये तर दान्तेचा लवलेशही नसतो.

ही दान्तेच्या अंतर्मनातील संघर्षाचीदेखील कथा आहे. जुन्या दान्तेकडे जाण्याची नवीन दान्तेची धडपड, त्याचा हा प्रवास याची ही कथा आहे. ही कादंबरी फार मोठी आहे. तिचा पट विशाल आहे आणि कित्येक चित्रविचित्र व्यक्तिरेखांनी ती भरलेली आहे. या कादंबरीत बरीच उपकथानकंदेखील आहेत आणि त्यामुळे वाचताना काही वेळा गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते. पण दयुमानं हे सगळे पेरलेले दुवे शेवटी इतक्या कौशल्यानं आणि सहजतेनं एकत्र आणलेले आहेत की त्यांचा संदर्भ उलगडतो आणि आपल्याला समाधान मिळतं. कथानक अतिशय गतिशील आहे आणि कथा कुठेही रेंगाळत नाही. दयुमाची अत्यंत प्रभावी कथनशैली तर जगजाहीरच आहे आणि या ९०० पानांच्या कादंबरीत त्याचा पूर्ण प्रत्यय येतो.

ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध झाल्यामुळे तिच्यावर जशा काही मर्यादा पडल्या आहेत, त्याचप्रमाणे तिची काही बलस्थानंही आहेत. कथानकाचं अतिशय परिणामकारक सादरीकरण करण्यात दयुमाचा हातखंडा असल्यामुळे अखेरच्या क्षणापर्यंत आपल्याला गुंगवून ठेवण्याचं जबरदस्त सामर्थ्य या कादंबरीत आहे. संवाद जुन्या काळातले असल्यामुळे सुरुवातीला जरा वेगळं वाटत असलं तरीपण नंतर त्याची सवय झाली की ते किती चोख आणि प्रभावी आहेत ते कळतं.

पात्रांच्या भाऊगर्दीतही दयुमानं प्रमुख व्यक्तिरेखा ताकदीनं चितारल्या आहेत. भाषांतरित असली तरी भाषेचा प्रभाव जाणवतो आणि जाणकार ज्या मुक्तकंठानं दयुमाच्या भाषाशैलीचं कौतुक करतात त्याची आठवण होते. या कादंबरीतील मुख्य Count च्या तोंडची काही वाक्ये तर कायम स्मरणात राहतील अशीच आहेत. उदाहरणार्थ- In this troubled times, the difference between patriotism and treason is merely a matter of dates.

I, betrayed, sacrificed, buried, have risen from my tomb, by grace of god, to punish those men, he sent me for that purpose and here I am.

किंवा - Never forget that until the day when god shall design to reveal the future to man, all human wisdom is summed in those two words - 'wait and hope'

उल्लेख केल्याप्रमाणे कथा प्रामुख्याने एडमॉ दान्तेचीच आहे. काउंट बनून पॅरिसमध्ये आल्यानंतर पुढच्या सगळ्या कथानकावर त्याचा बऱ्याच प्रसंगात सहभाग नसतानादेखील त्याच्याच व्यक्तिमत्त्वाचं दाट सावट पडलेलं दिसतं. सुडाशिवाय दुसऱ्या कुठल्याच गोष्टीला त्याच्या मनात थारा नाही, पण ज्यांनी त्याला त्याच्या पडत्या काळात मदत केलेली असते किंवा मदतीचा प्रयत्न केला असतो त्यांचे सर्व ऋण मानणारा, व्याजासकट नव्हे त्याहीपलीकडे जाऊन त्याची परतफेड करणारा, गतआठवणींनी कधी विव्हळ होणारा पण सूड घेण्याच्या निर्धारात अविचल असणारा, दयामायेचा स्पर्श नसलेला. परंतु त्याच्या

सुडाच्या वणव्यात दोषींबरोबर निरपराधीही होरपळून निघतात, तेव्हा शेवटी थांबून स्वतःलाच प्रश्न करणारा, अतिशय निष्ठुर, निर्दयी तर कधी कमालीचा भावूक होणारा, फक्त वैयक्तिक सुडासाठी नाही तर अपराध्यांना त्यांच्या घोर अपराधांची सजा देण्यासाठीच आपला पुनर्जन्म झाला आहे यावर अपार श्रद्धा असणारा असा हा विलक्षण कथानायक जागतिक वाङ्मयात आपल्याला अभावानंच आढळतो. दान्तेचा सूड कितीही भयंकर, अमानुष असला, मानवी मूल्यांशी कितीही फारकत घेणारा असला, कितीही दाहक, सर्वव्यापी आणि सर्वनाशी असला, तरीही त्यात त्याला संपूर्ण यश मिळतं की नाही याचीच आपल्याला काळजी लागून रहाते आणि तो पूर्णपणे यशस्वी व्हावा अशीच आपली मनोमन इच्छा असते.

आदिअनादी काळापासून चालत आलेला दृष्ट आणि सुष्ट प्रवृत्तीचा हा चिरंतन झगडा विशाल कथापटलावर दयुमानं अतिशय ठळकपणे मांडला आहे. दान्ते हा एक केवळ मर्त्य माणूस नसून अपराध्यांना योग्य ते ईश्वरी शासन करण्यासाठी विधात्यानं पाठवलेला तो जणू एखादा न्यायाधीशच आहे याची आपल्याला तो खात्रीच पटवून देतो आणि त्यामुळेच ही कादंबरी फक्त सूडकथा रहात नाही तर एका वेगळ्याच उंचीवर जाते. अनेक जाणकारांच्या मते ही दयुमाची सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे आणि यात नवल ते काय?

सन १८४४ ते १८४६ या दोन वर्षांत क्रमशः प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीनं प्रथम फ्रान्सला आणि मग जगाला वेड लावलं. त्यावेळी ती युरोपातली सर्वात लोकप्रिय कादंबरी होती. दयुमाची ही कादंबरी आज जागतिक वाङ्मयात एक क्लासिक म्हणून मान्यता पावलेली आहे. क्लासिक म्हणजे ती कलाकृती जी काळाच्या प्रवाहातदेखील समर्थपणे टिकून राहते, जी कालातीत आहे.

या कादंबरीला प्रसिद्ध होऊन आज १७५ वर्षांहून अधिक काळ लोटलेला आहे. या इतक्या वर्षांत ती सतत प्रकाशनात राहिली आहे. तिच्या आजही नवनव्या आवृत्त्या निघत आहेत. जगातील १००हून अधिक भाषांत तिचं भाषांतर झालेलं आहे. (भा.रा. भागवतांनी या कादंबरीचा पहिला काही भाग कैद्यांचा खजिना या नावानं खूप वर्षांपूर्वी मराठीत भाषांतरीत केला होता आणि नेहमीप्रमाणे भागवतांचं भाषांतर उत्कृष्ट आहे) या कादंबरीवर आजवर कित्येक चित्रपट निघाले आहेत (अगदी हॉलिवूडमध्येदेखील). कित्येक नाटकं, टीव्हीमालिका, सांगीतिका लिहिल्या गेलेल्या आहेत. अनेक लेखकांनी आपापल्या कल्पनेप्रमाणे या कादंबरीचा पुढचा भाग लिहून प्रकाशित केला आहे. तिच्यावर कॉमिक्स निघालेली आहेत. अगदी व्हिडीओ गेमदेखील आलेले आहेत. तिची प्रेरणा घेऊन अनेक लेखकांनी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. उदाहरणार्थ, ल्यू वॉलेस या अमेरिकन लेखकाची Ben-Hur ही जगप्रसिद्ध कादंबरी.

अलेक्झांडर दयुमाच्या असामान्य प्रतिभेतून आणि भारलेल्या लेखणीतून साकार झालेली, जुलूम, अपराध, सूड, मानवी न्याय, ईश्वरी शासन किंवा दंड, दया, क्षमा, प्रेम, आशा आणि विमोचन (Redemption) या सगळ्यांचं विलोभनीय मिश्रण असणारी एडमॉ दान्ते ऊर्फ काउंट ऑफ मॉन्टे क्रिस्टोची ही जगावेगळी कथा जागतिक वाङ्मयात अजरामर झालेली आहे. जगाच्या भावविश्वात तिनं आपलं एक वेगळं, स्वतंत्र आणि अढळ स्थान निर्माण केलेलं आहे.

**– राजीव श्रीखंडे**

rshrikhande@yahoo.com

ग्रंथाली




## ...आणि चांदणे उन्हात हसले

**।। निस्सिम प्रेमाचा अनुबंध।।**

**डॉ. राजश्री पाटील**

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते, भारताचे श्वाईट्झर जोडपे असलेल्या डॉ. मंदा आणि डॉ. प्रकाश आमटे या दांपत्याची ही एक लोकविलक्षण प्रेमकथा आहे. या कादंबरीत या दांपत्याचं ध्येयाप्रती समर्पित कार्यानं सिद्ध झालेलं असामान्यत्व तटस्थपणे चित्रित झालं आहे. चौकोनी कुटुंबाचं आयुष्य जगताना, त्या पलीकडे पाहत थोडं मन मोठं करीत समाजातील 'नाही रे' वर्गासाठी अल्पस्वल्प का होईना काहीतरी करावं, या जाणिवेचा बोध ही कादंबरी सहजतेनं देते.

**– लक्ष्मीकांत देशमुख**



**शरद काळे**

# कॉप २८ परिषदेचे फलित

५ ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत दुबई येथे हवामानबदलविषयीची जागतिक परिषद संपन्न झाली. एकूण ९७३७२ लोकांनी यात विविध देशांतर्फे भाग घेतला होता. ज्यात विविध देशांचे ५१६९५ प्रतिनिधी, २५३६० निरीक्षक, ३९७२ इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमांचे सदस्य आणि १६३४५ स्थानिक आणि सचिवालय कर्मचारी यांचा समावेश होता. निरीक्षकांपैकी ४८८५ सदस्य हे यजमान देश, संयुक्त अरब अमिरातीचे (UAE) होते. याशिवाय १७७ प्रतिनिधी, २८२१ निरीक्षक आणि ७६ माध्यम प्रतिनिधींसह आणखी ३०७४ लोकांनी ऑनलाइन सहभागासाठी नोंदणी केली होती. कॉप-२८ (Conference of Parties to the UNFCCC-28 "युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेंट चेंज') ही आजपर्यंतची सर्वात मोठी संयुक्त राष्ट्रांची हवामानबदल परिषद होती.

सुरुवातीच्या सत्रादरम्यान, परिषदेत सहभागी देशांनी मागील वर्षी शर्म अल-शेख, इजिप्त येथे स्थापन केलेल्या नवीन तोटा आणि नुकसान (loss and damage funds) निधीला कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आणि अनेक पक्षांनी त्याच्या प्रारंभिक भांडवलासाठी आपापला वाटा जाहीर केला. हे यश संक्रमणकालीन समितीमध्ये झालेल्या करारामुळे शक्य झाले आहे. या समितीला ह्या निधीसाठी संस्थात्मक व्यवस्थेबद्दल शिफारस करण्यासाठी सन २०२३ मध्ये जबाबदारी देण्यात आली होती आणि त्यांची त्याविषयी बैठक झाली होती. बैठकीसाठी संबंधित देशांनी झपाट्याने अजेंडा स्वीकारला. अनेक वादग्रस्त मुद्यांसाठी पूर्वसत्रीय सल्लामसलत करार करण्यात आला होता, म्हणून हे कठीण काम सोपे झाले. प्रारंभिक महत्त्वाचे मुद्दे असूनही, संपूर्ण दोन आठवड्यांच्या बैठकीत वाटाघाटी करणे कठीण होते, विशेषत: या परिषदेच्या मध्यवर्ती परिणामांवर. पॅरिस करारांतर्गत पहिला ग्लोबल स्टॉकटेक (GST), ग्लोबल गोल ऑन ॲडाप्टेशनच्या (GG) अंमलबजावणीसाठी फ्रेमवर्क, कमी-ग्रीनहाऊस गॅस (GHG) उत्सर्जन आणि हवामानविकासासह वित्तप्रवाह निश्चित करण्यावर भर देण्यात आला.

दुसऱ्या आठवड्यात, पडद्यामागे मोठ्या प्रमाणावर वाटाघाटी झाल्या. ज्यामध्ये अध्यक्षपद, त्याचे नियुक्त मंत्री सह-सुविधाकर्ते आणि इतरांनी लँडिंग झोन ओळखण्याच्या उद्देशाने मसुदामजकुरावर द्विपक्षीय सल्लामसलत केली. जीएसटी निर्णयातील जीवाश्मइंधनाचा (फेजआऊट) वापर कमी करत नेण्यासंबंधीचा मुद्दा आणि GG च्या अंमलबजावणीच्या साधनांशी संबंधित वादाचे प्रमुख मुद्दे चर्चेसाठी घेण्यात आले. १२ डिसेंबर २०२३ रोजी बैठक वेळेवर संपवण्यासाठी अध्यक्षांचा इरादा असूनही, १३ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत सल्लामसलत सुरू राहिली. पहाटे, उर्वरित मुद्यांवरचे मसुदा निर्णय शेवटी पोस्ट केले गेले आणि मग परिषदेची सांगता झाली.

विविध देशांनी जागतिक तापमान वाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या अनुषंगाने हरितगृहवायूंच्या उत्सर्जनात जलद आणि शाश्वत कपात करण्याची गरज ओळखणाऱ्या GST वर निर्णय घेतला. ह्या निर्णयामुळे विविध देशांना त्यांच्या राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेल्या पुढील योगदानामध्ये महत्त्वाकांक्षी, कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे लक्ष्य गाठण्यासाठी, सर्व हरितगृहवायूक्षेत्रे आणि श्रेणी समाविष्ट करून, जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी प्रोत्साहित होण्यास मदत होईल. इतर बाबींबरोबर, या निर्णयात विविध देशांच्या राष्ट्रीय-निर्धारित पद्धतीने, जागतिक प्रयत्नांमध्ये योगदान देण्याचे आवाहन केले आहे. परिषदेत घेतले गेलेले निर्णय थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत.

- जागतिक स्तरावर अक्षय ऊर्जाक्षमता तिप्पट करणे आणि सन २०३० पर्यंत ऊर्जाकार्यक्षमता सुधारणांचा जागतिक सरासरी वार्षिक दर दुप्पट करणे;




निषेध केला, तरीसुद्धा, हा निर्णय जीवाश्मइंधनाच्या समाप्तीची सुरुवात म्हणून स्वीकारला गेला!

तोटा व नुकसान निधी संदर्भात या परिषदेमध्ये हवामान बदलाच्या सर्वात वाईट परिणामांचा सामना करणाऱ्या असुरक्षित राष्ट्रांना पाठिंबा देण्यासाठी ऐतिहासिक करार झाला. यामध्ये पुढील बाबींचा सम विेश असू शकतो : राष्ट्रीय प्रतिसाद योजनांचा विकास; अपुरी हवामान माहिती आणि डेटा संबोधित करणे आणि तात्पुरते आणि कायमस्वरूपी नुकसान आणि नुकसानीच्या बाबतीत, विस्थापन, पुनर्स्थापना आणि स्थलांतराच्या स्वरूपात न्याय्य, सुरक्षित आणि सन्माननीय मानवी गतिशीलतेला प्रोत्साहन देणे. ह्या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण मंडळ स्थापन केले जाईल, आणि निधीचे व्यवस्थापन सुरुवातीला जागतिक बँकेद्वारे केले जाईल. धनाढ्य राष्ट्रांकडून प्रथम या निधीला पाठिंबा देण्यासाठी घोषणा दुबईमध्ये करण्यात आली आणि सध्या एकूण ६५ कोटी जास्त निधी जमा झाला आहे.

नवीन सामूहिक परिमाणित उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने (New Common Quantified Goal - NCQG) बरीच प्रगती झाली. विकसनशील राष्ट्रांमध्ये हवामानबदलावर मात करण्यासाठी आणि त्यासाठी अनुकूल अशा उपक्रमांना वित्तपुरवठा करण्यासाठी विकसित राष्ट्रांनी वचन दिलेल्या १०० अब्ज डॉलर निधीवर ही प्रगती आधारित आहे. हा निधी गोळा होण्याचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण झालेले नाही, मात्र यावर्षी ते पूर्ण होईल असे वाटते. सध्या तरी आवश्यकता आहे त्यापेक्षा तो निधी खूपच कमी आहे.

हवामानबदल कमी करण्याच्या दृष्टीने, अनुकूल परिणाम घडवून आणण्यासाठी जागतिक ध्येय गाठण्यासठी, कॉप-२७ची योजना पुढे चालू ठेवत, या कॉप-२८ मध्ये हवामानबदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी साहाय्यकारी धोरणांवर भर देण्यात आला. अंतिम मजकुरात त्यासाठी वित्त दुप्पट करण्याची मागणी आणि आगामी वर्षांमध्ये जागतिक हवामानबदल कमी करण्याच्या दृष्टीने, अनुकूल परिणाम घडवून आणण्यासाठी आवश्यक त्या गरजांचे मूल्यांकन आणि देखरेख करण्याच्या योजना आहेत. सकारात्मक रितीने, जलसुरक्षा, परिसंस्था पुनर्संचयित आणि आरोग्य या लक्ष्यांसाठी मजकुरात स्पष्टपणे सन २०३० वर्ष निश्चित केले आहे. तथापि, अनुकूलन वित्त अंतर कमी करण्याच्या वचनबद्धतेच्या आसपास भाषा मात्र गुळमुळीत झाली! COP मजकूराच्या अंमलबजावणी विभागात

- कोळसाऊर्जा कमी करण्याच्या दिशेने जागतिक प्रयत्नांना गती देणे;
- निव्वळ शून्य उत्सर्जन ऊर्जाप्रणालीच्या दिशेने जागतिक स्तरावर प्रयत्नांना गती देणे, शून्य आणि कमी-कार्बन इंधनाचा योग्य वापर करून शतकाच्या मध्यापर्यंत किंवा त्यापूर्वी ते उद्दिष्ट गाठणे;
- ऊर्जाप्रणालींमध्ये जीवाश्म इंधनाचा वापर कमी करत नेणे, न्याय्य व सुव्यवस्थित रितीने, या दशकात गांभीर्याने प्रयत्नांना गतिमान करणे, आणि विज्ञानाच्या साहाय्याने, सन २०५० पर्यंत या इंधनांचा वापर शून्यावर आणणे;
- कमी-उत्सर्जन व हळूहळू शून्य उत्सर्जन ध्येय गाठण्यासाठी तंत्रज्ञानाचा वेग वाढवणे, त्यासाठी अक्षय ऊर्जा, परमाणुऊर्जा अधिक प्रमाणात वापरणे, नैसर्गिक स्रोतांचा कमीत कमी वापर आणि कार्बन कॅप्चरसारख्या नवीन तंत्रज्ञानाचा विकास करून कमी कार्बनउत्सर्जन गाठण्यासाठी अधिक हायड्रोजन उत्पादन करणे;
- सन २०३० पर्यंत विशेषत: मिथेनउत्सर्जन घटवून जागतिक स्तरावर कार्बन-डायऑक्साइडचे उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी करणे;
- पायाभूत सुविधांच्या विकासासह आणि शून्य आणि कमी उत्सर्जन करणाऱ्या वाहनांच्या जलद तैनातीसह विविध मार्गांवर रस्तेवाहतुकीतून उत्सर्जन कमी करण्यास गती देणे;
- अकार्यक्षम जीवाश्मइंधन अनुदाने टप्प्याटप्प्याने बंद करणे.

हे निर्णय ऊर्जा दारिद्र्य किंवा फक्त संक्रमणास संबोधित करत नाहीत त्यामुळे शक्य तितक्या लवकर जीएसटीवर तडजोड करणे किती कठीण होते हे परिषदेच्या अंतिम फलित मसुद्यात दिसून आले. जीवाश्मइंधनाच्या वापर कमी करत नेण्यासंबंधी स्पष्ट उल्लेख त्यात टाळण्यात आला. कोळसा आणि मिथेनवर जी भाषा वापरली ती गुळमुळीत स्वरूपाची होती. तथाकथित संक्रमणकालीन इंधनशी संबंधित त्रुटींचा अनेक प्रतिनिधींनी

अनुकूलन विभागातून वित्तपुरवठा करण्यासंबंधी प्रत्यक्षात उदासीनताच आहे. कॉप-२९ मध्ये वित्तपुरवठा अपेक्षा आणि लक्ष्यांबद्दल अतिरिक्त तपशील आवश्यक आहेत, अन्यथा निर्णय कागदावरच राहतील असे स्पष्ट संकेत जाणवतात.

**ग्लोबल स्टॉकटेक आणि जीवाश्मइंधन**

कॉप-२८ मध्ये ग्लोबल स्टॉकटेक हा सर्वात जास्त चर्चिला गेलेला विषय होता. उत्सर्जन आणि जीवाश्म इंधनासंबंधित भाषेवर अनेक आक्षेप घेतले गेल्यामुळे, अंतिम मजकुरात बरेच बदल करण्यात येऊन, मूळ उद्देश मात्र हरवला! त्यात सन २०२०-२०२५ दरम्यान सर्वोच्च जागतिक उत्सर्जनाच्या प्रक्षेपणाचा उल्लेख आहे. पूर्वऔद्योगिक पातळीपेक्षा जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित करणे आणि सन २०५० पर्यंत निव्वळ शून्यावर पोहोचणे या उद्दिष्टांशी सुसंगत उत्सर्जन कपातीभोवतीचे संरेखन (alignment) आता स्पष्ट केले आहे. अंतिम मसुदा अधिक प्रभावीपणे उत्सर्जन कमी करण्यासाठी विविध कृती करण्यासाठी राष्ट्रांना आवाहन करत आहे. तसेच सन २०३० पर्यंत विशेषत: मिथेनउत्सर्जनासह, जागतिक स्तरावर गैरकार्बनी उत्सर्जन कमी करण्याची गती वाढवून, ते लक्षणीयरीत्या कमी करण्याचा हेतूही त्यात नमूद करण्यात आला आहे.

दुर्दैवाने, काही संदिग्ध भाषेमुळे अंतिम मसुदा जितका प्रभावशाली असायला हवा होता, तसा झालेला नाही. त्यामध्ये कोळशाच्या विधानाला कोळशाचा वापर वेगाने खाली आणणे याऐवजी कोळशाचा वापर मर्यादित करणे असे विधान लिहिले गेले आहे! मग कोण ती मर्यादा ठरवून देणार आणि कोण ती पाळणार? असल्या गुळमुळीत विधानांमुळे त्या मसुद्याची परिणामकारकता अगदी शून्य होत नसली तरी उद्दिष्टपूर्तीसाठी मात्र घातक आहे. कोळशाचा वापर इंधन म्हणून करण्यात अनेक प्रगत देशही पुढे आहेत. ते असल्याच विधानांची दखल घेतात!

**कार्बन मार्केट**

दुबईतील परिषदेत आणखी एक महत्त्वाचा विषय हा कार्बन मार्केट होता. कार्बन मार्केट ही एक अर्थव्यवस्था आहे जिथे देश किंवा संस्था कार्बन क्रेडिट खरेदी आणि विक्री करू शकतात. त्यांच्या हवामानातील लक्ष्यांची पूर्तता करण्यासाठी हरितगृहवायूंचे प्रमाण कमी करण्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. ही बाजारपेठ उत्सर्जन कमी करणाऱ्या प्रकल्पांसाठी आर्थिक प्रोत्साहन देऊन किफायतशीर उत्सर्जन कमी करण्यास प्रोत्साहन देऊ शकते. तथापि, या बाजारांनाही विश्वासार्हतेच्या चिंतेने ग्रासले आहे. कार्बन क्रेडिट बाजाराचे पर्यवेक्षण कसे केले जाईल आणि विविध प्रकारच्या क्रेडिट्सचा हिशोब कसा केला जाईल ह्यावर एकवाक्यता येणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत, हे महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. याबाबत कोणताही करार झाला नाही आणि म्हणूनच त्या संबंधित मुख्य प्रश्नांना कॉप-२९ मध्ये संबोधित करणे आवश्यक आहे. मात्र या वर्षी त्यावर काहीतरी निर्णय व्हायला हवा होता, अशी नक्कीच अपेक्षा होती.

**इतर प्रमुख थीम (फक्त संक्रमण आणि निसर्ग)**

अंतिम COP मजकुरात न्याय्य संक्रमण वितरीत करण्याच्या काही महत्त्वाच्या कॉल-आउट्सचा समावेश आहे. ग्लोबल स्टॉकटेक, ॲडॉप्टेशनवरील ग्लोबल गोल, क्लायमेट फायनान्स आणि अंमलबजावणी करारांमध्ये न्याय्य संक्रमण हे एक महत्त्वाचे लक्ष होते. तथापि, उत्सर्जनमार्गापासून हवामान वित्तविषयक जबाबदाऱ्यांपर्यंत परिमाणात्मक दृष्टीने न्याय्य संक्रमणाचा अर्थ काय आहे यावर अधिक काम करणे आवश्यक आहे. ग्लोबल गोल ऑन ॲडाप्टेशनमध्येही निसर्गाचा थेट उल्लेख करण्यात आला होता, ज्याने इकोसिस्टिम-आधारित अनुकूलन आणि निसर्ग-आधारित सोल्युशनच्या वापरास गती देण्याबद्दल सांगितले होते. हवामानाच्या उद्दिष्टांना निसर्ग-सकारात्मकतेची आवश्यकता आहे, याची मान्यता वाढत आहे. २०३० मधील जंगलतोड करण्याचे आशादायक उद्दिष्टदेखील अंतिम मजकुराचा भाग होता.

अझरबैजानमधील बाकू शहर कॉप-२९ चे आयोजन करेल. संयुक्त अरब अमिरातीला पुन्हा अध्यक्षपदी येण्याची विनंती करण्यात आली होती, व परिषद बॉन, जर्मनी येथे घेण्यात येणार होती. परंतु त्यांनी नकार दिला. आर्मेनिया आणि रशियाने पुढील वर्षीच्या या परिषदेच्या आयोजनास असलेले आक्षेप मागे घेतल्यानंतर अझरबैजानमधील बाकू शहर त्यासाठी निश्चित करण्यात आले.

संयुक्त अरब अमिरातीने इतिहासातील सर्वात मोठ्या कॉपच्या परिषदेचे प्रभावी आयोजन व व्यवस्थापन केले. परिषदेत जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी तोटा व नुकसाननिधी आणि जीवाश्म इंधनापासून दूर संक्रमणाची स्पष्ट महत्त्वाकांक्षा यावर ऐतिहासिक करार झाले. तथापि, अंतिम लेखांकनामध्ये, कराराचा बराचसा भाग निरर्थक वाटतो. या क्षणाची जी निकड आहे तिकडे दुर्लक्ष करून सर्वात उष्ण वर्षात, जेव्हा प्रभावी उपाययोजनांची आवश्यकता असते, तेव्हा असले त्रोटक मसुदे निष्फळ ठरण्याचीच अधिक शक्यता असते!

**- शरद काळे**
sharadkale@gmail.com

ग्रंथाली

# वाचकदिनी प्रकाशित पुस्तके




## शहामृग

### रवींद्र शोभणे

रवींद्र शोभणे यांच्या 'शहामृग'मधील दीर्घकथांनी  माणसाच्या मुळापर्यंत पोहोचण्याचा केलेला हा प्रयत्न. तटस्थ. तरीही उत्कट आणि संयत.

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

## चौकटीबाहेर

### विनता कुलकर्णी




विनताच्या काही कथांमध्ये उल्लेख असलेले संमिश्र विवाह नवीन पिढीतील मराठी माणसांना त्यांच्या अमेरिकेतील मुला-मुलींमुळे अपरिचित नाहीत. अमेरिकन पार्श्वभूमी असलेल्या या कथांमधील नायिका खंबीर आहेत. वेळ पडली तर, अमेरिकेच्या अस्थिर व्हिसाची वाट पाहत, स्वत:च्या उच्चशिक्षणाचा उपयोग न करता आल्यामुळे, सोन्याच्या पिंजऱ्यामध्ये परावलंबी जीवन जगण्याऐवजी वेगळे निर्णय घेणाऱ्या आहेत. 'चौकटीबाहेर' या नावाला शोभेल अशा वेगळ्या कथा वाचकांना भावतील अशी आशा आहे.

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**




## असाधारण होता होता...

**भाग्यशृंखलांची मनोहर कहाणी**

### विनोद आलकरी

पुनरुत्थान झालेला भारत आणि युद्धांच्या छायेत असलेलं जग या पार्श्वभूमीवर जन्मलेल्या आणि लहान शहरात बालपण गेलेल्या विनोद आलकरी यांनी युनायटेड नेशन्समध्ये केलेल्या छोट्याशा सुरुवातीचा आलेख वाढत गेल्यावर, त्यांच्यावर आलेल्या प्रत्येक जबाबदारीला पूर्ण न्याय दिला. 'आजच्या युगातील कर्मयोगी' या शब्दाची पुष्टी करून त्याचा अर्थ अधोरेखित करणारं हे पुस्तक 'वाचायलाच हवं' या सदरात मोडणारं आहे.

**- संजय धारवाडकर**
'डायमंड इन माय पाम' या पुस्तकाचे लेखक

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# ‘सुटली ग शाळा’ आणि ‘हृदयस्वर’ दिवाळीसंध्या क्षणचित्रे







बाल दिवाळी अंक प्रकाशन व पुस्तकभेट – मनपा शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, अशोक नायगावकर यांच्या उपस्थितीत


राजेश कंकाळ



श्रीनिवास नार्वेकर


शुभदा चौकर


डॉ. मृण्मयी भजक


अशोक नायगावकर


सुदेश हिंगलासूपरकर


नीलेश दिवेकर





दिवाळी अंक प्रकाशन व पुस्तकभेट – पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, अभिनेते प्रदीप वेलणकर आणि एफडीए कमिशनर अभिमन्यू काळे यांच्या उपस्थितीत

निवेदक पुष्कर श्रोत्री डॉ. मृण्मयी भजक





‘हृदयस्वर’ – एक संगीत मैफल

मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर



डॉ. लतिका भानुशाली





विजयालक्ष्मी लिखित ‘एक घोट मृगजळाचा’ पुस्तकाचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्या हस्ते प्रकाशन

दिवाळी अंकांची प्रकाशने






मोनिका गजेंद्रगडकर


भारती सहस्रबुद्धे


शर्वरी शेवते

## 'विज्ञानधारा' आणि 'आरोग्ययात्रा' क्षणचित्रे





- डॉ. रविन थत्ते यांची मुलाखत घेताना डॉ. सतीश नाईक
- कोल्हापूर येथील परिसंवादात बोलताना डॉ. सतीश नाईक



डॉ. यश वेलणकर व डॉ. आशिष साबू



डॉ. सातव दांपत्याची मुलाखत घेताना डॉ. सतीश नाईक



डॉ. हेमंत जोशी आणि डॉ. राजेंद्र आगरकर





शरद काळे यांचा विद्यार्थ्यांशी संवाद व 'कुतूहलरत्न' प्रशस्तिपत्र देताना



'विज्ञानगप्पा'
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते



अनुपम नेरकर
ड्रोन प्रात्यक्षिक दाखवताना

---

## 'विज्ञानधारा' आणि 'आरोग्ययात्रा' सांगतासमारंभ



ज्येष्ठराज जोशी



अनिरुद्ध पंडित



अ.पां. देशपांडे



शरद काळे



नंदिनी थत्ते



डॉ. अंजली कुलकर्णी



सुधीर थत्ते





शशिकांत धारणे लिखित
'ऊर्जापुराण'
आणि
शरद काळे लिखित
'नाट्यातून विज्ञानाकडे भाग १ ते ३'
या पुस्तकांचे प्रकाशन







नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते रवींद्र शोभणे यांचा जाहीर सत्कार. त्यावेळी बोलताना डॉ. निर्मोही फडके, राजेश नार्वेकर व सत्काराला उत्तर देताना रवींद्र शोभणे







रवींद्र शोभणे यांच्या हस्ते 'माउली सेवा प्रतिष्ठान'ला अरुण साधू स्मृती अनुदान प्रदान. त्यावेळी बोलताना शेफाली साधू आणि डॉ. राजेंद्र धामणे







वाचकदिनी सूत्रसंचालन करताना महेंद्र कोडे आणि डॉ. मृण्मयी भजक

## वाचकदिनी डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते नवीन पुस्तकांचे प्रकाशन



डॉ. स्मिता दातार लिखित 'अयोध्येची ऊर्मिला' या पुस्तकाचे प्रकाशन



डॉ. अजित मगदूम लिखित 'न घेतलेला रस्ता' या पुस्तकाचे प्रकाशन



विनता कुलकर्णी लिखित 'चौकटीबाहेर' या पुस्तकाचे प्रकाशन



चांगदेव काळे लिखित 'घण, घाव आणि ऐरण' या पुस्तकाचे प्रकाशन



विनोद आलकरी लिखित 'असाधारण होता होता...' या पुस्तकाचे प्रकाशन



नीला चांदोरकर लिखित 'जगावेगळा लिंडबर्ग' या पुस्तकाचे प्रकाशन



शरद काळे लिखित 'चिंतन भाग ४' या पुस्तकाचे प्रकाशन



डॉ. निर्मोही फडके लिखित 'अनहद' या पुस्तकाचे प्रकाशन



सुधीर थत्ते–नंदिनी थत्ते लिखित 'नोबेलनगरी २०२३' या पुस्तकाचे प्रकाशन



रिचर्ड नुनीस लिखित 'वाडवळी शब्दकोश आणि व्युत्पत्ती शोध' या पुस्तकाचे प्रकाशन

## शास्त्रज्ञ पद्मभूषण ज्येष्ठराज जोशी यांच्या हस्ते यात्रेतील सहभागींचा विशेष स्मृतिचिन्ह देऊन सन्मान



यात्रेचे नेतृत्व – शरद काळे, डॉ. अंजली कुलकर्णी, सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते



डॉ. अजित मगदूम, प्रमोद नारायणे, जयू भाटकर, रवी देवधर आणि हेमंत जोशी



समीर कदम, माधुरी नेरकर, अनुपम नेरकर, महेंद्र कोंडे आणि महेश खरे



प्रियाल देवलाटकर, सौमित्र शिंदे, किशोर कांबळे आणि हरिप्रसाद जयस्वाल

ग्रंथाली

# वाचकदिनी प्रकाशित पुस्तके




**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २४० रुपये**

## ऊर्मिला

### डॉ. स्मिता दातार

रामायणात पुसट उल्लेख असलेली ऊर्मिला, चौदा वर्षं पतीच्या विरहाचं दुःख सोसत राहिली, एवढीच काय ती आपल्याला तिची ओळख. राम-लक्ष्मण-सीता वनवासात गेल्यावर मागे उरलेल्या ऊर्मिलेच्या अनुल्लेखानं ती विस्मृतीत गेली. आयुष्यभर राजभवनात राहिलेल्या ऊर्मिलेलाच खरा वनवास घडला. तरीही एकाकी पडलेली ऊर्मिला, मनस्वीपणे आयुष्याला भिडली. याचं सहज आणि ओघवत्या शैलीतलं चित्रण या कादंबरीतून अनुभवायला मिळतं. ऊर्मिलेच्या आयुष्याचा, तिच्या अस्तित्वाचा आणि तिच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा धांडोळा अतिशय वेगवान आणि रोचक पद्धतीनं या कथानकातून समोर येतो. ही काल्पनिक कादंबरी रामायणकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचंही प्रभावी चित्रण करते.

## अनहद

### निर्मोही फडके

स्वप्नील जगाबरोबर काही प्रमाणात गतकातरता, रोमँटिकतेच्या आकर्षणाबरोबरच सहजसंवादी सलगीची भाषा, काव्यात्मता, चिंतनशीलता, दृश्य रंगसंवेदनांचे घनदाट प्राचुर्य, संगीतादिचित्रांचे संदर्भ, हिंदी-उर्दूतील मिठीजुबान आणि मोहक शब्दकळेचे आकर्षण ही या गद्याची वैशिष्ट्ये होत. भाषेतील पद्मनादमेळाचे विलक्षण आकर्षण या गद्यशैलीस आहे. त्यामुळे, या ललितगद्यास खुल्या प्रसरणशील ललितगद्याचा घाट प्राप्त झाला आहे. 'अनहद' नादाचे प्रतिध्वनी वाचकांना बहुमुखी अर्थवलयांचा नक्कीच भरगच्च प्रत्यय देतील.

**– प्रा. डॉ. रणधीर शिंदे**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## न घेतलेला रस्ता

### डॉ. अजित मगदूम

अजित मगदूम यांनी इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे प्रदीर्घ काळ काम केले आहे. इंग्रजीबरोबरच मराठी वाङ्मयाचाही व्यासंग ते वाढवत गेले. मराठी साहित्याचे ते एक चोखंदळ वाचक, समीक्षक आणि संवेदनशील ललित लेखक आहेत. रॉबर्ट फ्रॉस्टच्या 'द रोड नॉट टेकन' या कवितेच्या शंभरीनिमित्त केलेली सखोल आणि मर्मग्राही चिकित्सा या पुस्तकाच्या 'न घेतलेला रस्ता' या शीर्षकलेखात केली आहे. पाश्चात्त्य साहित्यावरील लेख, ललित, वैचारिक लेख; तसेच, काही अनुवादित लेखही या पुस्तकात आहेत. या पुस्तकातील लेखांची शीर्षकं पाहिली की त्यांच्यातील बहुपेडी, आस्वादक सौंदर्यदृष्टीचे प्रत्यंतर येते. विविध विषयांवरील कसदार लेखांचे हे पुस्तक मराठी साहित्यविचारात भर घालणारे आहे.



किरण येले

# तुटलेपणाच्या कविता
# कवी सचिन शिंदे

*कोणतीही नवी उत्पत्ती होण्यासाठी बीजारोपण होणे ही पहिली अट असते. बीजारोपण होताना, बीज कोणत्या जातीचे आहे हे महत्त्वाचे असतेच; ते बीज कोणत्या मातीत पडत आहे, त्या बीजावर कोणते संस्कार होत आहेत, त्याची जोपासना कशी होत आहे यावर पुढे गर्भ कसा आहे हे निश्चित होते. संतकवी तुकाराममहाराज म्हणतात, शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी.*

बीज शुद्ध असेल तर कविताही शुद्ध होते. कविता शुद्ध असणे म्हणजे काय तर कवितेचा हेतू शुद्ध असणे. कविता सिद्धीसाठी लिहिली असेल, आत्मसंवादातून आली असेल तर तिला एक स्वतःचा झळाळ असतो. मात्र कविता प्रसिद्धीसाठी आणि कवीपणाच्या झुलीसाठी लिहिली असेल तर आपसूकच कवितात तो सूर जाणवून कविता कृतक वाटू लागते. सचिन शिंदे यांच्या कविता अशा आत्मसंवादातून आल्या असल्याचे जाणवते. त्यांच्या कवितांचे विषय नदी, पूर, दुष्काळ, बाई, गाईगुरे, गावशिवार, रानवाट, पांडुरंग, प्रेम असे आहेत. सचिन शिंदे बदलापूर शहरात राहत असून, नेरळ तालुका कर्जत येथील एका शाळेत शिक्षक म्हणून रुजू आहेत. गेली अनेक वर्षे ते कविता लिहीत आहेत, परंतु पुस्तकरूपात त्यांचे लेखन अजून येऊ शकलेले नाही. कवी आज शहरात राहत असला तरीही त्याची नाळ शेतीशी आणी तिथल्या मातीशी घट्ट जुळलेली आहे याचा प्रत्यय या कविता वाचताना येत राहतो आणि आपल्या मनात ग्रामीण प्रतलावरील जगण्याचा, तिथल्या जाणिवा आणि संवेदनांचा एक हळवा आलेख चित्रित होत राहतो. कोणत्याही व्यक्तीला आपल्या प्रिय गोष्टींचे तुटलेपण नेहमीच अस्वस्थ करत असते. हे अस्वस्थपण काही काळानंतर विरत जाते आणि मनावर बोथटपणाचा एक पदर चढत जातो. शहरात आलेला माणूस सुरुवातीस गावची झाडे, राने, पायवाटा, शेती, माती, गाईगुरे, नदी-झरे, या सगळ्यांच्या ओढीने गावी जात राहतो.



सचिन शिंदे

पुढे शहरात रुजल्यावर मग मात्र गावची जत्रा, सण आणि लग्नसमारंभाच्या निमित्ताने गावी जाऊ लागतो. कवी सचिन शिंदे यांच्या कविता वाचताना त्यांना अजूनही गावाच्या मातीच्या हाका येत असल्याचे जाणवते.

भरउन्हाच्या प्रहरी वाट चुकलेली नाव
काठावर उभं शांत एक उदासलं गाव (कविता : नदी)

अशा ओळी वाचताना लक्षात येतं की कवी आता मनाने गावात आणि शरीराने शहरात आहे. हे तुटलेपण या कवितातून प्रभावीपणे झरत राहते आणि ते झरताना काही वेगळ्या ओळी सचिन शिंदे लिहून जातात.

खोल डोहाच्या तळाशी दिसे शिंपल्याचा खच
पाय ठेवून पाण्यात थोडी थोडी नदी वाच
(कविता : थोडी थोडी नदी वाच)

या ओळीत पाय पाण्यात ठेवून थोडी थोडी नदी वाचण्याचे सूचन सुंदर आहे. कोणतीही गोष्ट अनुभवण्यासाठी त्यात उतरावे लागते तरच त्याचे आकलन होते. ती गोष्ट अनुभवताना समजून घेतानाही एकाच वेळी पूर्ण आकलन होत नाही. अंतराअंतराने जाणिवा प्रगल्भ होत जातात. डोळे प्रकाशाला वा अंधाराला सरावले जातात आणि मगच सारे स्पष्ट दिसू लागते. काही वेळ डोहात उभे राहिल्यावर काही वेळाने डोहातला डहुळ खाली बसतो आणि मग डोहाच्या तळाशी काय आहे हे दिसू लागते. म्हणून कवी लिहितो 'पाय ठेवून पाण्यात थोडी थोडी नदी वाच.'

सचिन शिंदे यांच्या कवितांतील अशा ओळी त्यांच्या कवितांचे वेगळेपण अधोरेखित करत राहतात.

कवी जसा गावाच्या बाबतीत संवेदनशील आहे तसाच तो बाईच्या बाबतीतही संवेदनशील आहे. या संग्रहात काही कवितांतून बाईचे जगणे अधोरेखित करताना कवी आणिक हळुवार होत जातो. 'वेदनेच्या पायवाटा' कवितेत कवी लिहितो,

तुझे झरणारे डोळे ओल्या पापणीच्या कडा
तुझ्या आसवांचा बाई पडे अंगणात सडा

कवी सचिन शिंदे यांना अभंगरचनेच्या शैलीची चांगली जाण आहे. त्या शैलीत आताला सल मांडताना ते लिहितात.

हंबरते कशी। तहानली गाय।
उचलेना पाय। आता बाई।। (नदीच्या डोहाला)

शिंदे यांा मानस पूर्ण होऊन 'पातीवरल्या बाया' हा कवितासंग्रह आकार घेत आहे. वाचक रसिक त्या संग्रहाचे स्वागत करो ही शुभेच्छा. त्यांच्या 'नदी' व 'थोडी थोडी नदी वाच' या कविता देत आहे.

**नदी**

नागमोडी नदीमाय वाहे भरून दुथडी
साद घाली पैलतीरा एक लाकडाची होडी

नदी जाते फुलवत काठावरल्या मळ्याला
दिसे शिवार नटून फुटे पाझर तळ्याला

लांब सरकते वाट उंच चढणीचा घाट
पाखरांच्या गुंजनाने जागे बोरबन दाट

गुरे उनाड चरती दूर दिसते कुरण
डोकावते पाण्यामधी गर्द बाभळीचे बन

वाऱ्यासवे थरथर लव्हाळांची बेटांवर
ऊन सांडते डोहात मनी हसते दुपार

भर उन्हाच्या प्रहरी वाट चुकलेली नाव
काठावर उभे शांत एक उदासलं गाव

सांज कलता उशाशी दूर क्षितिज पिवळे
डोहाच्या या काठावरी उभे तटस्थ बगळे

नदी वाहे वळणाने दुःख घेई उदरात
गाव निजते खुशाल दान घेई पदरात

**थोडी थोडी नदी वाच**

वाहे संथ निळे पाणी मध्ये उठती तरंग
काठावर परतुनी येते बगळ्यांची रांग

बंद क्षितिजाचे डोळे खोल नदीचा गाभारा
दिसे मेघ प्रतिबिंब फुटे प्रस्तरात झरा

करे टिटवी आक्रोश साऱ्या देहाला शहारा
जाळं टाके भोई तरी देते मासोळी गुंगारा

लाटा भिडती काठाला त्यांनी केलाय कांगावा
दोन थडीच्या मध्यान्ही हेलकावे खाती नावा

खचे बुरुज थडीचा माती डगरते खाली
मावळत्या किरणांनी आली पाण्यावर लाली

खोल डोहाच्या तळाशी दिसे शिंपल्याचा खच
पाय ठेवून पाण्यात थोडी थोडी नदी वाच

**– किरण येले**
kiran.yele@gmail.com

**– सचिन शिंदे**
संपर्क : ८४२१५२७५४२ / ९०४९५१७८३२

# 'ग्रंथाली'च्या विज्ञान-आरोग्ययात्रेत योगदान देता आल्याचा आनंद



माधुरी नेरकर

ग्रंथालीच्या ४९ व्या वाचकदिनाआधी, २४ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर दरम्यान ग्रंथाली महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांत आरोग्य व विज्ञानयात्रा काढणार असून, त्यात १ ते ३ डिसेंबर या कालावधीत अमरावती येथे असणार आहोत असा सुदेशदादाचा फोन आला. त्याच्या पूर्वतयारीसाठी २७ सप्टेंबरला महेश खरे येतील असे सांगितले. महेशदादा एक दिवसासाठी आले होते. आमच्याजवळ सहा तासच होते. एकही क्षण न गमावता आम्ही जास्तीत जास्त महत्त्वाच्या व्यक्ती, संस्था यांना भेटी देऊन या यात्रेविषयी माहिती दिली आणि सहकार्याचे आवाहन केले.

त्यानंतर शाळा, महाविद्यालयांना कार्यक्रम ठरवण्यासाठी मी भेटी दिल्या. त्यांना ग्रंथालीच्या कार्यक्रमाविषयी माहिती दिली आणि आम्हाला फक्त मुले, हॉल आणि माईकची व्यवस्था एवढीच आवश्यकता असल्याचे सांगितले. विज्ञान आणि आरोग्यविषयक कार्यक्रमात शास्त्रज्ञ, डॉक्टर मुलांशी थेट संवाद साधणार हे कळल्यावर ह्या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमास एखाददुसरा अपवाद वगळता सगळ्यांनी लगेच होकार दिला.

विज्ञानधाराअंतर्गत पद्मश्री शरद काळेसर येणार असल्याने शाळांना कुतूहल, आदर आणि दडपणही होते. दडपण घालवण्यासाठी काळेसरांच्या चिपळूणच्या कार्यक्रमाचे सुदेशदादाने पाठवलेले फोटो मी दाखवले तेव्हा त्यांना हायसे वाटले. एवढी मोठी आणि साधी व्यक्ती आपल्या संस्थेत येणार म्हणून मग आपसूकच मानही ताठ झाली. कार्यक्रम झाल्यावर असा कार्यक्रम परत घेऊ आणि आणखी मुलांना संधी देऊ असे म्हणाले. माझ्या बाबतीत सांगायचे झाल्यास ज्ञानी, व्रतस्थ काळेसरांसोबत शाळांमध्ये जाणे हा माझ्या आयुष्यातील अमूल्य ठेवा आहे. काळेसरांनी समाजऋण फेडण्याचे जे व्रत हाती घेतले आहे ते आदर्श असे आहे.

त्यांच्याप्रमाणेच काही डॉक्टरांनीदेखील आरोग्यविषयी प्रबोधन करण्यासाठी आपला तब्बल एक महिन्याचा वेळ दिला ही बाबदेखील खूपच मोलाची आहे.

१ डिसेंबरला मेळघाटातील डॉक्टर सातव दांपत्याची डॉ. सतीश नाईक यांनी मुलाखत घेतली. शहरात मोठे हॉस्पिटल टाकून सुखासीन जीवन जगण्यापेक्षा हे दांपत्य मेळघाटात आपली सेवा देत आहे. त्यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी, आदर्श असा आहे. अमरावतीत असूनही माझ्यासारख्या कित्येकांना त्यांचे हे कार्य माहीत नव्हते. ग्रंथालीच्या या कार्यक्रमामुळे ते माहीत झाले.

२ तारखेला डॉक्टर हेमंत जोशी आणि अमरावती येथील काही नामांकित डॉक्टर  यांचा निरोगी आयुष्य का आणि कसे या विषयावरील परिसंवाद होता. त्यातून आरोग्याविषयी उत्तम माहिती मिळाली.

३ तारखेला डॉक्टर यश वेलणकर आणि अमरावतीचे डॉक्टर साबू यांची मानसिक ताणतणाव आणि आरोग्य याबद्दल चर्चा झाली. लहान मुलांच्या खाण्यापिण्याच्या आवडीनिवडी, बदललेले राहणीमान, अपेक्षा, क्रोध आणि नकारात्मकता, असा सर्वांगांनी विचार त्यात मांडला गेला. तरुण मुले आणि पालकांसाठीचे हे सत्र उत्तम मार्गदर्शक होते.

या तीन कार्यक्रमांमुळे आजच्या या धकाधकीच्या काळामध्ये आरोग्याकडे आपण किती दुर्लक्ष करतो आणि आरोग्यविषयक संकटे ओढवून घेतो हे लक्षात आले.

प्रदर्शनातील आरोग्य आणि विज्ञानविषयक पोस्टर सोप्या, सुटसुटीत मराठी भाषेत असल्याने सामान्य माणसाला समजण्यासारखी आणि चित्राद्वारे मांडली असल्याने लक्षात राहण्यासारखी होती.

आजच्या विभक्त कुटुंबपद्धतीत आणि सोशल मीडियाने घेरलेल्या युगात ग्रंथालीच्या विज्ञानधारा आणि आरोग्ययात्रा यासारख्या कार्यक्रमांची नितांत गरज आहे. ग्रंथाली ही केवळ प्रकाशन संस्था नसून एक चळवळ आहे, समाजजागृती व्हावी यासाठी त्यांच्या विविध कार्यक्रमांतून प्रयत्न करत असते हे या यात्रेतून लक्षात येते. ग्रंथालीच्या या ज्ञानप्रसाराच्या, सामाजिक भान जागे करणाऱ्या कार्यक्रमात मी खारीचा वाटा उचलू शकले याचा मला खूप आनंद आहे. पुढेही अमरावतीत कार्यक्रम घ्यावयाचा असेल त्यावेळी मी माझ्या परीने मदतीचा हात देण्यास मी तत्पर आहे.

**– माधुरी नेरकर**

# 'ग्रंथाली'ने साजरी केली बालकुमारांची दिवाळीसंध्या

जवळपास वीस वर्षांपूर्वी 'ग्रंथाली'नं श्री.पु. भागवत यांनी मांडलेली 'सांस्कृतिक अग्रक्रम' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून दिवाळी अंक केला होता. ज्यात बदलत्या सांस्कृतिक अग्रक्रमांचा वेध घेण्यात आला होता. आज वीस वर्षांनी जागतिकीकरण, बाजारीकरण व आधुनिक तंत्रज्ञानाच्या रेट्यात तर सांस्कृतिक अग्रक्रम आपल्याला झपाट्याने बदलताना दिसतात. चित्रपटातील गाणी, अल्बम यापलीकडे जाऊन वेगवेगळ्या इंटरनॅशनल बँडची जादू आजच्या पिढीवर आहे. एखादं गाणं यूट्यूबवर अपलोड होते न होते तोच अवघ्या काही मिनिटांतच त्या गाण्यांना हजारो-लाखोंनी लाइक आणि व्ह्यू मिळतात. अशा काळात मराठी बालगीतं ऐकणं-पाहणं ही दुर्मिळ होत चाललेली बाब आहे. मुलांची कल्पकता, अनुभवविश्व समृद्ध करणारी बालगीतं आज कुठल्याशा कोपऱ्यात धूळ खात पडलेली आहेत. ग्रंथालीनं या बालगीतांच्या खजिन्यावरील धूळ झटकत बालकुमारांसाठी 'सुटली ग शाळा' या दिवाळीसंध्येचे आयोजन ९ नोव्हेंबर रोजी माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरमध्ये केले होते. दिवाळीच्या निमित्ताने बालकुमारांसाठी दिवाळी अंक संचयोजना व त्यानिमित्त आयोजित केलेला दिवाळीसंध्या हा उपक्रम म्हणून स्वागतार्ह ठरला. व्हिजन निर्मित व बालरंग प्रकाशित 'सुटली ग शाळा' या कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन श्रीनिवास नार्वेकर यांचे होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी, बालवयात वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यातून मराठी वाचक निर्माण व्हावेत व त्यातून समाज वैचारिकदृष्ट्या प्रगत होत जावा या भूमिकेतून हा उपक्रम आयोजित केल्याचे सांगून ग्रंथालीच्या विविध उपक्रमांमागची भूमिका मांडली.

कार्यक्रमात मुंबई महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, अभिनेते नीलेश दिवेकर, वयम् मासिकाच्या संपादक शुभदा चौकर, बालरंगचे प्रकाशक भाऊ कोरगावकर, संपादक व दिग्दर्शक श्रीनिवास नार्वेकर, ग्रंथालीचे संपादक अरुण जोशी यांच्या हस्ते ग्रंथालीच्या दिवाळी अंकांचे प्रकाशन झाले. संचातील वयम्, बालरंग, किशोर, साधना बालकुमार, साधना युवा, पासवर्ड, चिकू-पिकू आणि विज्ञानधारा या आठ दिवाळी अंकांचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. याप्रसंगी बोलताना शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ म्हणाले, की एक सुसंस्कृत नागरिक घडवायचा असेल तर मुलांच्या मनातील संवेदनशील कोपरा आपण जपला पाहिजे. त्यासाठीचे उत्तम माध्यम म्हणजे वाचन. मोबाइलच्या दुनियेत हरवलेल्या मुलांचा स्क्रीनटाइम कमी करायचा असेल तर मुलांना पुस्तकांकडे नेले पाहिजे. या दृष्टीने ग्रंथाली मुलांसाठी राबवत असलेला उपक्रम ही काळाची गरज असून अतिशय स्तुत्य उपक्रम आहे.

- ऑनलाइनच्या युगात लहान मुलांसाठी गीतांचा कार्यक्रम ही खरंच खूप छान संकल्पना आहे. जी आजच्या काळाची गरजही आहे.

– **माधुरी लाड,** गोरेगाव (पालक)

- ग्रंथालीच्या या उपक्रमामुळे काळाच्या ओघात लुप्त होत चाललेली बालगीतं आम्हाला व मुलांना ऐकायला मिळाली. ही आमच्यासाठी दिवाळीची सुंदर भेट आहे. या कार्यक्रमामुळे आम्ही पालक नॉस्टॅल्जिक झालो.

– **डॉ. सीमा काश्यप,** (पालक)

- पूर्वी कलाकार सुलभा देशपांडे, सुधा करमरकर, विद्या पटवर्धन अशा दिग्ग्ज कलाकारांच्या बालरंगभूमी चळवळीतून तयार होऊन यायचे. आता तसे होत नाही. मराठी भाषा टिकवायची असेल तर बालरंगभूमी टिकली पाहिजे.

– **नीलेश दिवेकर** (अभिनेता)

ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांनी खुमासदार शैलीत व्यक्त केलेल्या मनोगताला नेहमीप्रमाणे प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. त्यांनी जगभर फिरत असताना मराठी भाषा जपण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आपल्या मनोगतात उल्लेख करत मराठी भाषा जोमाने जपण्यासाठी, टिकवण्यासाठी जागोजागी म राठी साहित्याचा जागर होऊन मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र मराठीमय झाला पाहिजे, असे उद्गार काढले. आपल्या घरात मुलांशी मराठीतून संवाद साधा, त्यांना पुस्तके वाचून दाखवा, मराठी गाणी, कविता ऐकवा. शहरातल्या पुलांवर कवितांच्या सुंदर ओळी लिहा. अशा सगळ्या प्रयत्नांतून आपल्याला मराठी भाषा जपायची आहे, असे नायगावकर म्हणाले.

'वयम्'च्या संपादक शुभदा चौकर यांनी दिवाळी अंक योजनेतील अंकांच्या संपादकांच्या वतीने प्रातिधिनिक मनोगत व्यक्त केले. वाचक चळवळ म्हणून योगदान देणारी ग्रंथाली पन्नासाव्या वर्षात पदार्पण करत आहे. दूरदृष्टी ठेवून पुढील पन्नास वर्षांचा विचार करून ग्रंथालीनं मुलांच्या भावविश्वात टाकलेलं पाऊल अत्यंत महत्त्वाचं आहे, अशा शब्दांत शुभदा यांनी या उपक्रमाबाबत कौतुगोद्गार काढले. तसेच, आपल्या

किशोरवयातील जडणघडणीत ग्रंथालीचा फार मोठा वाट आहे. किशोरवयात आम्ही पुल, माडगूळकर, तेंडुलकर वाचत होते त्या काळात ग्रंथालीनं प्रकाशित केलेल्या बलुतं, उपरा या पुस्तकांमुळे एक वेगळं भावविश्व आमच्यासमोर उलगडलं गेलं, ज्यातून आम्हाला समाजभान आलं, अशा शब्दांत शुभदा चौकर यांनी ग्रंथालीबद्दल भावना व्यक्त केली.

ग्रंथालीतर्फे महानगरपालिकेच्या शाळा व ग्रामीण भागातील शाळांसाठी राबवण्यात येणाऱ्या ग्रंथभेट योजनेचा आरंभ शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ व आनंद फाउंडेशनच्या अध्यक्ष अपूर्वा वैद्य-मयेकर यांना ४० पुस्तकं आणि ३६ अंकांचा समावेश असलेला संच देऊन प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आला. ग्रंथालीनं विनामूल्य दिलेली ग्रंथभेट खेड्यापाड्यातील मुलांपर्यंत पोचवून वाचनसंस्कार रुजवण्याचा उपक्रम आनंद फाउंडेशन राबवणार आहे, असं अपूर्वा वैद्य-मयेकर म्हणाल्या.

सुटली ग शाळा या कार्यक्रमात काळाच्या पडद्याआड चाललेली नाच रे मोरा, छडी लागे छम छम, शुभम करोति कल्याणम अशी सरस गाणी मुलांनी गाऊन सादर केली. विस्मरणात चाललेला बालगीतांचा ठेवा हा प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय अनभुव ठरला. महाराष्ट्र टाइम्सनं मीडिया पार्टनर म्हणून सहकार्य केलं.

**– अश्विनी भोईर**

## महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित जपणारा ग्रंथालीचा दिवाळी अंक प्रकाशन सोहळा

गेल्या तीन वर्षांप्रमाणे ग्रंथालीने याही वर्षी दिवाळी अंक संच योजना आखली होती. तिला उत्तम प्रतिसाद मिळाला. मौज, पद्मगंधा, ऋतुरंग, एबीपी माझा दिवाळी, अनुभव, शब्द रुची हे अंक त्यात समाविष्ट होते. त्यानिमित्त आयोजित दिवाळीसंध्या कार्यक्रमात विजयालक्ष्मी मणेरीकर यांच्या नाशिक येथील 'सुज्ञान' या संस्थेने पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या गाण्यांवर आधारित 'हृदयस्वर' हा बहारदार कार्यक्रम सादर केला. पंडित हृदयनाथजींच्या संगीतदिग्दर्शनातील बलस्थाने, आठवणी जागवत गाण्यांची मैफल संपन्न झाली. विजयालक्ष्मी मणेरीकर, सागर कुलकर्णी, दातृत्वी मणेरीकर आदी गायकांनी चांदणे शिंपीत जाशी, तू तेव्हा तशी, कोळीगीते अशी सरस गीते गात प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. प्रस्तुत मैफिलीचे सूत्रसंचालन अभिनेता पुष्कर श्रोत्री आणि डॉ. मृण्मयी भजक यांनी केले. कार्यक्रमाचे संहितालेखन विजयालक्ष्मी मणेरीकर आणि अरुण जोशी यांनी केले होते.

दिवाळी अंक परंपरा चालत राहावी, वाचनसंस्कृती जोपासावी या हेतूने 'ग्रंथाली'ने ही संचयोजना आखली. ग्रामीण भागातील शाळा, संस्था, वाचनालये यांना या अंकसंचासह चाळीस पुस्तके आणि छत्तीस दिवाळी अंक भेट देऊन त्यासाठी आपले योगदान दिले. या दिवाळीभेटसाठी अनेकांनी सहकार्य केले. हे संच प्रायोजित केले.

मध्यंतरात मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्या हस्ते विजयालक्ष्मी मणेरीकर लिखित 'एक घोट मृगजळाचा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'मी ग्रंथालीशी अनेक वर्षांपासून जोडलेला आहे. पुण्यात आलेली ग्रंथयात्रा अनुभवली आहे. अशा विधायक यात्रा समाजाला उपयुक्त असतात. ग्रंथालीने मुंबईत कधीही ग्रंथयात्रा काढली तर त्यांना कधीही पोलीस परवानगी देईन' असा ग्रंथालीच्या कार्याचा गौरव त्यांनी केला. एफडीएचे कमिशनर अभिमन्यू काळे कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दिवाळी अंक संच आणि पुस्तकांची भेट प्रातिनिधिक स्वरूपात देण्यात आली, तसेच 'हृदयस्वर'मधील कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

**– अश्विनी भोईर**

**प्रतिक्रिया**

**पुष्कर श्रोत्री, अभिनेता –** माझे वडील महाराष्ट्र टाइम्समध्ये असल्यामुळे आमच्या घरी दरवर्षी दिवाळी अंक यायचे. दिवाळी अंक वाचत मी लहानाचा मोठा झालो. त्यामुळे दिवाळी अंकांशी माझं एक वेगळं नातं आहे. त्यामुळे आजच्या कार्यक्रमाचं निवेदन करण्यात मला एक वेगळाच आनंद आहे.

**भारती सहस्रबुद्धे, एबीपी माझा –** मौज, रुची असे दर्जेदार अंक वाचत माझी जडणघडण झाली. आज या अंकांच्या बरोबरीने एबीपी माझाच्या दिवाळी अंकाचे प्रकाश होत आहे याचा विशेष आनंद आहे.

**शर्वरी शेवते, ऋतुरंग –** महाराष्ट्रातील दिवाळी अंकांची परंपरा जबाबदारीने जपायची आहे, याचं भान आजच्या तरुणपिढीला ठेवावे लागेल. ऋतुरंग हा दिवाळी अंक केवळ एका कुटुंबाचा अंक नसून तो महाराष्ट्राच्या दिवाळी अंकांच्या उज्ज्वल परंपरेतील एक अंक आहे याची मला जाणीव आहे.

# ग्रंथालीची विज्ञानयात्रा व आरोग्ययात्रा सांगतासमारोह समारंभ



२४ नोव्हेंबर २०२३ ते २४ डिसेंबर २०२३ या एक महिन्याच्या कालावधीत ग्रंथालीने महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांमध्ये विज्ञानधारा आणि आरोग्ययात्रेचे आयोजन केले होते. या यात्रेचा सांगतासमारोह समारंभ २४ डिसेंबर २०२३ रोजी वाशी येथील या दिवशी सकाळी प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालयाच्या सभागृहात झाला नवी मुंबई महानगरपालिका आणि प्रा. कीर्तने वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या समारंभास पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी, डॉ. अनिरुद्ध पंडित, पद्मश्री डॉ. शरद काळे, विज्ञान परिषदेचे अ. पां. देशपांडे, सुभाष कुलकर्णी, डॉ. सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते व्यासपीठावर उपस्थित होते. या सांगतासमारोहातील भाषणात डॉ. ज्येष्ठराज जोशी म्हणाले, ''अतिशय मेहनतीने यात्रा यशस्वी करणाऱ्या संपूर्ण टीमला मी नमन करतो. रोजच्या जगण्यातील अनेक प्रश्नांना विज्ञान तोडगे शोधत असल्याने, माणसाचे मन शांत होते आणि मानवी जीवन सुंदरही होते. त्यामुळे आपण विज्ञानाची व वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरायला हवी. अनेक जण मला विचारत असतात की शास्त्रज्ञ होण्यासाठी कोणत्या गोष्टी हव्यात? त्यांना मी सांगतो, शास्त्रज्ञ होण्यासाठी उत्तमात उत्तम अत्याधुनिक प्रयोगशाळेची गरज नाही. गरज आहे ती कुतूहलाबरोबर, एकाग्र मनाची.''

आय.सी.टी. अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित आपल्या भाषणात म्हणाले, की प्रगती शाश्वत स्वरूपाची कशी राहील, याचा विचार आपण करायला हवा. कचऱ्याकडे कचरा म्हणून न पाहता खनिज म्हणून पाहायला हवे. जे आपल्याला टाकायचे आहे, त्याचा पुनर्वापर कसा होईल, यादृष्टीने पावले टाकली पाहिजेत. विज्ञान परिषदेचे अ.पां. देशपांडे म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून मराठी विज्ञान परिषद दैनंदिन जीवन जगताना विज्ञानाचे भान कसे हवे याची जाणीव सर्वसामान्य माणसांना करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. परिषदेच्या प्रयत्नांना ग्रंथालीसारख्या संस्थेची जोड मिळत आहे, ही अभिनंदनीय बाब आहे.

या समारंभात शरद काळे लिखित 'नाट्यातून विज्ञानाकडे भाग १ ते ३', 'निसर्गऋण', सुधीर थत्ते-नंदिनी थत्ते लिखित 'विज्ञान-नाटके' आणि शशिकांत धारणे लिखित 'ऊर्जापुराण'

**विज्ञानधारा व आरोग्ययात्रा – जिल्हा ठिकाणे**

- चितळे मंगल कार्यालय, भैरी मंदिराजवळ, चिपळूण. लोकमान्य टिळक स्मारक वाचनमंदिर, चिपळूण
- रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालय, रत्नागिरी
- विदर्भ साहित्य संघ, नागपूर
- सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
- एएमसी संकुल, अमरावती
- महिला महाविद्यालय प्रांगण, कऱ्हाड
- शाहू स्मारक भवन, कोल्हापूर
- के.सी.ई. सोसायटीचे ओजस्विनी कला महाविद्यालय, जळगाव
- भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन जळगाव, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी जळगाव, के.सी.ई. सोसायटी ओजस्विनी कला महाविद्यालय, रेडिओ मनभावन, स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, सोहम् डिपार्टमेंट ऑफ योग ॲण्ड नॅचरोपथी, मू.जे. महाविद्यालय जळगाव, ए.टी. झांबरे माध्यमिक विद्यालय जळगाव, ओरीऑन स्टेट बोड इंग्लिश मिडिअम स्कूल जळगाव.
- धोंडो शामराव गरूड जिल्हा वाचनालय, धुळे
- पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर
- ग्लोबल व्हिजन स्कूल, नाशिक
- प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय, साहित्यमंदिर सभागृह, वाशी, नवी मुंबई

या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यावेळी बोलताना डॉ. शरद काळे यांनी ग्रंथालीच्या माध्यमातून गावोगावी जाऊन 'विज्ञानधारा' उपक्रम राबवताना आलेले अनुभव सांगितले. ते आपल्या मनोगतात म्हणाले, ''जीवन जगण्याचं ज्ञान म्हणजे विज्ञान. विज्ञानाची व्याख्या इतकी सोपी आहे. हे भान आपण रोजच्या जगण्यात ठेवायला हवं. आता साधं उदाहरण हेच घ्या की दुधाची पिशवी कापताना आपण त्याचा छोटासा कॉर्नर कापतो. असे कोट्यवधी पिशव्यांचे कॉर्नर कापले जातात. पुढे तेच प्लास्टिक मातीत मिसळतं आणि आपल्यासाठी घातक बनतं, याचं आपल्याला भानच नसतं. विज्ञानाविषयीची उदासीनता, दडपण यामुळे समाज प्रगल्भ होत नाही, पर्यायानं देशही प्रगल्भ होत नाही. चुकीच्या परंपरा, पद्धती आपण पाळत राहतो. यामुळेच विद्यार्थिदशेपासूनच वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यासाठी विज्ञानधारामधून मी विद्यार्थ्यांशी गप्पा मारतो.''


ग्रंथालीच्या 'विज्ञानगप्पा' उपक्रमाअंतर्गत डॉ. सुधीर थत्ते व नंदिनी थत्ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. या कार्यक्रमातील अनुभवकथन करताना नंदिनी थत्ते म्हणाल्या, ''विज्ञान शिकण्याचा उत्तम मार्ग म्हणजे गप्पांमधून विज्ञान सांगणं. आम्ही आमच्या कार्यक्रमात तेच करतो. विज्ञानगप्पा कार्यक्रमात चाणाक्ष बुद्धीची प्रचीती देणारे कुतूहलजनक प्रश्नही विद्यार्थी आम्हाला विचारत असतात. शेवाळापासून कागद बनवता येईल का? अथवा समुद्राच्या खालीदेखील जमीन असते, तिथे आपल्याला भविष्यकाळात राहता येईल का? असे प्रश्न विद्यार्थी विचारतात, तेव्हा तो अनुभव सुखावणारा असतो.'' प्रस्तुत समारंभात अन्वय प्रतिष्ठानचे संचालक व लेखक अजित मगदूम, अमरावतीच्या कार्यकर्त्या माधुरी नेरकर, दूरदर्शनचे निवृत्त निर्माते जयू भाटकर, लेखक प्रा. प्रमोद नारायणे यांनी यात्रेत आलेले अनुभव कथन केले. आरोग्ययात्रेतील डॉक्टरांच्या टीमच्या वतीने डॉ. अंजली कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. छायाचित्रकार प्रियाल देवलाटकर याने अनौपचारिक शैलीत मनोगत व्यक्त करून कार्यक्रमात रंगत आणली. आरोग्ययात्रा व विज्ञानयात्रा यशस्वी करण्यासाठी हातभार लावणाऱ्या साऱ्यांचा या समारंभात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले व सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले.

**– अश्विनी भोईर**

ग्रंथाली

**वाडवळी शब्दकोश आणि व्युत्पत्ती शोध**

**रिचर्ड नुनीस**




**मूल्य १००० रुपये**
**सवलतीत ६०० रुपये**

वाडवळी ही उत्तर कोकणपट्टीतील प्रचलित बोली. परशुरामाने स्थापन केलेल्या या भूमीने सम्राट अशोकापासून पेशव्यांपर्यंत विविधधर्मी राजवटी पाहिल्या, अनुभवल्या. काहींनी राज्यकर्त्यांचा धर्मदेखील स्वीकारला, मात्र आपली मायबोली सोडली नाही! कोंकणी, पोर्तुगीज, लॅटिन आदी भाषांच्या प्रभावांमुळे, एकच पोत तरीही अनेक पदर ल्यालेली वाडवळी बोली अधिकच रसरशीत आणि तजेलदार बनली. उपलब्ध अनेक शब्दकोशांच्या अभ्यासातून वाडवळी शब्दांचा प्रवास ह्या ग्रंथात त्यांनी उलगडून दाखवला आहे. ज्या बोलीवर आपला पिंड पोसला गेला त्या मायबोलीच्या ग्रथित केलेल्या ह्या पाऊलखुणा! विद्यमान आणि भावी पिढ्यांना, भाषेच्या अभ्यासकांना आणि बोलींवर प्रेम असलेल्या प्रत्येकाला हा शब्दकोश निश्चितच उपयुक्त ठरेल.

# ग्रंथालीचा ४९ वा वाचकदिन

ग्रंथालीचा ४९ वा वाचकदिन २५ डिसेंबर २०२३ रोजी वाशी येथील माणिकराव कीर्तने वाचनालयाच्या सभागृहात साजरा झाला. नवी मुंबई महानगरपालिका व प्रा. कीर्तने वाचनालय, साहित्य मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या दिवसातील दोन सत्रांच्या कार्यक्रमात सकाळी अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष रवींद्र शोभणे यांचा नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने, आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. याचवेळी डॉ. शोभणे लिखित 'शहामृग' पुस्तकाचे प्रकाशन आयुक्त नार्वेकर यांच्या हस्ते झाले.

सायंकाळच्या सत्रात ग्रंथाली आणि डिपार्टमेंट ऑफ कम्युनिकेशन अँड जर्नालिझम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अरुण साधू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक लाखांचे अनुदान समाजाने टाकून दिलेल्या उपेक्षित महिलांसाठी काम करणाऱ्या मनगाव येथील 'माऊली' सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ राजेंद्र धामणे व डॉ. सुचिता धामणे यांना देण्यात आले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र प्रभुणे यांच्या हस्ते अनुदान प्रदान करण्यात आले. याप्रसंगी श्रीमती अरुणा साधू, शेफाली साधू आणि सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. या सन्मानाला उत्तर देताना डॉ. राजेंद्र धामणे आपल्या मनोगतात म्हणाले, माऊली हे घर आणि मन हरवलेल्या स्त्रियांचं गाव आहे. दुरितांचे तिमिर जावो या पसायदानातील ओळी आपलं ध्येय मानून गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ आम्ही काम करत आहोत. रस्त्यावरून उचलून आणलेल्या आमच्या भगिनी जेव्हा मरतात तेव्हा त्यांचे अंत्यसंस्कार कशा पद्धतीने करावेत, कोणत्या धर्माप्रमाणे करावेत, हे सांगायला लोक येतात. परंतु या भगिनी जेव्हा रस्त्यावर तडफडत असतात, तेव्हा ती आपल्या धर्माची आहे असा विचार करूनही कोणी तिला मदतीचा हात देत नाही. ही आपल्या समाजाची शोकांतिका आहे. 'माऊली'त काम करताना माणुसकी हा एकच आमचा धर्म आहे. बहुतांश बलात्कारित स्त्रिया आमच्या संस्थेत आहे. व्यवस्थेतील स्त्रियांचे हे प्रश्न थांबतील, तोच खरा आमच्यासाठी पुरस्कार असेल. डॉ. राजेंद्र धामणे यांचे मनोगत ऐकून संपूर्ण सभागृह सद्गदित झाले व शिकागो येथून आलेल्या अरविंद कुलकर्णी यांनी उत्सफूर्तपणे 'माऊली' संस्थेला एक लाखांची देणगी जाहीर केली.

यानंतर झाले ग्रंथालीच्या नवीन पुस्तकांचे प्रकाशन. डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते डॉ. अजित मगदूम लिखित 'न घेतलेला रस्ता', शरद काळे यांच्या 'चिंतन भाग-४', डॉ. निर्मोही फडके यांच्या 'अनहद', डॉ. स्मिता दातार यांच्या 'अयोध्येची ऊर्मिला', नीला चांदोरकर यांच्या 'जगावेगळा लिंडबर्ग', चांगदेव काळे यांच्या 'घण, घाव आणि ऐरण', रिचर्ड नुनीस यांच्या 'वाडवळी शब्दकोश आणि व्युत्पत्तिशोध', डॉ. सुधीर थत्ते-नंदिनी थत्ते यांच्या 'नोबेलनगरी २०२३', विनता कुलकर्णी यांच्या 'चौकटीबाहेर' आणि विनोद अलकारी यांच्या 'असाधारण होता होता....' अशा दहा पुस्तकांचे प्रकाशन झाले.

पुस्तक प्रकाशनानंतर लेखकांनी आपली छोटेखानी मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी बोलताना डॉ. निर्मोही फडके म्हणाल्या, की कथेत मावत नाही व कवितेत गवसत नाही असा अवकाश मी 'अनहद' या ललितलेखसंग्रहातून पकडण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ शरद काळे यांनी आपल्या मनोगतातून आपण कचऱ्याला संपत्ती न म्हणता कचरा म्हटलं आणि सगळी दुर्दशा ओढवली अशी खंत व्यक्त केली. रिचर्ड नुनीस म्हणाले, की मी माझ्या मायबोलीतील शब्दांच्या अर्थाबरोबरच शब्दामागे असणारी कहाणी वाडवळी शब्दकोशात सांगितली आहे याचा मला अभिमान आहे. कारण मायबोलीशी जो मिळाला नाही तो कोणत्याच मातीत मिसळला नाही, हे वास्तव आहे. डॉ. स्मिता दातार म्हणाल्या, की ऊर्मिलेप्रमाणेच इतर उपेक्षित महिलांनाही लेखनातून प्रकाशात आणण्याचा माझा मानस आहे.

डॉ. रवींद्र शोभणे आपल्या भाषणात म्हणाले, की ग्रंथालीचे उपक्रम नेहमीच स्तुत्य असतात. आज मोठमोठ्या प्रकाशनसंस्था डबघाईला आलेल्या असताना ग्रंथाली ज्या पद्धतीने काम करत आहे, ती वाखाणण्यासारखी आहे.

वाचकदिनाची सांगता अभिनेत्री मधुराणी गोखले यांनी कवितेच्या पानांतून.. 'ती'च्या कविता हा बहारदार कार्यक्रम सादर करून केली. वाचकदिनाचे प्रास्ताविक ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक व नवी मुंबई मनपाचे जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे यांनी केले.

**– अश्विनी भोईर**

ग्रंथाली

# वाचकदिनी प्रकाशित पुस्तके




## लिंडबर्ग

**जगावेगळा**

**नीला चांदोरकर**

**मूल्य ५०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**

बालवयात त्यानं आकाशात उडणारं चिमुकलं विमान पाहिलं... काही वर्षांनी विमानांच्या स्पर्धा पाहिल्या. विमानविषयक प्रेमाचं बीज तेव्हाच त्याच्या मनात अंकुरलं... सुरुवातीच्या काळातील वेड्या साहसकृत्यांमुळे तो ‘उडता वेडा’ (Flying Fool) ठरला. त्याच वेडापायी त्यानं उत्तुंग झेप घेतली आणि तो जगातील सर्वोत्कृष्ट साहसवीर ठरला... सुखसमृद्धीची सोनेरी पहाट उगवली, मनाजोगती सुविद्य, सुसंस्कृत सहचारिणी मिळाली, संसार बहरला आणि एक दिवस वीजप्रपात झाला... असा हा कोण जगावेगळा पुरुषोत्तम? चार्ल्स ऑगस्टस लिंडबर्ग... एक खणखणीत वाजणारं बुलंद नाणं...

## घण घाव आणि ऐरण

**चांगदेव काळे**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

जगणे कसे सरळ, एका रेषेत आडवळणविरहित असावे अखंडितपणे, त्यात कुणाचा दबाव वा हस्तक्षेप नसावा, कुठले आघाताचे घाव नसावेत हलके वा तीव्र, सहन करता न येण्यासारखे. कुणाला त्रासही होऊ नये आपल्या जगण्याचा, वागण्याचा, ही साधी, सरळ आणि सहज अपेक्षा नाही, असा माणूस शोधूनही सापडणार नाही. प्रत्यक्षात अनुभवाला येणारे वास्तव नेमके याच अपेक्षांना छेद देत आपले अस्तित्व उघडपणे प्रत्ययाला आणून देते. थोडक्यात, प्रहार करणारा घण, त्याच्या घावाखाली मान तुकवायला भाग पडलेले आपण आणि त्याची दाहकता सोसणारी आपल्याशी नाते सांगणारी ज्ञात–अज्ञात ऐरण प्रत्येकाच्या आयुष्याला व्यापून असते. फरक इतकाच, कोणी धाडसाने प्रामाणिकपणे ताठ राहतात, कुणी सामोरे जातात ते हातबल होऊन.




## नोबेलनगरी २०२३

**सुधीर थत्ते**
**नंदिनी थत्ते**

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची गोष्टीरूपाने यथार्थ वैज्ञानिक माहिती कथारूपाने देणारा १९९६ पासून चाललेला जगातला एकमेव उपक्रम. सर्वोत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीसाठी राज्यशासनाचा तीन वेळा पुरस्कार. लोकांपर्यंत विज्ञान नेण्याचा अभिनव उपक्रम – खुद्द नोबेल विजेत्यांचा अभिप्राय. मराठीतील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी, तसेच द एशियन एज, द फ्री प्रेस जर्नल, बॉम्बे टाइम्स आणि आउट लुक यांनी खास लेख लिहून प्रशंसा केलेली प्रकाशन योजना.

## डॉ. बोरकर यांच्या तीन कवितासंग्रहांचे प्रकाशन




कवी डॉ. घनश्याम बोरकर यांच्या 'शैवमत भैरव', 'कालजयी' आणि 'शरणयोग' या कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा रविवार, ५ नोव्हेंबर रोजी, दादर-माटुंगा कल्चरल सेंटर येथे पार पडला. या संग्रहातील कवितांचे काव्यवाचन आणि काव्यगायन डॉ. बोरकरांनी केले आणि त्यांची कन्या तेजश्री बोरकर-दीक्षित यांनी उत्कृष्ट निवेदन केले. त्यानंतर विजय कुवळेकर, दिनकर गांगल, सुरेश खरे, रविराज गंधे यांच्या उपस्थितीत या कवितासंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना विजय कुवळेकर म्हणाले, की डॉ. बोरकरांची कविता म्हणजे संतृप्त जीवन जगलेल्या मनाची कविता आहे. त्यांच्या सर्व लेखनातून सत्य-शिव-सुंदराची आराधना आणि आविष्कार दिसून येतो; तर रविराज गंधे म्हणाले, 'शरणयोग'मधील सर्व काव्याला एक सुंदर, मंगल अशी प्रासादिक उंची आहे. ती मोहवून टाकणारी आहे. मानवी जीवनाचे अनेक कंगोरे रसपूर्ण रितीने दर्शवत त्यांची कविता एका क्षणाला अनपेक्षितपणे वेगळ्या उंचीवर जाते. सुप्रसिद्ध नाटककार सुरेश खरे म्हणाले, डॉ. बोरकरांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच त्यांची कविता ही बहुपेडी आहे. त्यांची कविता ही स्फुरलेली आहे, रचलेली नाही. डॉ. बोरकर हे सौंदर्यपूजक आहेत. निसर्गाची वेगवेगळी रूपे त्यांनी छायाचित्रकाराच्या नजरेतून टिपलेली आहेत आणि चित्रकाराच्या नजरेतून त्यांच्या रंगच्छटा टिपून, शब्दांच्या सुंदर कोंदणात बसवल्या आहेत. 'ग्रंथाली'चे संस्थापक दिनकर गांगल यांनीही आपल्या भाषणात कवितांचे कौतुक केले. •

॥ग्रंथाली॥




**वाटचाल सहा दशकांची**


**डॉ. अलीमिया परकार**

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

**एक घोट... मृगजळाचा!**

**('जैत रे जैत' एक संगीतक)**

**विजयालक्ष्मी मणेरीकर**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

# ‘मी अनिल गणाचार्य’ पुस्तकाचे प्रकाशन



‘कॉ. गुलाबराव गणाचार्य हे आजच्या तरुण पिढीसाठी आदर्शवत असे व्यक्तिमत्त्व आहे. आमदार झाल्यावरही त्यांनी आपली साधी राहणी जपली होती. कोणत्याही वैयक्तिक स्वार्थासाठी त्यांनी राजकारण केले नाही तर कायमच समाजहित जपले.’ असे उद्‌गार माजी केंद्रीय मंत्री आणि माजी राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांनी, कॉ. गुलाबराव गणाचार्य स्मारक व धर्मादाय संस्था आणि ग्रंथालीने २० नोव्हेंबर रोजी दादर येथील योगीमंडपम सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात काढले. कॉ. गुलाबराव गणाचार्य यांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून त्यांचे सपुत्र व कामगार नेते अनिल गणाचार्य यांच्या, ज्येष्ठ पत्रकार अशोक शिंदे यांनी शब्दांकन केलेल्या ‘मी अनिल गणाचार्य’ या चारित्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सुशीलकुमार शिंदे यांच्यासह माजी राज्यपाल राम नाईक, आमदार सचिन अहिर, आमदार प्रसाद लाड, भाजपा महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ विश्वास उटगी, मुंबई पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, कामगार नेते महेंद्र घरत, माजी नगरसेवक उपेंद्र दोषी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांनी कामगार, समाजकारण क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये कॉ. गुलाबराव गणाचार्य अग्रस्थानी होते, असे सांगितले. केरमाणी चाळीत सर्वसामान्यांप्रमाणे त्यांच्यात राहून त्यांनी समाजासाठी कार्य केले. त्यांचाच वारसा अनिल गणाचार्य आणि त्यांच्या सर्व भावंडांनी पुढे नेला, असे ते आपल्या भाषणात म्हणाले. अन्य सर्वच वक्त्यांनी कॉ. गणाचार्य यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल प्रशंसोद्‌गार काढले.

सुनील गणाचार्य यांनी आपल्या प्रास्ताविकातून गणाचार्य कुटुंबाचे सामाजिक, कामगार क्षेत्रातील योगदान विशद करत पुस्तकाविषयी माहिती दिली. ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या पन्नासाव्या वर्षांच्या आरंभी कॉ. गुलाबराव गणाचार्य यांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनानिमित्त पुस्तक प्रकाशित करण्याचा योग जुळून आला याविषयी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले तर आभारप्रदर्शन रूपाली बरूआ-गणाचार्य यांनी केले. कार्यक्रमाच्या आरंभी शाहीर अमरशेख यांचे नातू शाहीर नितांत शेख व कलापथकाने सादरीकरण केले.

•


॥ग्रंथाली॥※॥




**परका**

**लालासाहेब जाधव**


**आत्मचरित्र**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २४० रुपये**

**मी अनिल गणाचार्य**

**शब्दांकन : अशोक शिंदे**

**आत्मचरित्र**




**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

# लालासाहेब जाधव लिखित 'परका' या आत्मकथनाचे प्रकाशन




''आपली आणि आपल्या समाजाची वेदना, अवहेलना, गावकुसाबाहेरचं जगणं यांचा अस्सल अनुभव मांडणारं 'परका' हे आत्मकथन म्हणजे विवेकनिष्ठ विद्रोहाचे उत्तम उदाहरण आहे'', असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी लालासाहेब जाधव लिखित 'परका' या आत्मकथनाच्या प्रकाशनसोहळ्यात केले.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील निवृत्त अवर सचिव लालासाहेब जाधव लिखित 'परका' या आत्मकथनपर पुस्तकाचा प्रकाशनसोहळा ४ डिसेंबर २०२३ रोजी पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू ऑडिटोरियम इथे पार पडला. पुस्तकाचे प्रकाशन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, 'उपरा'कार लक्ष्मण माने होते. आमदार यशवंत माने, आमदार नरेंद्र पवार, माजी आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे, माजी प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे, ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, मसापचे कार्यवाह वि.दा. पिंगळे, रघुनाथ जाधव, हनुमंत मानेगुरुजी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

श्रीपाल सबनीस आपल्या भाषणात म्हणाले, समाजाने आत्मपरीक्षण करावे, वर्षानुवर्षे चालत आलेल्या माणुसकीचा अपमान करणाऱ्या परंपरांचा पुनर्विचार करावा, असे हे आत्मकथन आहे. जातीचे दु:ख, अपमान, आणि वेदनांचा इतिहास लालासाहेब जाधव यांनी प्रामाणिकपणे मांडला आहे. इतर कुठल्याही दु:ख, वेदनेपेक्षा या पुस्तकातील 'परकेपण' आणि 'पोरकेपण' भयंकर आहे कारण ते मानवनिर्मित आहे. जाधव यांनी सोप्या भाषेत हे अनुभव मांडले आहेत, पण त्यात दु:ख कुरवाळत बसण्यापेक्षा समाजाची संवेदनशीलता जागी व्हावी, हे अभिप्रेत आहे.

मनोगत मांडताना जाधव म्हणाले, वैयक्तिक अनुभव हे माध्यम आहे. कैकाडी समाजाची दशा काय आहे, हे सांगण्याचा उद्देश असल्याचे सांगितले. जे भोगले, जे सोसले, ते सांगितले. पराकोटीच्या अपमानित जिण्याचे अनुभव घेत, शिक्षणाच्या माध्यमातून आपण यशस्वी होऊ शकतो, हेपण सांगावेसे वाटले म्हणून लिहिले. अंध वडिलांनी प्रेरणा दिली आणि अशिक्षित आईने शिकण्यासाठी प्रोत्साहित केले. गेल्या कित्येक वर्षांपासून कैकाडी समाजाला राज्य आणि केंद्र सरकारनेही 'परके' ठेवले आहे, क्षेत्रीय आरक्षणाच्या मुद्द्यावर मी गेली अनेक वर्षे लढत आहे. हा सगळा प्रवास मी माझ्या आत्मकथनात शब्दबद्ध केला आहे .

माजी आमदार नरेंद्र पवार म्हणाले, या पुस्तकाच्या माध्यमातून कैकाडी समाजाची दुरवस्था सर्वांपर्यंत पोचेल. याच्या वाचनाने भटक्याविमुक्तांना मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल.

आमदार यशवंत माने यांनी कैकाडी समाजाला क्षेत्रीय मर्यादांच्या बंधनातून मुक्त करावे, यासाठी लालासाहेब जाधव यांनी केलेल्या प्रयत्नांची, अहवालाची माहिती दिली.

सुरेश खोपडे यांनी जाधव कुटुंबासोबतच्या आठवणींना उजाळा दिला. कैकाडी समाजासमोर आजही किती सुधारलो किती पुढारलो, हे प्रश्न आहेत. असे ते म्हणाले. डॉ. अनंत कळसे म्हणाले, जाधव यांच्या सोबत अनेक वर्षे काम केले आहे. त्यांनी पुस्तकाचे शीर्षक 'परका' असे ठेवले असले तरी वाचक हे पुस्तक 'आपलेसे' करतील, याची खात्री आहे.

अध्यक्षीय समारोप करताना लेखक लक्ष्मण माने म्हणाले, कैकाडी समाजातील व्यक्तीला आपले अनुभव पुस्तकरूपाने लिहावेसे वाटतात, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देणे आहे. ही ताकद आपल्याला संविधानाने दिली आहे. शिक्षणाचा अधिकार संविधानानेच प्रदान केला आहे. आपल्या दु:खाचे कारण शोधले, की शिक्षणाने त्यावर उपाय शोधता येतो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

ग्रंथाली प्रकाशनातर्फे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले.

अश्विनी भोईर यांनी सूत्रसंचालन केले व आभार प्रा. राहुल जाधव यांनी मानले. •

## ‘चाकावरची चाकरी’




सुधाकर राऊत लिखित ‘चाकावरची चाकरी’ या आत्मकथनाचे प्रकाशन सफाळे येथील रोहिदास गार्डनमध्ये १९ नोव्हेंबर २०२३ रोजी, अखिल भारतिय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दलित पँथरचे प्रणेते अर्जुन डांगळे, महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्राचे उपसंपादक समीर मणियार, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

सुदेश हिंगलासपूरकर यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, की सफाळ्यासारख्या ग्रामीण भागातून मला सुधाकर राऊतांसारखा एक वाचक आणि मित्र लाभला ही फार मोठी अभिमानाची बाब आहे.

ह्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उत्तम कांबळे यांनी भारतीय रेलवेने सामाजिक कामांमध्ये फार मोठी क्रांती केलेली आहे. रेलवेच्या डब्यामध्ये पाठीला पाठखांदा लावून बसण्याचे स्वातंत्र्य दिले. ज्यांना जात पाळायची आहे त्यांनी डब्याबाहेर पडायचे, जात मानणाऱ्यावर पहिली फुल्ली रेल्वेने मारली. ‘चाकावरची चाकरी’ या पुस्तकाच्या लेखकाबद्दल बोलताना ते म्हणाले सुधाकर राऊत यांनी समाज पकडून ठेवला नसता आज त्यांचाही मध्यमवर्गामध्ये समावेश झाला असता.


लेखकाने आपले श्रद्धास्थान असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणाने सुरुवात केली. समाजातील तरुण पिढीला आपण समाजाकडून काहीतरी घेणे लागत नाही, आपण समाजाचे देणेकरी आहोत ही भावना त्यांनी व्यक्त केली. हा माझा प्रवास आजच्या तरुण पिढीला नक्कीच काहीतरी प्रेरणा देईल असे संबोधले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका वैद्य यांनी केले तसेच कार्यक्रमाची सांगता, आभारप्रदर्शन शुभांगी जाधव यांनी केले.

●

---

## माधव जोशी यांना पुरस्कार






रिझर्व्ह बँकेचे माजी महाव्यवस्थापक, सुधीर फडके यांच्या सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे माजी सचिव, अमेरिकेतील बोस्टन येथे राहणारे रमेश वावीकर हे प्रतिवर्षी आपली साहित्य व संगीतरसिक पत्नी आशा वावीकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, त्यांनी वाचलेल्या एका विशेष उल्लेखनीय मराठी पुस्तकाला पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार देतात. २०२३ या वर्षीचा कै. आशा रमेश वावीकर स्मृती पुरस्कार माधव जोशी लिखित व ग्रंथाली प्रकाशित ‘माझी कार्पोरेट दिंडी’ या लेखकाच्या पाच दशकांच्या कॉर्पोरेट वाटचालीवर आधारित पुस्तकाला मिळाला आहे. हे पुस्तक इंग्रजीमध्येसुद्धा जोशी यांनी MY CORPORTE ODYSSEY या शीर्षकाने लिहिले आहे.

कॉर्पोरेट क्षेत्रातील यशस्वी कारकिर्दीसाठी अतिशय उपयुक्त असणाऱ्या या पुस्तकाच्या वर्षभरात तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

माधव जोशी त्यांना मिळालेल्या पुरस्कारात स्वतःची भर घालून राज्यातील १०० महाविद्यालयांना त्यांचे मराठी आणि इंग्रजी पुस्तक आशाताईंच्या स्मृतिप्रीत्यर्थ भेट देणार आहेत.

●

## मानवी संवेदनांशी जोडलेलं नातं म्हणजे 'चॉइसेस'!



'जे भोगलं आहे, अनुभवलं आहे, याचं सार 'चॉइसेस' या पुस्तकात आहे. भिन्न भाषाशैली, विचार यांचं उत्तम दर्शन यात घडतं. कर्तव्यासाठी कुटुंबापासून समाजापर्यंत विविध स्तरांवर वावरताना आणि विविध भूमिका निभावूनदेखील स्त्रीविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. तीदेखील आपण कुटुंबासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाही, याची अपराधी भावना बाळगून वावरत असते. त्यामुळे मानवी संवेदनांचं नातं यामध्ये दिसतं,' असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी केले.



**लिव्ह उल्मन यांना 'चॉइसेस' पुस्तकाची प्रत पोहोचल्यावर त्यांनी कौतुकाने पाठवलेले छायाचित्र**

एनएफडीसी अर्काइव्ह थिएटरमध्ये आयोजित 'आशय' आणि 'ग्रंथाली'तर्फे अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी प्रख्यात अभिनेत्री लिव्ह उल्मन यांच्या आत्मकथनाच्या स्वैर अनुवादाचा केलेल्या 'चॉइसेस' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी 'कोहिनूर ग्रूप'चे कृष्णकुमार गोयल, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, अभिनेत्री कादंबरी कदम, पर्ण पेठे, मुक्ता बर्वे, प्रसिद्ध दिग्दर्शक किरण यज्ञोपावित, वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार, धनश्री धारप आदी उपस्थित होते.

मुक्ता बर्वे म्हणाल्या, 'आज जगाच्या पाठीवरील प्रत्येक स्त्रीचे प्रश्न आणि तिची दु:खं जवळपास सारखीच आहेत. आयुष्याचा निम्मा प्रवास ओसरल्यानंतरही एकटेपणाची भावना सतावत राहणं आणि ज्यांच्यासाठी खस्ता खाऊन आयुष्य वेचलं त्यांच्याकडून एकटं पाडलं जाणं, अशा अनेक प्रश्नांना स्त्रियांना सामोरं जावं लागतं.'

रोहिणी हट्टंगडी म्हणाल्या, 'जन्मापासून तू एक मुलगी आहेस, समाजात वागताना कसं वागलं पाहिजे, कसं वावरलं पाहिजे, याची शिकवण आणि जडणघडण स्त्रीच्या अस्तित्वापुढे प्रश्नचिन्ह निर्माण करते. पुढे संसारात आणि समाजजीवनात वावरताना तिला पडणारे प्रश्न अनेकदा अनुत्तरीतच राहतात.'

यावेळी 'चॉइसेस' या पुस्तकातील काही भागांचे अभिवाचन करून उपस्थित मान्यवरांनी स्त्रीच्या अस्तित्वाविषयी भावना व्यक्त केल्या.

कृष्णकुमार गोयल यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी पुस्तकाच्या अनुवादाविषयी भूमिका विशद केली. वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले.

•


॥ग्रंथाली॥

# ब्रह्ममार्ग रूप बोध

मूळ चिनी लेखक

**लाओ त्सू**

अनुवाद

**डॉ. सुनंदा आपटे-काकडे**




**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

# '...आणि चांदणे उन्हात हसले'




हेमलकसा येथे बाबा आमटे यांच्या स्वप्नातून सत्यात उभारण्यात आलेल्या लोकबिरादरी प्रकल्पाचे शिल्पकार डॉ. प्रकाश आमटे आणि गेली पन्नास वर्षे, त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्या कार्यात आपलं उभं आयुष्य झोकून देणाऱ्या त्यांच्या सहचारिणी डॉ मंदा आमटे यांच्या सहजीवनावर आधारित '...आणि चांदणे उन्हात हसले' या डॉ राजश्री पाटील लिखित चरित्रात्मक कादंबरीचा प्रकाशनसोहळा हेमलकसा येथे २३ डिसेंबर रोजी, लोकबिरादरी प्रकल्पाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात, ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी साहित्यसंमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, दीनानाथ हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर धनंजय केळकर, रेमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. भारत वाटवानी, पहिले आदिवासी डॉक्टर कन्ना मडावी आणि या कादंबरीचे महानायक आणि महानायिका डॉ. मंदा व डॉ प्रकाश आमटे यांच्या शुभहस्ते, बहुसंख्य लोकांच्या उपस्थितीत पार पडला.

या कर्मयोगी दांपत्यानं हेमलकसा येथे माडिया या अतिमागास आदिवासींसाठी शून्यातून विश्व निर्माण केलं. अनेक अडचणींना सामोरं जाण्यासाठी जे मानसिक बळ आवश्यक असतं, ते या दांपत्याला एकमेकांवरील निस्सीम प्रेमाच्या अनुबंधामुळे मिळालं असावं, असं लेखिकेला वाटलं आणि त्यातून या कादंबरीचा जन्म झाला.

सुरुवातीला ग्रंथालीची प्रतिनिधी म्हणून लेखिका, संपादिका मेधा आलकरी यांनी आरोग्य विज्ञानयात्रा यासारख्या ग्रंथालीच्या उपक्रमांची आणि डिजिटल व्यासपीठावरून प्रसारित होणाऱ्या दर्जेदार कार्यक्रमांची माहिती दिली.

डॉ. मंदा आमटे यांच्या निर्मोही, शांत, संयत, समंजस आणि प्रलोभनांपासून दूर राहिलेल्या व्यक्तिमत्त्वानं भारावून जाऊन ही कादंबरी लिहिली असं लेखिका डॉ. राजश्री पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितलं.

लक्ष्मीकांत देशमुख यांची प्रस्तावना लाभलेल्या या कादंबरीतील त्यांना भावलेल्या काही प्रसंगांचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. ही एक लोकविलक्षण आणि अनोखी प्रेमकथा आहे. दुःखिताचे अश्रू पुसण्याचा हा प्रेमाचा उत्सव आहे. कामाची दिशा आणि उद्देश काय हे पाहायचं असेल तर त्यासाठी पथदर्शक ठरावे असे हे प्रकल्प आहेत. आरोग्य, शिक्षण आणि शेती म्हणजे उत्पन्न या मूलभूत गोष्टी आदिवासींना शिकवण्यासाठी डॉ प्रकाश आणि डॉ मंदा आमटे त्यांच्यातलेच एक बनून या जंगलात राहिले. वैयक्तिक सहजीवन आणि सामाजिक सेवेचं सहजीवन हा धागा पकडून ही रोचक कादंबरी लिहिली गेली आहे. देशमुख सरांनी यातील तीन पैलू अतिशय सुंदर रीतीनं त्या उलगडून दाखवले. पहिला पैलू आहे, तरुण वयात जमलेलं प्रेम. 'स्व'चा विलय करीत, परस्परांत सामावून जात जगलेलं समृद्ध सहजीवन ! दुसरा आणि अधिक महत्त्वाचा पैलू म्हणजे समाजसमर्पित, ध्येयधुंद जीवन जोडीनं व्यतीत करणं, चार वेदांपलीकडचा पाचवा वेदनेचा वेद वाचून तो मिटवण्यासाठी आयुष्य पणाला लावत जगणं. तिसरा तेवढाच महत्त्वाचा पैलू म्हणजे वन्य प्राण्यांना आपला गोतावळा मानत त्यांना जीव लावत, आपल्या प्रेमाची कक्षा असीमित करत 'गोकुळ' उभारणं. प्रशासकीय सेवेत आपली उत्तम कारकीर्द पूर्ण केलेले देशमुखसर, लेखिकेला पुढील लिखाणासाठी शुभेच्छा देत आपल्या भाषणाच्या समारोपात म्हणाले की ही कादंबरी वाचल्यावर प्रत्येकाला, समाजाचं देणं म्हणून आपणही काहीतरी केलं पाहिजे असं वाटणं, हे या कादंबरीचं यश म्हणता येईल. आपल्या कार्यक्षेत्रात उत्तम काम करणं गरजेचं आहे. वंचित लोकांसाठी लागणारी संवेदना आम्ही हरवून बसलो आहोत. ती प्रशासकांकडे असली तर दहा पैकी नऊ कामं सुलभरीत्या केली जाऊ शकतात.

लेखिका डॉ राजश्री पाटील यांनी त्या दिवशीच्या पुस्तक विक्रीचे उत्पन्न प्रकल्पाला देणगीरूपे देण्याची घोषणा केली.

•

## ‘वाटचाल सहा दशकांची’ या पुस्तकाचे प्रकाशन

डॉ. अलीमिया परकार यांनी लिहिलेले ‘वाटचाल सहा दशकांची’ हे पुस्तक आजच्या नव्या पिढीच्या डॉक्टरांसाठी खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ठरणार आहे. या पुस्तकातून डॉ. परकार यांनी आत्मकथन नव्हे, तर आत्मविश्लेषण केले आहे, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सुपे यांनी पुस्तकाचे प्रकाशन करताना केले.

३० डिसेंबर २०२३ रोजी, रत्नागिरीतील गोगटे-जोगळेकर महाविद्यालयातील राधाबाई शेट्ये सभागृहात या पुस्तकाचे प्रकाशन नामवंतांच्या उपस्थितीत झाले. यावेळी कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. श्रीरंग कद्रेकर, शल्यविशारद डॉ. रमेश चव्हाण, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, कोमसापच्या अध्यक्षा नमिता कीर, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या कार्याध्यक्ष शिल्पा पटवर्धन, मानसोपचारतज्ज्ञ शाश्वत शेरे, अनुवादक प्रकाशक कामत, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, वैष्णो व्हिजनचे संस्थापक संचालक पद्मा भाटकर, निर्माता-दिग्दर्शक जयू भाटकर, अरुण जोशी आणि धनश्री धारप मंचावर उपस्थित होते.

‘माझ्या आतापर्यंतच्या वैद्यकीय वाटचालीत रत्नागिरीकरांनी दिलेले अपूर्व प्रेम ही माझी जीवनशिदोरी आहे. इथल्या मातीतले माझे जीवनानुभव लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे. हे अनुभवचरित्र आहे.’ असे लेखक अलीमिया परकार मनोगतात म्हणाले. डॉ. श्रीराम कद्रेकर म्हणाले, ‘डॉ. परकारांचे लेखन हे सर्वसामान्य रुचेल-पचेल असे आहे. त्यांनी अधोरेखित केलेली वाटचाल नव्या पिढीला आदर्शप्रद व बोधप्रद आहे.’ असे ते म्हणाले.

डॉ. शेरे, डॉ. रमेश चव्हाण, विद्या पटवर्धन, नमिता कीर आदींनी डॉ. परकारांबद्दलचे व्यक्तिगत अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलेश पवार यांनी केले. •

## ‘ब्रह्ममार्ग रूप बोध’ पुस्तकाचे प्रकाशन

अमेरिकास्थित डॉ. सुनंदा आपटे-काकडे लिखित ‘ब्रह्ममार्ग रूप बोध ताओ ते चिंग’ पुस्तकाचे प्रकाशन लेखिका डॉ. निर्मोही फडके यांच्या हस्ते २८ डिसेंबर २०२३ रोजी वांद्रे येथील ‘ग्रंथाली - प्रतिभांगण’ येथे पार पडले.विशेष अतिथी म्हणून डॉ. वर्षा दंडवते उपस्थित होत्या. सुमारे २५०० वर्षांपूर्वी लाओ त्सू या चिनी तत्त्वज्ञ विद्वानाने ८१ रचनांमधून जगण्याचा सुकर मार्ग सांगितला. सुनंदा आपटे यांनी ‘ब्रह्ममार्ग रूप बोध’ या पुस्तकातून चिनी संस्कृतीतील इंग्रजीत भाषांतर झालेला हा ऐवज भावानुवादित करून मराठीत आणला.ज्यात ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांनी सांगितलेल्या विचारांशी साम्य दर्शवणारे विचार सापडतात, अशा शब्दात निर्मोही फडके यांनी आपले विचार मांडले.

डॉ. वर्षा दंडवते यांनी प्रस्तुत पुस्तकाची प्रस्तावना लिहिली आहे. डॉ. दंडवते आपल्या भाषणात म्हणाल्या, की ब्रह्ममार्ग रूप बोध या पुस्तकामुळे जगभरातल्या वाचकांना अलौकिक ‘ताओ मार्गा’ची ओळख होईल. वयाच्या ८१ व्या वर्षी सुनंदा आपटे यांनी हा ग्रंथ लिहून मराठी वाचकांना उत्तम वैचारिक देणगी दिली आहे.

लेखिका सुनंदा आपटे यांनी आपल्या मनोगतातून या पुस्तकाचा लेखनप्रवास ओघवत्या शैलीत श्रोत्यांसमोर उलगडला. चिनी चित्रलिपी, विविध चिन्हे यांचे अर्थ स्पष्ट करत डॉ. सुनंदा यांनी रंजक पद्धतीने मांडणी केली.

पुस्तकप्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले. •

## ‘शिवनेरीची श्रीमंती’ पुस्तकाचे प्रकाशन

ओतूर येथील नंदलाल लॉन्समध्ये ग्रंथाली प्रकाशित आणि संजय नलावडेलिखित ‘शिवनेरीची श्रीमंती’ या पुस्तकाचा सोहळा शनिवारी, १६ डिसेंबर २०२३ रोजी उत्साहात पार पडला. याप्रसंगी जगप्रसिद्ध चित्रकार दत्तात्रेय पाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ साहित्यिक सतीश सोळांकूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध क्षेत्रांत देदीप्यमान कामगिरी केलेल्या ‘शिवनेरीची श्रीमंती’ पुस्तकातीलच मराठीतील पहिल्या स्त्रीगझलकार संगीता जोशी, ज्येष्ठ कादंबरीकार द.स. काकडे, दूरदर्शन निर्माते अशोक डुंबरे, उद्योजक वसंतराव पोखरकर, लोककला अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे, चित्रकार भास्कर हांडे व सुदेश हिंगलासपूरकर या दिग्गजांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

‘उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याच्या या युगात मावळतीच्या सूर्याला मुजरा करण्याची प्रेरणा मला शिवजन्मभूमी असलेल्या किल्ले शिवनेरीच्या आशीर्वादाने मिळाली’, असे उद्गार लेखक संजय नलावडे यांनी यावेळी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी संजय गवांदे यांनी केले.

•



# ग्रंथपरिचय



डॉ. निर्मोही फडके
९९२०१ ४६७११

**रोज एक कथा**
**अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ**




'भाकरी आणि कला यांचा संबंध विचित्र असतो. पण खुदाला तोच मंजूर आहे त्याला काय करणार? खुदा स्वतःला निरपेक्ष म्हणवतो, पण हे चूक आहे. तो निरपेक्ष, निर्लेप अजिबातच नाही. खुदाला त्याची आराधना केलेली हवी आहे. पण, ही आराधना खूपच मऊ आणि नाजूक भाकरी आहे. त्याने तो आपले पोट भरतो.'

गेल्या शतकातील एक महान कथाकार सआदत हसन मंटो ह्यांचे हे वक्तव्य आहे. आजही जगणं आणि कलाव्यवहार ह्यांची सांगड कशी घालावी, ह्या प्रश्नाशी अनेक कलाकार झगडत आहेत.

'रोज एक कथा' हा संधिकाल प्रकाशित सआदत हसन मंटो ह्यांच्या काही दुर्लक्षित कथांचा संग्रह. हिंदी साहित्यातील ज्येष्ठ साहित्यिक, संपादक डॉ. नरेंद्र मोहन ह्यांनी हिंदी भाषेमध्ये हा कथासंग्रह संपादित केला. हिंदीतील प्रसिद्ध अनुवादक शंभू यादव ह्यांनी हिंदीत अनुवादित केलेल्या ह्या कथांना मराठी वाचकांकरता मराठी भाषेमध्ये अनुवादित केलं आहे, ज्येष्ठ अनुवादक चंद्रकांत भोंजाळ ह्यांनी.

फक्त पैसे मिळवण्याकरता आणि त्यातही 'पिण्यासाठी' पैसे मिळवण्याकरता आपण कथा लिहितो असं एक (वादग्रस्त) विधान मंटो ह्यांनी केलेले आहे. त्या संदर्भात कथासंग्रहाच्या मूळ प्रस्तावनेत डॉ. नरेंद्र मोहन लिहितात, की, 'मंटोच्या वर्तनातील विसंगतीला आणि अंतर्विरोधाला, तसंच त्यांचं आयुष्य आणि साहित्य यातील नात्याला समजून न घेता मंटो आयुष्यभर पीत राहिले असं म्हणणे बरोबर ठरणार नाही.'

'कथाकार सआदत हसन मंटो' समजून घेण्यासाठी त्यांच्या प्रसिद्ध कथांबरोबरच काही दुर्लक्षित कथाही वाचणे ही वाचकांकरता, अभ्यासकांकरता एक अनोखी प्रक्रिया ठरेल. मी कथा लिहीत नाही, तर कथाच मला लिहिते, असे सांगणाऱ्या मंटो ह्यांच्या ह्या २६ कथांचा ऐवज 'रोज एक कथा' ह्या पुस्तकातून आपल्यासमोर उलगडला जातो. रोज एक कथा लिहिण्यामागे संपादकांशी मानधनासाठी केलेला करार कारणीभूत असावा का, अशा प्रकारचे अंदाज केले जाऊ शकतात. ह्याबद्दल संपादक डॉ. नरेंद्र मोहन ह्यांनी केलेली टिप्पणी वाचनीय आहे.

फाळणीनंतर मंटो आणि त्यांचे कुटुंबीय पाकिस्तानमध्ये स्थायिक झाल्यावर लिहिलेल्या ह्या कथांमध्ये आलेल्या व्यक्तिरेखा, परिसर, वातावरण हे प्रामुख्याने मुस्लीम असले, तरी अनेक हिंदू,पारशी व्यक्तिरेखाही महत्त्वपूर्ण ठरतात. 'परिन'सारख्या मुंबईतल्या आठवणींवर आधारित कथाही ह्यामध्ये आहेत. मंटो ह्यांच्या इतर प्रसिद्ध कथांबरोबर ह्या कथांची तुलना न करता, ह्यांचा आस्वाद घेणे हे नक्की आनंददायी ठरेल.

सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर मंटो ह्यांच्या व्यक्तिरेखा नेहमीच करकरीत भाष्य करतात. मग ती परिस्थिती स्वातंत्र्यपूर्वकालीन भारतातली असो, वा स्वातंत्र्योत्तर पाकिस्तानातली असो. 'साडेतीन आणे' ह्या कथेत गुन्हा, गुन्हेगार, शिक्षा, तुरुंगवास इत्यादी गोष्टींविषयी कथेतला रिझवी स्वअनुभवाच्या बळावर, अनेक प्रकारे मतं मांडतो. तो म्हणतो, 'तुरुंगात जाऊन माणसाची चूक दुरुस्त होऊ शकत नाही या मंटोसाहेबांच्या मताशी आहे... एखादी गोष्ट एखाद्या समाजात चांगली समजली जाते तीच दुसऱ्या समाजात वाईट समजली जाते.'

ही एक चर्चा-कथा आहे. ह्या कथेमध्ये स्वतः लेखक सर्वसाक्षी निवेदक आहे. एके ठिकाणी तो रिझवीला सांगतो, की 'मी यावेळी मंटो नाहीये. फक्त सआदत हसन आहे.' ह्या वाक्याचा संबंध मंटो ह्यांच्या एका लेखात मिळतो. ज्यामध्ये ते म्हणतात, की 'माझ्या हाती लेखणी आल्यावरच मी मंटो होतो. एरवी मी सआदत हसनच असतो.' रिझवीच्या संवादांमधून त्याची स्वतःची आणि फागु भंग्याची कहाणी उलगडत जाते. 'तो भंगी होता पण त्याचा स्वभाव सुगंधी होता.' अशा प्रकारची वाक्ये आपल्याला विचारमग्न करतात. मंटो ह्यांच्या प्रत्येक कथेमधून व्यवस्थेवर केलेली टिप्पणी अधोरेखित होते. अनेक ठिकाणी एकेका वाक्यामधून त्यांनी व्यवस्थांवर मारलेले ताशेरे देशकालपरिस्थितीच्या सीमा ओलांडणारे आहेत.

ह्या कथांमधून जोरकसपणे पुढे येणाऱ्या मानवी संवेदना निखळ आहेत. त्यांच्या आजूबाजूचे तपशील हिंदुस्थानातले असोत, की पाकिस्तानातले, आदिम माणूसपण सगळीकडे सारखंच असतं हेच त्या अधोरेखित करतात.

मंटो ह्यांच्या कथांमध्ये बहुतेक वेळा शेवटी वाचकाला एक हलकासा धक्का दिलेला असतो. 'लघुकथेत धक्कातंत्राचा' वापर हे मराठी साहित्यातल्या लेखकांचे एक आवडते रंजन तंत्र म्हणून बऱ्यापैकी अबाधित राहिलं आहे. मंटो ह्यांच्या कथांमधले शेवटचे धक्के मात्र वाचकाला खऱ्या अर्थानं अंतर्मुख करणारे असतात.

अनुवादप्रक्रिया ही अतिशय तरल आणि तितक्याच खोल पातळीवर होणारी प्रक्रिया आहे. ती सुंदररीत्या झाल्याचं ह्या पुस्तकांमधल्या कथा वाचताना प्रकर्षानं लक्षात येतं. अनुसर्जन करणारे हे अनुवादक वाचकांमध्ये इतर भाषांमधल्या साहित्याबद्दल ओढ निर्माण करतात. त्या अर्थानं अनुवादक हे वाचन-संस्कृतीचे महत्त्वाचे वाहक आणि प्रसारक आहेत. मंटो ह्यांच्या दुर्लक्षित कथांच्या संग्रहाचा मराठीमध्ये अनुवाद झाल्यामुळे मंटो साहित्यप्रेमींना, अभ्यासकांना निश्चितपणे एक नवा नजराणा लाभला आहे.


**'रोज एक कथा'**
संपादन - डॉ. नरेंद्र मोहन
अनुवाद- चंद्रकांत भोंजाळ
संधिकाल प्रकाशन
मूल्य - २०० रुपये

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**चिरंजीव भारत**
**विजय बुक्कावार**



**भारत : काल, आज आणि उद्या**

*''इतर धर्मांप्रमाणे हिंदू धर्माला कुणीही एक प्रेषित नाही. कोणत्याही एका देवाची उपासना नाही; ते कोणत्याही एका तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवत नाही; इथे कुठलीही कट्टरता नाही. विशिष्ट धार्मिक विधी किंवा पूजापद्धतीचा आग्रह नाही. त्यामुळे तो धर्म किंवा पंथाच्या कुठल्याही व्याख्येत बसत नाही. तो आहे जीवन जगण्याचा एक मार्ग आणि इतर काही नाही. राज्यघटनेच्या निर्मात्यांना याची पूर्ण जाणीव होती आणि हिंदू धर्माचे सर्वसमावेशक स्वरूप माहीत असल्याने धर्मस्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराच्या हमीबाबत हिंदू या शब्दात शीख, जैन, बौद्ध यांचा समावेश असेल असे मानले आहे.''*

'चिरंजीव भारत – धर्मेतिहासाचे वेगळे आकलन' हे विजय बुक्कावार लिखित पुस्तक ग्रंथालीने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाच्या अंतरंगात असलेला गाभा हा धर्म आणि इतिहास यावर आधारित आहे, हे शीर्षकाच्या सोबत स्पष्टीकरण आलेले आहे. शालेय जीवनापासूनच इतिहासाची तोंडओळख सुरू होते. लढाया, पराक्रम, जिंकणे–पराभव, सनावळ्या आणि स्थळासोबत सहभागी योद्धा यांची नामावली. हा इतिहास सर्वांगीण असतो असे नाही. त्यातून काही ठरावीक हेतूंचा उद्देश समोर ठेवलेला असतो इतकेच. परंतु यातून एक प्रश्न उपस्थित होतो, 'आपण वाचतो तो इतिहास कुणाचा? तो सर्वस्वी खरा आहे, हे कशाच्या आधारे निश्चित करायचे? त्याबाबत लेखक नमूद करतात', या देशाचा इतिहास जर नीट समजून घ्यायचा असेल तर त्यात धार्मिक इतिहासाची ओळख आवश्यक वाटते. त्यासाठी सर्व धर्मांची; खासकरून हिंदू धर्माची वैशिष्ट्ये समजून घेणे क्रमप्राप्त झाले.'

'चिरंजीव भारत' यात लेखकाने ज्या विविध पैलूंचा पट उलगडून दाखवलेला आहे, तो विशाल–विस्तृत–बृहद् म्हणावा असा आहे. आपण आपल्या चिरंजीवपणाच्या खुणा शोधू लागतो तेव्हा इतिहासाच्या सनावळीत इसवी सनापूर्वीच्या काळापर्यंत खोदकाम करावे लागते, अगदी अश्मयुग, ताम्रयुग आणि लोहयुगाचे दरवाजे उघडून आत डोकवावे लागते. त्याविषयी लेखक संदर्भ देतात, भारतातील नवाश्मयुगाचे (अश्मयुगाच्या अखेरच्या कालखंडात नवाश्मयुग अस्तित्वात आले) पुरावे हे इसवी सनपूर्व ७००० या कालखंडातील असून ते सध्या पाकिस्तानात असलेल्या मेहेरगढ येथील आहेत.

धर्माचा उगम, हिंदू धर्म, लोकशाही आणि हिंदू धर्म, हिंदू कोण? या सगळ्याची माहिती या पुस्तकातील प्रकरण चारमध्ये दिलेली आहे. आमच्या इतिहासाचा धर्म – प्रकरण दोन. यात भारतात असलेल्या विविध राजसत्ता. (आक्रमणपूर्वकाळ), त्या काळातली स्थापत्ये, अक्षरवाङ्मय, सांस्कृतिप्रगती, न्यायदान, लेणी, शास्त्रे, चित्रकला व समाजजीवन याची माहिती दिलेली आहे. पुढे मुस्लिमाच्या आक्रमणानंतर झालेले बदल आहेत. हे बदल थेट इंग्रज राजवटीपर्यंत कसे होत गेले, याचे संदर्भ आहेत. मधला काळ छत्रपती शिवाजीमहाराजांचा आहे. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्याचा काळ येतो. परंतु लेखक केवळ इतिहास आणि धर्म यांच्या नावे भूतकाळाचे वर्णन करत नाही, तर आजच्या ताज्या घडामोडी अगदी चांद्रयानपर्यंतच्या, यांचीही नोंद समोर ठेवतात आणि उद्याचा म्हणजे भविष्यकालीन आधुनिक हत्यारे, पुशबटण असलेली यंत्रे अशा क्रांतिकारकबदलाचाही वेध घेतात.

एकूण पाच प्रकरणांत विभागणी केलेली आहे. त्यामुळे खूप मोठा असलेला आवाका मर्यादित आणि नेमकेपणाच्या स्वरूपात मांडणे शक्य झालेले आहे. यात आलेला मजकूर, माहिती ज्यावर आधारित आहे, त्यांची संदर्भसूची व लेखकसूची शेवटी दिलेली आहे. भारताचा सर्व बाजूंनी विचार मांडणे तसे मोठे व तितकीच अवघड अशी प्रक्रिया आहे. लेखकाने केलेला अभ्यास, चिंतन आणि आपल्याला जे सांगायचे आहे, याची आखणी काटेकोरपणे अमलात आणलेली आहे. त्यामुळे एक चांगला दस्तऐवज निर्माण झाला आहे. ज्या पुस्तकांचा आणि लेखकांचा आधार घेतलेला आहे, ज्यांची मते उद्धृत केलेली आहेत, त्यांचा स्पष्ट उल्लेख करून ज्यांचे त्यांचे श्रेय त्यांनाच देण्याचा मनमोकळा मोठेपणा लेखकाने त्यांच्या मनोगतात अगोदरच व्यक्त केलेला आहे. लेखनाच्या भूमिकेबाबतही त्यांची धारणा यात स्पष्टपणे सांगितलेली आहे. लेखनाच्या भूमिकेबाबतही त्यांची धारणा यात स्पष्टपणे सांगितलेली आहे. त्यामुळेच त्यांनी या लेखनाला वैचारिक प्रवासाचे वर्णन असे नामकरण दिलेले आहे. विषयाची अनुक्रमणिका विस्तृत आणि पुस्तकाच्या अंतरंगाचा आरसा ठरावी अशी आहे. अभ्यासक–वाचक ती पाहून आपणास हवे असणारे संदर्भ, माहिती सहजपणे निवडता येतील. तसे कुठलेही प्रकरण वाचायला घेतले तरी आपण त्याच्याशी सहजपणे एकरूप होतो. 'इसापगड' हे प्रकरण कायमचे स्मरणात राहावे असे आहे.

विजय बुक्कावार विद्युत अभियांत्रिकी विषयातील अभियंता आहेत. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, इथून सहसंचालक पदावरून निवृत्त झालेले आहेत. औद्योगिक सुरक्षा, रासायनिक आपत्ती निवारण यांचे सल्लागार व प्रशिक्षक म्हणून ते कार्यरत आहेत.

निळू दामले, लेखक, पत्रकार यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. राजमुद्रा, स्थापत्य–शिल्पलेणी आणि ऐतिहासिक दस्तऐवज यांची सुंदर मांडणी मुखपृष्ठावर साकारलेली आहे. ही सजावट चित्रकार सतीश भावसार यांची आहे.

**मूल्य ५०० रुपये सवलतीत ३०० रुपये**

# ग्रंथपान

**ढोर–चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ**
**सुनीता सावरकर**




**चळवळ, जाणीव आणि सहभाग**

''सर्व जातींत पुरुषापेक्षा स्त्री ही कायम दुय्यम असते, परंतु प्रत्येक जातीतील स्त्रियांना मिळणारा मानसन्मान, आदर हा वेगवेगळा आहे. स्त्री उच्च वर्णातील असेल, तर ती फक्त तिच्याच जातीतील पुरुषांसाठी असते. खालच्या जातीतील पुरुषाला मात्र ती स्त्री आदरस्थानी असते. हा नियम अस्पृश्य स्त्रीला लागू होत नाही. अस्पृश्य स्त्री ही अस्पृश्य पुरुषासाठी जशी दुय्यम आहे, तशी ती इतर जातीतील पुरुषांसाठीसुद्धा दुय्यम असते. हा एक मुद्दा महत्त्वाचा आहे, जो स्त्रियांच्या शोषणाच्या संदर्भात कायम ध्यानात ठेवून पुढे जावे लागते.''

आपल्या समाजात जातीधर्माचे थोतांड किती आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. 'अस्पृश्य' या एकाच वर्णव्यवस्थेविषयी उच्चवर्णीयात असलेले समज–गैरसमज, त्यातून निर्माण झालेल्या चालीरीती, माणूसपणाला मिळालेली तिलांजली, हे सारे भूतकाळात घडले, म्हणून त्याकडे डोळेझाकही तयार करता येणार नाही. आज यात फरक झाला आहे, गावकुसाबाहेर असलेला समाज आज सन्मानाने वावरताना दिसत आहे. आपला हक्क, माणूसपण याची त्याला पुरेपूर जाणीव झालेली आहे. या कारण संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिवर्तनाच्या दिशेचे मूलभूत विचार; 'स्वातंत्र्य–समता–बंधुता, गुलामाला त्याच्या गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो त्या गुलामीविरुद्ध बंड करून उठेल.' त्यासाठी त्यांनी उभारलेली चळवळ जिला आंबेडकरी चळवळ, आंबेडकरी जाणिवा म्हणून ओळखले जाते.

डॉ. आंबेडकर यांनी समाजाला विचार दिला, त्याच्यात चेतनेचे स्फुल्लिंग फुलवले, त्यामुळे सामाजिक परिवर्तनाचा रथ काळाला आव्हान देत पुढे निघाला. हा रथ परिश्रमपूर्वक ओढण्याचे धाडस, जिद्द, पुढाकार ज्यांच्या ठायी होता त्यात केवळ पुरुषच होते असे नाही. केवळ महार, मातंग, बौद्ध होते असे नाही, तर स्त्रियाही पुरुषांच्या सोबत खंबीरपणे सहभागी झालेल्या होत्या आणि त्यात ढोर–चांभार स्त्रियांचासुद्धा सहभाग होता. महार समाज बहुतेक सगळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत बौद्ध झाला. परंतु ढोर–चांभार यांनी तो मार्ग त्या प्रमाणात स्वीकारलेला नाही. वास्तविक महार–ढोर–चांभार हे मृत जनावराच्या कातड्याशी जोडलेले आहेत, तरीही ढोर–चांभार या चळवळीत तितकेसे पूर्ण शक्तीने वा संख्येने नाहीत. याचे कारण काय आणि ज्या महिला सहभागी झाल्या त्या कोण, त्यांचा सहभाग कसा झाला, तो कसा होता, याचा शोध घेणे हा संशोधनाचा विषय आहे. ते संशोधन आपल्यासमोर ठेवले आहे सुनीता सावरकर यांनी. त्यांच्या या संशोधनप्रकल्पाचे नाव आहे, 'ढोर–चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ'.

हा विषय मोठा, अवघड तरीही लेखिकेने तो पूर्णत्वास आणलेला आहे, हे पुस्तक वाचून झाल्यानंतर खात्रीने म्हणता येते. आंबेडकरी चळवळीपूर्वीची परिस्थिती कशी, त्यावेळी असलेल्या चळवळी, शाहूमहाराज, सयाजीरावमहाराज यांच्या परिवर्तनशील कृती, यावेळी स्त्रियांचा असलेला सहभाग, इथपासून मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या चळवळीपर्यंतचा इतिहास, या चळवळीत दलित पँथरसह ढोर–चांभार स्त्रियांचे योगदान इथपर्यंत लेखिकेने शोध घेतलेला आहे. थोडक्यात अस्पृश्य स्त्रियांच्या इतिहासाचा मागोवा घेत थेट ढोर–चांभार स्त्रियांचे आंबेडकरी–सामाजिक चळवळीतील संदर्भ, परिचये आपल्याला वाचायला मिळतो.

पुस्तकाची रचना चार प्रकरणांतून साकारलेली आहे. चौथ्या प्रकरणात कल्याणम्मा, सावित्रीबाई बोराडे, गुणाबाई गाडेकर, वेणूबाई शिवतरकर, रुक्मिणीबाई राजभोज, मालनबाई वाघमारे, कमल पारखे ऊर्फ सुधा जोगदंड, केशराबाई घुमरे, ऊर्मिला रायमाने, बेबी अमृता मुकणे यांचा परिचय दिलेला आहे, जो त्यावेळेचा समाज, चालीरीतींचा परिचय ठरतो आणि सामाजिक चळवळीतील त्यांच्या खंबीर–करारी योगदानाचे दर्शनही घडवतो.

हे संशोधन प्रकल्पाचे साधनसामग्री आधार लेखिकेने तपशिलासह दिलेले आहेत. त्यावेळेची कागदपत्रे, फोटो दिलेले आहेत. यावरून त्यांच्या सखोल अभ्यासाची प्रचीती येते. परंतु समारोप या प्रकरणात त्या जे निरीक्षण नोंदवतात, ते भलावण करणारे नाही तर त्या विषयाचा दोन्ही बाजूंनी समग्रपणे कसा विचार केला आहे, त्याची नोंद आवर्जून करतात. ढोर–चांभार स्त्रिया डॉ. बाबासाहेबांविषयी, चळवळीविषयी आस्था दाखवतात, तरी त्याचे प्रमाण कमी का? त्या बौद्ध धर्म स्वीकारण्यास पुढाकार घेत नाहीत त्याची कारणे काय? सहभागी झाल्या त्यांची पूर्वपीठिका काय, आलेल्या प्रसंगांना त्या सामोरे गेल्या, त्यामागे त्यांची निष्ठा काय, हे सर्व वाचताना लेखिकेच्या अभ्यासाची, संशोधनाची चिंतनाची प्रचीती येते. संशोधन कसे असावे याची उत्तम उदाहरण म्हणजे पुस्तक होय.

सुनीता सावरकर या पीएच.डी. असून इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे कार्यरत आहेत. आंबेडकरी चळवळ, आंबेकडरवादी इतिहासलेखन आणि त्याचे विविध पैलू, हे त्यांचे संशोधनाचे क्षेत्र आहे. खानदेशातील भिल्ल आदिवासी आणि आंबेडकरी चळवळ, हे त्यांचे पुस्तक प्रकाशित आहे. मराठी विश्वकोशात नोंदी करण्यातही त्यांचा सहभाग आहे.


सुप्रसिद्ध लेखिका ऊर्मिला पवार यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. हे पुस्तक सिद्ध करण्याची प्रेरणा आणि हेतू स्पष्ट करणारे लेखिकेचे मनोगत विषय समजून घेण्यासाठी उपयुक्त असे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि चळवळीत सहभागी झालेल्या स्त्रिया मुखपृष्ठावर साकारलेल्या आहेत. हे मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

## चाकावरची चाकरी
**सुधाकर राऊत**




**चाकावरही स्वतःचा तोल सांभाळलेला प्रवास**

''माझी एक सवय होती, तिकीट चेकिंग करताना ज्याच्या पायात चप्पल नाही अशांना मी तिकीट विचारत नसे. कारण मला असे लोक अधिक भरोसेमंद वाटत. फाटका माणूस कधीच विनातिकीट जाणार नाही. जो सर्वसामान्य माणूस असतो तो फुकट प्रवास करत नाही. त्यामुळे मी साम ान्यांना तिकीट विचारत नसे. जो माणूस रुबाबदार दिसतो, परंतु नजरेला नजर भिडवत नाही. नजर चुकवतो. किंवा चुकवायचा प्रयत्न करतो तो नेमका विनातिकीट असतो. हे मला अनुभवांती समजलं होतं. अशीच माणसं आम्ही पकडत असू.''

आपण विहित केलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी सेवेत आहोत, त्या कर्तव्याला न्याय देणे आपले कर्तव्य आहे, असे प्रामाणिकपणाने ज्यांना वाटते, त्याप्रमाणे आचरणाचे कवच परिधान करतात अशी कर्तव्यनिष्ठांची मांदियाळी तुलनेने आणि संख्येने अल्प असूनही समाधानाचा मोठा दिलासा देतात. रेल्वेत तिकीट तपासनीस दिसला तर फुकट प्रवास करणारा अलीकडे फारसा दचकत नाही. पाच-दहा रुपयांत तोडपाणी करू, इतका निर्ढावलेपणा त्याच्या अंगी असतो, याचे कारण ही चुकीची धारणा. परंतु जे प्रामाणिक असतात ते अशा तोडपाणीला भीक न घालता पूर्ण दंडाची रक्कम वसूल करून त्याची पावती देतात, त्यापैकी एक आहेत सुधाकर राऊत. एकूण सदतीस वर्षे तिकीट तपासनीस या एकाच पदाच्या वेगवेगळया टप्प्यांवर सेवा पूर्ण केलेले राऊत केवळ तिकीट तपासणीत प्रामाणिक राहिलेले नाहीत, तर आपल्या मुंबई विभागाचा महसूल इतरांच्या तुलनेत अधिक राहील या ध्येयाने त्यांनी कर्तव्य पार पाडले आहे. मागील पन्नास वर्षांत मुंबई विभागाला सर्वाधिक महसुलाच्या पारितोषिकाने वंचित ठेवले होते, ते पारितोषिक मिळवून देण्याचे आणि वेगळे संचित निर्माण करण्याचे श्रेय त्यांच्याकडे आले. रेल्वे स्टेशनवर आणि चालत्या रेल्वेत तिकीटतपासणी करणे दिसते तितके सोपे नसते. त्यासाठी स्वतः प्रामाणिक असावे लागते. अंगी साहस आणि धाडस असावे लागते. वेळकाळाचे भान न ठेवता आपले उद्दिष्टे साध्य करण्याचे ध्येय बाळगावे लागते, त्याचबरोबर माणूस ओळखण्याचे मानसशास्त्र माहीत असावे लागते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे रेल्वेची प्रतिमा खराब होणार नाही, प्रवाशी दुखावला वा नाराज होणार नाही, त्याची गैरसोय होणार नाही, या सगळ्यांचे अवधान व गुण ज्याच्याकडे आहेत, तो तिकिट तपासनीस हा त्या खात्यासाठी अभिमानाचा, कौतुकाचा आणि विश्वासाचे पात्र ठरणारा सेवक ठरतो. सुधाकर राऊत हे त्यापैकी एक आहेत. रेल्वे जनरल मॅनेजर पुरस्काराचे दोन वेळेस आणि रेल्वे मंत्रालय पुरस्कार यांनी सन्मानित झालेले ते पहिले तिकिट तपासनीस आहेत.

तिकीट तपासनीस हा किती महत्त्वाचा सेवक आहे, याची माहिती त्यांचे 'चाकावरची चाकरी' हे आत्मकथन वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते. वरिष्ठ पातळीवरील अधिकारी, राजकीय नेते, यांच्या दौऱ्यांच्या वेळी शिष्टाचार पाळणे, अपघात, दुर्घटना घडली तर तत्परतेने आहे तिथून घटनास्थळी तातडीने रवाना होणे, मदतकार्यात संपूर्ण जबाबदारी उचलणे, महसूल उद्दिष्टापेक्षा कमी आल्यास त्यासाठी जबाबदार ठरणे, अशा खात्याच्या अंतर्गत असलेल्या कितीतरी बाबी आपल्याला माहीत नसतात, त्या या आत्मकथनामुळे लक्षात येतात.

सुधाकर राऊत यांचे आत्मकथन आपल्याला पश्चिम रेल्वेवरील त्यांच्या एकूण सदतीस वर्षांच्या सेवाकाळातील अनुभवांचा प्रवास उलगडून सांगते. यात त्यांना वेळोवेळी आलेले अनुभव, त्यातली उत्कटता, तळमळ, प्रामाणिक निष्ठा, यांचे दर्शन घडवते. एक माणूसपणाचे दिलखुलासपणाचे दर्शन घडवते. त्याचसोबत त्यांचे कौटुंबिक नातेसंबंध, परिस्थिती, आजूबाजूचा परिसर, समाज, जातीधर्म, चालीरीती, यांचे वास्तव मांडते. आपल्यासोबत असलेले वरिष्ठ, सहकारी, मित्र यांच्या सान्निध्याचा आवर्जून नोंद घेते. देश-विदेशातील पर्यटनातून स्वतःच्या भ्रमंतीछंदाचा, वाचनातून मिळणाऱ्या आनंदाचा ठेवा समोर ठेवते. ग्रंथाली आणि सुदेश हिंगलासपूरकर यांच्या सहवासात मिळालेल्या मैत्रक्षणांचा आणि आनंदाचा आलेख मोकळेपणाने साकारते. सेवाएके सेवा हा फक्त नोकरीशी बांधिलकी व्यक्त करणारा चाकरमानी स्वभाव नाही, तर सामाजिक दायित्व जपणारा, अडचणींतून मार्ग काढणारा, वेळप्रसंगी तत्परतेने धावून जाण्याची तळमळ असणारा, सामाजिक भान असलेला स्वभाव हा सुधाकर राऊत यांचा स्थायीस्वभाव आहे. त्यांनी केलेली ही कामे त्यांच्या या स्वभावाची साक्ष देणारी आहेत.

'चाकावरची चाकरी' हे आत्मकथन चाकासारखेच गतिशील आहे. प्रत्येक स्टेशनाला नाव असते तसे प्रत्येक प्रकरणाला शीर्षक दिलेले आहे. प्रत्येक स्टेशनवर किती वेळ थांबायचे याचा कालावधी ठरलेला असतो, तसे वर्णनाचे नेमकेपण यात जपलेले आहे. विचार व्यक्त करण्यातला मोकळेपणा आणि भाषेतला सहजपणा यामुळे या कथनाचा वाचनप्रवास अतिशय सुखदपणे पार पडतो. एक मनमोकळे, प्रसन्न शैलीतले दिलखुलास आत्मकथन, नव्हे आत्मप्रवास, यातून जगण्यातले प्रांजळपण मनापासून आपल्याला भावते. आतील रंगीत फोटो त्यांच्या जीवनप्रवासातील विविध टप्प्यांवरील क्षणांचे साक्षीदार आहेत. तेही दर्शन मनमोहक आहे.

'सामान्यातल्या असामान्य माणसाचे हे आत्मकथन म्हणता येईल. लिखाणात अकृत्रिमता आहे. आपला कुठलाही बडेजाव सांगण्यासाठी सुधाकर राऊत यांनी हे अनुभव लिहिलेले नाहीत. याला आत्मकथन म्हणता येणार नाही, त्याला जीवनानुभव म्हणता येईल,' असे बी.जी. वाघ यांनी प्रस्तावनेत कौतुक केलेले आहे.

या पुस्तकाचे सुंदर आशयसंपन्न मुखपृष्ठ उदय पटवर्धन यांनी साकारलेले आहे आणि मांडणी रत्नदीप कुळे यानी केलेली आहे.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

# ग्रंथपान

**जागतिक सत्ताकारण**

एक दृष्टिक्षेप

**अमोल केतकर**




**सत्तेच्या पटावरील डाव**

'एखाद्या ठिकाणी कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला तर सर्व बाजूंनी हवा आत घुसून वादळ निर्माण होते, हा शास्त्राचा नियम आहे. वादळ आपल्या गतीप्रमाणे नासधूस करते. जीवित व वित्तहानी होते. वादळ या हानीस जबाबदार असते. परंतु वादळ निर्माण करणारा कमी दाबाचा पट्टा यात नामानिराळा राहतो. युक्रेन युद्ध हे असेच एक वादळ आहे. नाटोविस्ताराच्या अट्टहासातून निर्माण झालेले. ते शमवायचे असेल तर नाटोविस्ताराचा कमी दाबाचा पट्टा नाहीसा होणे आवश्यक आहे.'

'जागतिक सत्ताकारण – एक दृष्टिक्षेप' हे अमोल केरकर लिखित पुस्तक वाचले आणि काही काळ सुन्नपणे बसून राहिलो. जगाच्या पाठीवर सतत युद्धाची क्षेपणास्त्रे डागली जात आहेत आणि आपण त्याकडे वर्तमानपत्रातील एक वृत्त म्हणून पाहतो, बस्स! या युद्धाच्या झळा, यातना ज्यांना सोसाव्या लागत आहेत, ती दृश्ये पाहतो. कधी संपणार असे मनात येते, पण ते तेवढेच. ही युद्धाची मालिका आपण शाळेत असल्यापासून अभ्यासत आहोत, परीक्षेत पास होण्यापुरते. म्हणजे पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध, त्यानंतर भारत–चीन, भारत पाकिस्तान, पुढे अमेरिका–व्हिएतनाम, पुढे त्याची व्याप्ती वाढतच गेली अगदी अलीकडील रशिया–युक्रेन, इस्राएल–हमासपर्यंत. दिङ्मूढ व्हावे अशी आताची परिस्थिती आहे. यात किती क्षेपणास्त्रे डागली, किती प्रदेश बळकावला, किती माणसे मारली गेली, हे तपशील मग येत राहतात, पण त्यामागचे खरे कारण सर्वसामान्यांना कधीच कळत नाही. 'जागतिक सत्ताकारण – एक दृष्टिक्षेप', हे पुस्तक वाचल्यानंतर एकेका घटनेचा उलगडा होत जातो. जग आपल्या मुठीत ठेवायचे, आपले वर्चस्व सिद्ध करायचे आणि सुपरपॉवर म्हणून जगावर राज्य करायचे, हा डाव किती कुटील आणि जीवघेणा आहे, याचे दर्शन या पुस्तकातून होते.

पहिल्या महायुद्धात जर्मनीला पराभव पत्करावा लागला आणि व्हर्सायच्या कराराने अपमानाला सामोरे जावे लागले, तिथेच दुसऱ्या महायुद्धाची ठिणगी जागृत झाली. दुसऱ्या महायुद्धाने पुन्हा जर्मनीच लक्ष्य ठरली परंतु तिच्यातून पुढे जागतिक सुरक्षा परिषद, संयुक्त राष्ट्र संघ, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या संस्था अस्तित्वात आल्या. मग नाटोही आली. यातच दोन बलाढ्य दोन शक्तींचा उदय झाला. यात विस्तारवाद, राजकारण, भांडवल, नवीन वसाहती, यांना स्थान मिळाले. या प्रत्येक युद्धामागे दडलेले आहे ते केवळ सत्ताकारण. यात प्रमुख भूमिका आहे ती अमेरिकेची. व्हिएतनाम, इराण, इराक, अफगाणिस्तान, या देशांविरुद्ध अमेरिका उभी आहे. जिथे थेट युद्धात सहभाग घेता येत नाही तिथे पाठबळ उभे करण्यात पुढाकार घेतलेला दिसतो. आताचे युक्रेन हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. यामागे सूत्र आहे ते रशियाला बलाढ्य शक्ती म्हणून वेसण घालण्याचे. यात चीनचा असलेला सहभाग आणि त्याची ध्येयधोरणे ही अमेरिकेला आव्हान देणारी, सत्ताकेंद्र स्वतःकडे घेऊ पाहणारी, उद्याचा बलाढ्य देश म्हणून मिरवण्याची आहेत.

लेखिकेने आतापर्यंत झालेल्या जागतिक स्तरावरील युद्धांना समोर ठेवून त्यामागील सत्ताकारणाचा, त्यातल्या हेतू आणि यशपशयाचा शोध घेतला आहे. हिरोशिमा आणि नागासकीच्या संहारानंतर तिसऱ्या जागतिक युद्धापासून दूर राहण्याचे धोरण स्वीकारलेले दिसते. याचे कारण बहुतेक मोठ्या राष्ट्रांकडे ही शक्ती ठासून भरलेली आहे. तरीही वर्षानुवर्षे चालणारी युद्धे सुरू आहेत. यात शीतयुद्धाचा खेळ सुरू आहे. यातून नाटो, संयुक्त राष्ट्र संघ यांसारख्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत की त्यांची निष्क्रियता दिसून येत आहे, असाही प्रश्न निर्माण होतो. विशेष म्हणजे जगातील सगळेच देश यात सहभागी आहेत असे नाही. अलिप्ततावादी देशही आहेत. ज्यांनी अलिप्त चळवळीच्या माध्यमातून शांततेच्या दिशेने, मानवी कल्याणाच्या दिशेने प्रयत्न केलेले आहेत. परंतु एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते ती ही, की संघर्षात उतरेली राष्ट्रे स्वतःच्या सामर्थ्याचा बडेजाव पुढे करतात. तिच्या जोरावर समोरच्या राष्ट्राची कोंडी करून आपले ईप्सित साध्य करण्याचा प्रयत्न करतात. अशी सामर्थ्ये कोणती आहेत, याचीही माहिती इथे दिलेली आहे.

या पुस्तकात एकूण अठरा प्रकरणे आहेत. युक्रेन, पहिले व दुसरे महायुद्ध, नाटो, शीतयुद्ध, अलिप्तवादी चळवळ, इस्रायल, पॅलेस्टाइन, लॅबेनॉन, जॉर्डन, व्हिएतनाम, लाओस, कंबोडिया, लॅटिन अमेरिका, इराण, आखाती युद्ध, अफगाणिस्तान, इराक, इस्लामिक स्टेट, अरब स्प्रिंग, सीरिया, लीबिया, संयुक्त राष्ट्रसंघ, लोकशाही, साम्राज्यशाही आणि लष्करशाही. यातून संपूर्ण जागतिक संघर्ष आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचा शोध घेताना लेखिका प्रश्न विचारतात, 'या साम्राज्यवादी युद्धांची मानवी किंमत किती? भांडवलाच्या या दिग्विजयी घोडदौडीपुढे माणसाला स्वतःच्या प्रजातीचीही किंमत नाही?' या पुस्तकाला कुमार केतकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. 'जागतिक सत्ताकारण हा प्रचलित जागतिकीकरणाचा मुख्य चेहरा आहे. जगावर प्रभुत्व लादण्यासाठी आणि कार्पोरेट भांडवलशाहीच्या आणि लष्करी व औद्योगिक अर्थव्यवस्थेचा दरारा व दबदबा या सत्ताकारणाचा मुख्य घटक आहे.' असे ते नमूद करतात.

हा विषय तसा इतिहासाशी नाते सांगणारा. त्यामुळे संबंधित देशाचा पूर्वइतिहास आणि आजच्या परिस्थितीला जबाबदार ठरणारे घटक कोणते, याचीही माहिती तारीख आणि संबंधित जबाबदार व्यक्तींचा संदर्भ दिल्याने एक मोठा संदर्भग्रंथ म्हणून या पुस्तकाचे मोल मोठे आहे.

लेखिका रिझर्व्ह बॅंकेतून अधिकार पदावरून निवृत्त झालेल्या आहेत. चळवळीतील कार्यकर्त्या असून स्त्रीमुक्ती संघटना, एम्प्लॉइज असोसिएशन, जनचळवळ आदींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. सतीश भावसार यांनी सत्तेचे अस्त्र म्हणजे लष्करी सामर्थ्य आणि भांडवल, यांचा चपखल आशय मुखपृष्ठावर साकारलेला आहे.

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २४० रुपये**



@abpmajhatv
प्रश्न महाराष्ट्राचे
व्यासपीठ माझाचे!
abp
माझा
झीरो
अवर
चर्चा जनहिताची
सरिता कौशिक
abp
माझा
चर्चा जनहिताची
पारदर्शक विश्लेषण
सखोल माहिती
जनमानसाचा कल
जनतेचे मत
महाराष्ट्राच्या हक्काचा प्राईम टाईम
पाहा सोमवार ते शुक्रवार | सायंकाळी ७:५६ वाजता
फक्त एबीपी माझावर!
facebook.com/abpmajha
instagram.com/abpmajhatv
twitter.com/abpmajhatv
www.kooapp.com/profile/abpmajha
youtube.com/abpmajhatv
www.abplive.com
For queries, please contact: adsales@abpnetwork.com | Download the ABP Live app

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.